नगरपालिका नगरवाचनालय, कऱ्हाड

यशवंतराव चव्हाण

व्याख्यानमाला

923.60954
NAG
G04281

Y. B. CHAVAN LIBRARY
- MUMBAI -
CALL NO.
ACC. NO.: G04281
DATE: 8/6/2015

यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला

वर्ष १४ वे १९८६

Y.C.P
923.60954/NAG
G04281
LIBRARY

प्रकाशन :-

प्रा. रावसाहेब कसबे

संगमनेर महाविद्यालय, संगमनेर जि. अ. नगर

यांच्या शुभहस्ते

दि. १२ मार्च १९८७

प्रकाशन स्थळ -

यशवंतराव चव्हाण स्मृती सदन

कराड नगरपालिका, कराड.

प्रकाशक :-

श्री. पांडुरंग दादासाहेब पाटील

अध्यक्ष

कराड नगरपालिका, कराड ४१५ ११०

मुद्रक :-

श्री. गजानन रामचंद्र गिजरे

४०४/४०५ गुरुवार पेठ, कराड.

फोन नं. २१५६

मुद्रण स्थळ :-

लोकमान्य मुद्रणालय,

४०४/४०५ गुरुवार पेठ, कराड ४१५ ११०

जि. सातारा.

मा. यशवंतराव चव्हाण

मनोगत

यशवंतराव चव्हाण व्याख्यानमालेत १९८६ सालातील मा. साहेबांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्रातील एक थोर विचारवंत मा. श्री. द्वा. भ. कर्णिक, मुंबई यांची तीन व्याख्याने आणि त्याच सालात शारदीय व्याख्यानमालेतील मा. श्री. रायभानजी जाधव, औरंगाबाद यांचे प्रभावी भाषण, यांची एकत्रित मुद्रित प्रत वाचकांच्या हाती देताना संमिश्र भावनांनी माझे मन भरून आलेले आहे.

कऱ्हाडचे सुपुत्र मा. यशवंतरावजी चव्हाण यांचे नेत्रदीपक व्यक्तिमत्व आणि विशेषतः त्यांचे विचार नि उच्चार समाज परिवर्तनाला सहाय्यभूत ठरावे या भावनेने यशवंतराव चव्हाणांच्या नावाने सन १९७३ सालापासून 'यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला' स्वतंत्रपणे आयोजित करण्यात आली. आणि काही विचारवंतांच्या सूचनेवरून मालेमधील अभ्यासपूर्ण व्याख्याने पुस्तकरूपाने प्रकाशित करण्यात येवू लागली. परंतु मागील वर्षात काही अपरिहार्य कारणामुळे त्या प्रथेला खंड पडला होता.

दि. २५-१०-१९८४ रोजी मा. यशवंतरावजी चव्हाण यांचे दुर्दैवी देहावसान झाले, त्यानंतर हा पहिलाच भाषणसंग्रह प्रकाशित करीत आहोत.

ही व्याख्यानमाला यापुढेही अधिक जोमाने सुरू ठेवण्याचा आणि त्यापैकी निवडक व्याख्याने पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याचा मनोदय आहे.

आमच्या निमंत्रणाला मान देवून मा. ह्ना. भ. कणिक मुंबई आणि मा. रायभानजी जाधव, औरंगाबाद या दोन विचारवंतांनी या मालेत व्याख्याने दिलीत त्याबद्दल त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानणे आमचे कर्तव्य आहे. तसेच लोकमान्य मुद्रणालयाचे संचालक श्री. गजानन गिजरे आणि त्यांचे कुशल, मेहनती कामगार यांनी हे पुस्तक वेळेवर व सुबक छापून दिले त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

हे व्याख्यान पुस्तक आपल्या हाती देताना, ज्यांच्यासाठी उदंड आयुरारोग्य लाभावे अशी करुणा भाकावी त्या यशवंतरावांच्यावर मृत्यूचा घाला पडला आणि या देशातील अतिशय थोर, तळागाळातल्याविषयी अखंड आत्मीयता बाळगणारा सर्वगुण संपन्न असा जाणता नेता कृष्णाकाठी कायमचा विसावला ! त्यांच्याच स्मृतीला हे व्याख्यान पुस्तक समर्पण करून त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो.

कऱ्हाड — पी. डी. पाटील
१२ मार्च १९८७ — नगराध्यक्ष

' अंतरंग '

दि. १२ मार्च १९८६

' यशवंतराव आणि महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तन '

दि. १३ मार्च १९८६

' यशवंतराव चव्हाण : काँग्रेस संस्कृतीचे उपासक व प्रवक्ते '

दि. १४ मार्च १९८६

' दिल्ली दरबारातील यशापयशाची मीमांसा '

मा. श्री द्वा. भ. कर्णिक, मुंबई

●

दि. ४-१०-१९८६

' महाराष्ट्र दिशाहीन होतो आहे काय ? '

मा. श्री. रायभानजी जाधव

माजी आमदार व

चेअरमन कन्नड सहकारी साखर कारखाना लि. कन्नड जि. औरंगाबाद

'यशवंतराव चव्हाण-महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तन'
'यशवंतराव चव्हाण : काँग्रेस संस्कृतीचे उपासक व प्रवक्ते'
'दिल्ली दरबारांतील यशापयाशाची मीमांसा'

श्री. द्वा. भ. कर्णिक, मुंबई

या देशातील सामाजिक परिवर्तनाचे खरे उद्‌गाते बंगालचे राजा राममोहन रॉय आणि महाराष्ट्राचे महात्मा ज्योतिबा फुले हे होत. यशवंतराव चव्हाण यांची वरील थोर झुंझार महात्म्यांच्या कार्याशी सांगड घातली पाहिजे कारण चव्हाणांनी या मार्गांचीच सतत कास धरलेली दिसून येते. त्यांच्या राजकारणाची आणि समाजकारणाची जडण घडण याच मार्गाने झाली आहे.

एका बाजूला लो. टिळकांचा राष्ट्रवाद आणि दुसऱ्या बाजूला राजर्षी शाहू महाराजांच्या प्रेरणेने प. महाराष्ट्रात उभी राहिलेली सत्यशोधक चळवळ आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांचे प्रचंड शैक्षणिक कार्य यांच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या मनाची पुरोगामी स्वरूपाची जडण घडण होत गेलेली दिसते. या शिवाय त्या काळात होणाऱ्या निरनिराळ्या राजकीय गटांच्या बौद्धिकावरच त्यांचे राजकीय शिक्षण झाले असले पाहिजे. त्यानंतरच्या म. गांधींच्या अध्यात्मिक बैठकीवर आधारलेल्या मानवतावादी राष्ट्रवादी चळवळीकडे ते ओढले गेले आणि देशसेवा व ध्येयवाद हे आपले जीवन ध्येय ठरवून सबंध भावी आयुष्यात या आकांक्षेपासून ते कधीही विचलित झाले नाहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि एम्. एन्, रॉय यांच्या समाज परिवर्तनवादी चळवळी त्यांना प्रेरक ठरल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीत यशवंतराव प्रत्यक्ष सहभागी होऊ शकले नसले तरी, नवबौद्धांनाही अस्पृश्यांच्या सवलती आणि हक्क देऊ करणारे यशवंतराव चव्हाण हेच भारतातले एकमेव मुख्यमंत्री होते. या उदाहरणावरून परिवर्तनवादी चळवळीकडे पाहण्याचा त्यांचा विधायक दृष्टीकोण स्पष्ट होतो.

समाज परिवर्तनाच्या मोहिमेला तर्कशुद्ध आधार देणाऱ्या रॉय यांच्या वैचारिक भूमिकेशी काही काळ यशवंतराव जवळीक साधतांना दिसतात. या सर्वांचा परिणाम महाराष्ट्रात परिवर्तनाची जी दिंडी अव्याहतपणे चालू राहिली आहे तिच्यामधील अग्रस्थानीचे वारकरी म्हणून यशवंतराव चव्हाण यांचेच अभिमानाने नाव घेता येईल.

यशवंतराव हे काँग्रेसचे एक निष्ठावान पाईक होते आणि वयाच्या सतराव्या वर्षी त्यांनी इंडियन नॅशनल काँग्रेसला आपली जी निष्ठा दिली ती अव्याहतपणे दिली. काँग्रेस संस्कृतीचा हल्ली उपहासाने उल्लेख केला जातो पण म. गांधी आणि पं. नेहरू यांच्या वैचारिक मार्गदर्शनाने बहरलेल्या काँग्रेस संस्कृतीचाच आदर्श त्यांच्यासमोर होता. यशवंतराव जन्मभर उपासक व प्रवक्ते राहिले ते याच काँग्रेस संस्कृतीचे. या संस्कृतीत प्रचंड ध्येयवाद होता. आणि राष्ट्रीय एकात्मता, धर्म–निरपेक्षता आणि समाजवादी निष्ठा याच तीन निष्ठा यशवंतरावांना अभिप्रेत होत्या. १९८१ मध्ये यशवंतरावांनी 'मी स्वगृही जात आहे' ही घोषणा केली तिचा अन्वयार्थ आपण याच पार्श्वभूमीवर समजून घेतला पाहिजे.

यशवंतराव चव्हाण १९५६ ते १९६२ या कालखंडात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. पण १९६२ नंतरचा त्यांच्या राजकीय कारकीर्दीचा सर्व काळ दिल्ली दरबारात खर्च झाला आहे. 'दिल्ली दरबार' या शब्दप्रयोगाला एक ऐतिहासिक संदर्भ आहे. पंडित नेहरूंच्या नंतर या देशाला समर्थ विचार आणि नेतृत्व देण्याचे सामर्थ्य यशवंतराव चव्हाण यांच्यामध्येच होते. परंतु त्यांचे विचार दिल्ली दरबारातील डावपेचामुळे प्रगट होऊ दिले नाहीत. पंडित नेहरू किंवा इंदिरा गांधींच्या कारकीर्दीमध्ये राजकीय संघर्षाच्या वेळी यशवंतराव मुग्ध राहिले. इंदिरा गांधींच्या डावपेचामुळे त्यांचे अधिकच खच्चीकरण झाले. जनता राजवटीत विरोधी पक्षनेता म्हणून काम करतांना बाईंना जनता पक्षाने दिलेल्या सूडबुद्धीच्या वागणूकीचा यशवंतरावांनी लोकसभेत कधीही आवाज उठवला नाही. यामुळे ते इंदिरा गांधींच्या मर्जीतून अधिकच उतरले.

पण दिल्ली दरबारातील डावपेचांमध्ये ते उणे पडले असले तरी त्याच दरबारातील अतिशय महत्त्वाची पदे त्यांनी अतिशय प्रभावीपणे व यशस्वीपणे सांभाळली.

अशा या विविधरंगी सर्वस्पर्शी महान व्यक्तिमत्त्वाचा पुढील तीन व्याख्यानात घेतलेला आढावा.

द्वारकानाथ भगवंत कर्णिक

शिक्षण : बी. ए., एल्. एल्. बी., व्यवसाय : पत्रकारिता व लेखक.
जन्म : १४ जानेवारी १९१२ (बेळगांव)

महाराष्ट्र टाईम्सचे पहिले संपादक, एम्. एन्. रॉय यांचे निकटचे सहकारी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, स्व. यशवंतराव चव्हाण, स्व. ह. रा. महाजनी, स्व. गोवर्धनदास पारीख यांचे बौद्धिक साहचर्य लाभलेले एक ज्येष्ठ विचारवंत. दिल्लीत बारा वर्षे केसरी व इतर संस्थांचे प्रतिनिधित्व. पत्रकार, लेखक व चिकित्सक अभ्यासक म्हणून प्रसिद्ध.

वर्तमानकालीन व दैनंदिन जटील समस्यांचा शोध घेणे-त्याचे भाष्य करणे हा त्यांचा आवडता छंद आहे. वयाची पंच्याहत्तरी ओलांडली तरी समाज-प्रबोधनाचे कार्य अथकपणे चालू आहे.

महाराष्ट्र टाईम्समध्ये संपादक म्हणून काम करीत असतांना अग्रलेखासारख्या गंभीर लेखनाबरोबरच 'आशावादी' या सदरातून त्यांनी सामान्य माणसाला पटेल आणि रुचेल असे केलेले ललित लेखन 'काय सांगू तुम्हाला' या पुस्तक रूपाने आजही लोकांसमोर आहे,

पत्रकारितेच्या व्यवसायात असूनही माणसांच्या आंतरप्रवृत्तीचा शोध घेणे हा त्यांचा अभ्यासविषय असून महाराष्ट्रातील महान व्यक्तिमत्वांची जवळीक याच प्रवृत्तीतून त्यांनी साधली आहे.

प्रकाशित ग्रंथसंपदा

१) हिटलर चरित्र

२) संपादकाचे जीवनस्वप्न

३) काय सांगू तुम्हाला !

४) Y. B. Chavan – A Political Biography.

५) व्ही. बी. कर्णिक (चरित्र)

६) दिल्लीतील बारा बर्षे

७) चैतन्ययुग

' मातीच्या मूर्ति '
' रामवृक्ष बेनीपूरी ' } ही भाषांतरीत पुस्तके.

त्यांचे निकटचे मित्र यशवंतराव चव्हाणांच्या सारख्या एका अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे दर्शन केवळ बुद्धिवादी किंवा वैचारिक जाणिवेतूनच नव्हे तर त्यांनी तटस्थ आणि अलिप्त पातळीवरून मानवतावादी दृष्टिकोनातून घडविले आहे.

पत्ता :

श्री. द्वा. भ. कर्णिक
६८–अे, आदर्शनगर
वरळी, मुंबई ४०००२५

द.भ. कर्णिक

यशवंतराव आणि महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तन

– द्वा. भ. कर्णिक

१२ मार्च १९८६

अध्यक्ष महोदय श्री. पाटील, उपनगराध्यक्ष श्री. शिंदे, ग्रंथपाल श्री. पाटील आणि उपस्थित बंधुभगिनींनो, आज मी या ठिकाणी व्याख्यानासाठी उभा राहिलो आहे, तो प्रथमतः या जाणीवेने की आज यशवंतराव चव्हाण यांचा जन्मदिन आहे. गेली पन्नास वर्षे त्यांचा आणि माझा स्नेहसंबंध होता आणि या जन्मदिनाच्या दिवशी आम्ही कोठेही एका गावात हजर असलो तर त्या दिवशी मी आवर्जून यशवंतरावांच्या निवासस्थानी त्यांच्या भेटीसाठी जात असे. एकतर त्यांच्यावद्दलच्या सदिच्छा व्यक्त करण्यासाठी मी जात असे. त्याचप्रमाणे त्यांच्यावद्दलचा भक्तिभाव प्रगट करण्याचीही त्यामध्ये माझी भावना असे.

आज सांगलीहून कराडला येताना सहज मी विचार करीत होतो, माझी व चव्हाणांची पहिली भेट केव्हा झाली? मला नक्की आठवतंय की कराडला एका नाक्यावरच कोठेतरी आम्ही भेटलो होतो. १९३६–३७ साल असेल ते. एक सामान्य शेतकरी कार्यकर्ता म्हणून ते माझ्यापाशी आले. वयाच्या १७ व्या वर्षी राजकारणात भाग घेण्याची त्यांना स्फूर्ती आली आणि मी निश्चित पणे सांगू शकतो की या राजकारणामध्ये तनमन आणि धन अर्पण करण्याची भावनाही त्याचवेळी त्यांच्या अंतःकरणात रुजलेली होती. त्यावेळी मी कर्नाटक पब्लिशिंग हाउसमध्ये नोकरी करीत होतो आणि शिक्षण विषयक क्रमिक पुस्तकांच्या प्रचारासाठी मला त्या पब्लिशिंग हाउसने गाडीही वापरासाठी दिलेली होती. त्या सुमारास मी रॉयवादी झालेला होतो आणि क्रांतिकारक अभिनिवेशाने आमच्या पक्षाच्या प्रचाराचे कामही मी त्याचवेळी करीत असे. यशवंतराव हे आमच्याकडे आकर्षित झालेले होते, त्याचे कारण तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, ह. रा. महाजनी, भय्याशास्त्री वाटवे ही त्यांची सारी मित्रमंडळी रॉयपक्षाजवळ आलेली होती. त्या सर्व मंडळीबरोबर हिंडण्यात, त्यांच्याशी सुखसंवाद करण्यात मला फार आनंद होत असे, यशवंतरावांनी पहिल्या भेटीतच माझ्यावर प्रभाव पाडला यात संशय नाही.

मला आठवतंय की त्यानंतर आम्ही इस्लामपूर मार्गे शिराळ्याला गेलो. तेथे यशवंतरावांचे एक मित्र बळवंतराव कदम हे रहात होते. रात्री ११–११॥ वाजता आम्ही कदमांच्या घरी पोहोचलो आणि त्यांचं आदरातिथ्य काय सांगू? सातारा

जिल्ह्याच्या ग्रामीण भागाचंच ते आदरातिथ्य म्हणायला हरकत नाही. त्यांनी लगेच घरच्या मंडळींना सांगितलं. " यशवंतराव, महाजनी, कर्णिक अशी थोर पंडळी आली आहेत. त्यांना कोंबडीचंच जेवण दिलं पाहिजे " त्या रात्री बळवंतराव कदमांनी आम्हाला जे अगत्यानं जेवण घातलं ते उरकेपर्यंत रात्रीचे तीन वाजले होते. मी प्रांजलपणे सांगतो की ग्रामीण महाराष्ट्राचं जे विलोभनीय दर्शन मला घडलं ते यशवंतरावांच्यामुळेच होय.

त्यानंतरच्या काळात महाराष्ट्राचे पार्लमेंटरी सेक्रेटरी, मंत्री, मुख्यमंत्री आणि दिल्ली दरबारातील मंत्री या अनेकविध नात्यांनी माझा यशवंतरावांशी संबंध जडला आणि त्या साऱ्या कालखंडामध्ये माझे आणि त्यांचे अगदी निकटचे आणि जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित झाले. ही जी संधी मला लाभली ते मी माझे भाग्यच समजतो. आज त्यांच्याबद्दलच्या ज्या आठवणी माझ्या मनश्चक्षू समोरून तरळून जात आहेत त्यातून मला प्रतीत होत आहे ती त्यांची शालीनता. साऱ्या जबाबदारीच्या स्थानावर आरूढ झाल्यानंतरही यशवंतरावांनी सर्वांना समजुतदारपणाची वागवणूक देऊन आणि सर्वांना म्हणजे प्रतिपक्षीयांनाही सांभाळून घेऊन त्यांनी राष्ट्रगाडा चालविला. चव्हाणांनी जे राजकारण घडवलं ते सहजासहजी साध्य होण्यासारखं नव्हतं. तत्वांशी फारकत न होऊ देतां त्यांना ते राजकारण घडवावयाचं होतं. पण त्यांनी विचारपूर्वक, विशिष्ट ध्येय डोळ्यासमोर ठेवून आणि यशापयशाची सारी जाणीव ठेवून आपलं कार्य निर्धारानं चालू ठेवलं आणि कालांतरानं एकेक क्षेत्रात यश संपादन करून त्यांनी महाराष्ट्रातच नव्हे तर भारतीय जीवनात सुध्दा एक मोलाचं,

मानाचं स्थान मिळवलं. आज त्यांच्याबद्दल कृतज्ञतेची श्रद्धांजली अर्पण करताना माझ्या मनात विचार दाटून येतो की यावेळी देशाला त्यांची आत्यंतिक गरज असताना त्यांना मरण यावे ही केवढी दुर्दैवाची गोष्ट होय. एक चैतन्यपूर्ण, विचारी, ध्येयवादी जीवन त्यांच्या मृत्यूने आपल्यामधून हिरावून नेले आहे. परवाच सांगलीला आम्हा दोघांचेही मित्र वामनराव कुलकर्णी व माझ्या पत्नी निर्मलाबाई यशवंतरावांच्याबद्दल बोलत असताना वामनरावांनी खिन्नपणाने उद्‌गार काढले " आज यशवंतराव असते तर महाराष्ट्र राज्याच्या भवितव्याबद्दल विचार करण्याचीही आवश्यकता निर्माण झाली नसती " मला निश्चितपणानं असं म्हणावसं वाटतं की संयुक्त महाराष्ट्राची स्थापना करण्याच्या बाबतीत त्यांची जी हिकमत, जे कौशल्य आणि लोकांवर प्रभाव टाकण्याचं जे सामर्थ्य प्रत्ययास आलं ते आजच्या आणीबाणीच्या काळी फार उपयोगी पडलं असतं. पण अखेरीस या गोष्टी आपल्या हातातल्या नसतात हेच खरे.

यशवंतरावांना त्यांच्या जन्मदिनी एवढी श्रद्धांजली वाहिल्यानंतर मला भाषणासाठी जो विषय दिला आहे, त्याच्याकडे मी वळतो. विषय आहे, " यशवंतराव आणि महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तन " आता या विषयाकडे वळण्यापूर्वी थोडीशी इतिहासाकडे आपण दृष्टि टाकली पाहिजे. आज देशामध्ये काँग्रेसची शताब्दी साजरी होत आहे. तो शंभर वर्षाचा कालखंड विचारात घेतला तर आपल्याला असं दिसून येईल की, काँग्रेस संघटना स्थापन केली ती ए. ओ. ह्यूम यांनी. तिचं पहिल अधिवेशन भरविण्याचं ठरलं तेव्हा अधिवेशनाची जबाबदारी

पुण्याच्या सार्वजनिक सभेकडे सोपविण्यात आली. दुर्दैवाने त्याच वेळी पुण्यामधे प्लेगची साथ उद्‌भवली आणि म्हणून हे अधिवेशन पुण्यामध्ये भरू शकले नाही. लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे ती ही की, सार्वजनिक सभा ही काही राजकीय संघटना नव्हती, सामाजिक सुधारणेला वाहिलेली ही संस्था होती. आणि ज्याला सामाजिक परिवर्तन म्हणता येईल, त्याच्यासाठी धडपडणारी ही संस्था होती. न्यायमूर्ती रानडे हे तिचे प्रवर्तक होते, स्फूर्तिदाते होते. न्यायमूर्ती रानडे यांची भूमिका निखालस समाजसुधारणेची होती. ब्रिटीश राजवटीनं या देशामध्ये जे आणले शिक्षण आणलें, सुधारणा आणल्या त्यांनी न्यायमूर्ती रानडे इतके दिपून गेले होते की, त्यांनी या राजवटीची चिकित्सा Divine dispensation म्हणजे दैवी वरदान अशीच केली. न्या. रानड्यांची ही जी भावना झाली तिचं कारण असं आहे की, त्या सुमारास पेशवाईची सारी कटू फळं आपला समाज चाखत होता आणि रानड्यांना असं वाटलं की एक नवसमाज निर्माण करण्याच्या दृष्टीने ब्रिटीशांची राजवट आपल्याला उपयोगी पडेल. समाजपरिवर्तनाची अमूर्त कल्पना पुढे आली, ती यावेळीच होय. कल्पना करा, ब्रिटीश राज्यकर्त्यांकडे आपले त्यावेळचे पुढारी कोणत्या प्रकारच्या मागण्या करीत होते ? त्यांच्या मागण्या अशा होत्या की, नोकऱ्यांमध्ये आम्हाला प्रतिनिधित्व मिळावे, आय्. सी. एस्. ची परीक्षा जी इंग्लंडमध्ये होते तो भारतात घेण्यात यावी आणि लोकप्रतिनिधित्वाचे हक्क आणि अधिकार मर्यादित प्रमाणात का होईना पण आम्हाला दिले जावे.

माझ्या दृष्टीने या देशामध्ये सामाजिक परिवर्तनाचे खरे उद्‌गाते जर कोणी असतील तर ते बंगालचे राजा राममोहन रॉय आणि महाराष्ट्राचे ज्योतिबा फुले हे होत. मी चव्हाणांच्या जीवनाशी त्यांची जी सांगड घालू पहात आहे त्याचं कारण असं आहे की चव्हाणांनी या मार्गाचीच सतत कास धरलेली दिसून येते. तोच मार्ग त्यांनी जतन केला आणि समाजपरिवर्तनाची जी आस त्यांना लागलेली होती तो त्यांनी पुरी करून घेण्याचा प्रयत्न केला. चव्हाणांच्या राजकारणाची व समाजकारणाची जडणघडण याच मार्गाने झालेली आहे. आता ज्योतिबा फुले यांचे जे ऋण महाराष्ट्रावर आहे ते अलौकिकच मानावे लागेल. राजा राममोहन रॉय यांचे एक मोठे कर्तृत्व म्हणजे त्यांनी सतीची चाल बंद केली, ठगांचा बंदोबस्त करण्याचे श्रेयही त्यांच्या प्रचारालाच द्यावे लागेल. समाजाच्या हिताच्या दृष्टीने एकेक सुधारणा त्यांनी घडवून आणल्या. सामाजिक बंडखोरीची ज्योत त्यांनी व ज्योतिबा फुले यांनीच पेटविली. फुल्यांनी महाराष्ट्रामध्ये निराळं पाऊल टाकले. त्यांनी पहिल्या प्रथम समाजशिक्षणाचं व्रत हाती घेतले. त्या शिक्षणामधे त्यांनी स्त्रियांना गोवलं. त्यांच्यासाठी शाळा काढल्या. त्याहीपेक्षा महत्वाचं कार्य त्यांनी हाती घेतलं ते अस्पृश्यता निवारणाचं. मला आठवतं की, ज्यावेळी आम्ही यशवंतरावांना मुंबईमधे, कराडमधे, सांगलीमधे भेटत होतो आणि खुद्द दिल्लीमधे आम्ही त्यांच्या भेटी घेत होतो त्या त्या वेळी त्यांनी भक्तिभावाने जर कोणाबद्दल उद्‌गार काढले असतील तर ते ज्योतिबा फुले यांच्याबद्दल होय. यशवंतरावांच्या जीवनाचा हा वारसाच आहे.

ज्योतिबा फुले, शाहू महाराज, भाऊराव पाटील, विठ्ठल रामजी शिंदे ही त्यांची दैवतेच होती. निरनिराळ्या क्षेत्रामध्ये ही पुढारी मंडळी चमकली आणि त्यांनी जी दिशा दाखवली ती शिक्षणाच्या दृष्टीने महत्वाची होती. स्त्रीमुक्तीच्या दृष्टीनेही महत्वाची होती. सामाजिक सुधारणेला खरे पाठबळ मिळवून दिले ते या पुरोगामी आणि कार्येकनिष्ट पुढाऱ्यांनी.

महाराष्ट्रामधे त्यावेळी दोन गट प्रबळ होते. एक गट सुधारकांचा तो आगरकरांचा गट म्हणून ओळखला जात होता. दुसरा गट लोकमान्य टिळकांचा तो राष्ट्रवादी गट होता. यशवंतराव असे चाणाक्ष होते की त्यांनी राजकारणामधे राष्ट्र-वादाचे प्रवक्ते असलेल्या लोकमान्य टिळकांचा वारसा स्वीकारला. समाजकारणामधे मात्र त्यांनी ज्योतिबा फुले, शाहू महाराज, आगरकर, विठ्ठल रामजी शिंदे यांचा वारसा स्वीकारला. राजकारण व समाजकारण यांचा समन्वय साधणे हे यशवंतरावांचे वैशिष्टयच होय. पण राजकीय क्षेत्रातील काँग्रेसच्या निष्ठेपासून ते जसे विचलित झाले नाहीत. त्याचप्रमाणे समाजपरिवर्तनांच्या ध्येयापासूनही ते कधी ढळले नाहीत. काँग्रेस संघटना हीं त्यांनी आपली मानली आणि जनतेच्या स्वातंत्र्य आंदोलनाचे एकमेव प्रतीक म्हणून त्यांनी काँग्रेसशिवाय दुसऱ्या कोणत्याही पक्षाला वा संघटनेला जवळ केले नाही. समाजकारणामधे विशेषतः शाहू महाराजांनी जे कर्तृत्व गाजविले त्याबद्दल यशवतरावांना नितांत अभिमान वाटत असे. पुष्कळवेळा त्यांच्याविषयी चर्चा करताना ते ठासून म्हणत असत की शाहू महाराज हे शाहू छत्रपती होते. पण या छत्रपतींनी खरा आधार अस्पृश्यांना दिला. अस्पृश्यांच्या

पंक्तीत बसून जेवण घेणारा तो उदार हृदयी राजा होता. अस्पृश्यता निवारणाचे प्रत्यक्ष कार्य शाहू छत्रपतींनीच करून दाखविले; नुसता संदेश देत बसले नाहीत. शाहू महाराजांनी ब्राम्हणांविरूद्ध जे बंड पुकारले ते अन्यायाविरूद्ध बंड होते.

त्यांच्या कारकीर्दीत जे वेदोक्त प्रकरण निर्माण झाले त्याचा उगम कसा झाला याकडे जरा लक्ष द्या. कोल्हापूरच्या ब्राम्हणवर्गाने असा हट्टाग्रह धरला की वेदपठणाचा अधिकार जर कोणाला असेल तर तो फक्त ब्राम्हणजातीलाच होय. त्यातून असे सूचित केले जात होते की, ब्राम्हणाखेरीज इतर जाती-त्यात अस्पृश्य हे तर आलेंच- या शूद्र जाती होत. हा अहंकार आणि हा उन्मत्तपणा कोणत्या थराला गेला होता त्याची कहाणी खरोखरचं ऐकण्या सारखी आहे. त्याचे असे झाले की छत्रपती शाहू महाराज हे भल्या पहाटे रंकाळा तलावावर स्नानासाठी जात असत. त्यावेळी वेद-मंत्र म्हणण्यासाठी त्यांनी एका ब्राम्हणाची नेमणूक केली होती. ते भटजी पागोटे घालून व फेटा बांधून आणि अंगात बंडी व अंगरखा घालून तिथे मंत्र म्हणत असत. एके दिवशी शाहू महाराजांनी त्यांना सहज विचारले 'का हो भटजो, तुम्ही आंघोळ वगैरे करून आलात का ? " त्यावर त्यांनी उद्दामपणे महाराजांना उत्तर दिले, " ब्राम्हणाला शुचिर्भूत होण्यामाठी आंघोळीची गरज लागत नाही. तो जन्मजात पवित्रच असतो. " ते उत्तर ऐकताच शाहू महाराजांना संताप आला आणि त्यानी विचारले, " म्हणजे आम्ही अपवित्र काय ?" भटजो म्हणाले, " होय, त्यात संशय नाही " भटजीचे हे उद्गार शाहू महाराजांच्या दृष्टीने ब्राम्हण्याचा अविष्कार होता. त्यांनी

लगेच बंड पुकारले. पण ते ब्राम्हणांविरुद्ध नव्हे, ते ब्राह्मण्याविरुद्ध बंड होते. महाराजांनी ब्राह्मणांवर कधी हात उगारला नाही. पण वेदोक्ताचा अधिकार सर्व जातीजमातींना आहे, तो केवळ ब्राह्मणांचाच अधिकार नव्हे हे मात्र त्यांनी ठसून जाहीर केले आणि हा अधिकार गाजविण्यालाही सुरुवात केली. त्यानंतर ब्राह्मणातील काही मंडळी त्यांचे समाधान करण्यासाठी म्हणू लागले की छत्रपती या नात्याने वेदोक्ताचा अधिकार त्यांना प्राप्त होतो. पण इतरांना त्या अधिकाराचा उपभोग घेता येणार नाही. शाहू छत्रपतींचे या तडजोडीने तसेच लाचारीने समाधान झाले नाही.

यशवंतराव चव्हाण यांचा जन्म देवराष्ट्रे येथे झाला. त्यांचे शिक्षण कराडात आणि पुण्यातही झाले. पण त्यांच्यावर संस्कार केले ते कोल्हापूरानेच. त्यांच्या मनावर परिणाम घडविणाऱ्या निरनिराळ्या चळवळी महाराष्ट्रात सुरू झाल्या. शाहू महाराजांनी ब्राह्मण्याविरुद्ध दंड थोपटले आणि समाजसुधारणेची ध्वजपताका कोल्हापुरात रोवली. त्यापूर्वी ज्योतिबांनी शिक्षणाची, स्त्री शिक्षणाची. तशीच दलित शिक्षणाची मोहीम उघडली, अण्णासाहेब कर्वे यांनी स्त्रीशिक्षणाबरोबरच विधवा विवाहाचा पायंडा पाडला, विठ्ठल रामजी शिंदे यांनी राजकारणात जसा भाग घेतला त्याचप्रमाणे समाजकारणातही नवनवीन मूल्यं निर्माण केली, भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या रूपाने सबंध ग्रामीण भागात बहुजन समाजाला सुशिक्षित करण्याचा चंग बांधला. या साऱ्या चळवळी यशवंतरावांच्या डोळ्यासमोर फोफावत गेल्या आणि त्यांच्या मनाची घडण पुरोगामी स्वरूपाची होत गेली.

त्याचवेळी राष्ट्रवादाचं बाळकडूही यशवंतरावांना पाजलं जात होतं. लोकमान्य टिळकांच्या उदयाचाच नव्हे तर वैभवाचाही तो काळ होता. न्यायासनासमोर टिळकांनी घनगर्जना करताना म्हटलं की "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच." लोकमान्यांनी स्वराज्य संपादनासाठी होम-रूललीगही स्थापन केली. त्यांच्या जोडीला बेझंट बाईनीही तितकोच लढाऊ होमरूललीग स्थापन केली. या लढाऊ कार्यक्रमा-मुळे यशवंतरावांच्या सारखा संस्कारक्षम तरुण भारावून जाणे साहजिकच होतं. राष्ट्रवादाचं हे बाळकडू यशवंतरावांच्या रक्तात भिनत गेलं.

शिवाय त्यावेळी निरनिराळ्या राजकीय गटांची बौद्धिके होत असत. यशवंतरावांचेच काय, आमचेही राजकीय शिक्षण त्या बौद्धिकातूनच झालेले आहे. आता ही बौद्धिके होतात किंवा नाही याची मला माहिती नाही. कदाचित् पुढाऱ्यांप्रमाणे अनुया-यीही आता शिक्षणाच्या बाबतीत बनचुके झाले असणे शक्य आहे. पण त्यावेळी कम्युनिस्ट, रॉयवादी, समाजवादी अशा डाव्या गटाच्या लोकांची सर्रास बौद्धिके होत असत आणि त्यातून तरूण मंडळींना निरनिराळ्या विचारांचा मागोवा घेता येत असे. आम्हाला नवोदित पुढाऱ्यांच्या विचारसरणीचाही मागोवा घेता येत असे. यशवंतरावांच्या विचारसरणीचा जो कल मला दिसून आला तो ध्येयवादित्वावर आधारलेला होता. राजकारणात त्यांची जी धारणा होती ती संपूर्ण स्वातंत्र्याचा ध्यास घेणारी धारणा होती. लोकमान्य टिळकांची होमरूललीग ही त्यांना मान्य होती याचे कारण स्वातंत्र्य आंदोलनातील ते पहिले पाऊल

होते. त्या चळवळीमधूनच देशातील व्यापक राष्ट्रवादी चळवळीचा उगम झाला. यशवंतरावांनी राष्ट्रवादाचा वारसा देणारे पुढारी म्हणून लोकमान्यांचा स्वीकार केला. त्यांच्यानंतर महात्मा गांधींनी रणशिंग फुंकले. राष्ट्रवादाची जागती ज्योत त्यांच्या हाती होती, पण गांधीजींच्या तत्वज्ञानाला आणि विचारसरणीला आध्यात्मिक बैठक होती हे विसरून चालणार नाही. यशवंतरावांनी स्फूर्तिदाते गुरु म्हणून गांधीजींचीच निवड केली. त्यांची धारणा अशी होती की गांधीजींच्या मार्गाने आपण चळवळ चालविली तरच स्वातंत्र्याच्या आंदोलनाला यश मिळू शकेल गांधीजींनी १९३० साली सविनय कायदेभंगाचा पुकारा केला, तेव्हा उत्स्फूर्तपणे यशवंतरावांनी त्यात उडी घेतली. यशवंतराव त्यावेळी १७-१८ वर्षाचेच असतील. यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय जीवन त्या दिवसापासूनच सुरू झाले. त्यांनी प्रत्यक्ष चळवळीत भाग घेतला, आपल्या विचारांची पठडी तयार केली. समाजाला चालना देण्याच्या दृष्टीने काय काय केले पाहिजे याचे आडाखे बांधले. आणि निश्चित स्वरूपात त्यांनी आपल्या जीवनाची तशीच कार्याचीही दिशा ठरवली. यशवंतरावांचं एक वैशिष्टय म्हणून असं सांगता येईल की त्यांनी आपली आकांक्षा देशसेवा आणि ध्येयवाद ही ठरविली आणि मग सबंध भावी आयुष्यात या आकांक्षेपासून ते कधीही विचलित झाले नाहीत.

पुढील काळात यशवंतरावांच्या राजकीय जीवनाला बहर येत चालला आणि ते विधानसभेच्या प्रांगणात चमकू लागले. योगायोग असा की काँग्रेस पक्षाने अधिकारग्रहण केल्यानंतर चव्हाणांची पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून निवड करण्यात आली.

पण त्यांना मोरारजी देसाई यांच्या अधिकाराखालील गृहखात्यात काम करण्याचा आदेश मिळाला. वस्तुतः मोरारजी व यशवंतराव यांच्यामध्ये ध्येय धोरणाच्या बाबतीत कसलेही साम्य नव्हते. मोरारजी यांचे तत्वज्ञान व ध्येय यशवंतरावांना मुळीच मान्य होण्यासारखे नव्हते. पण एक शिस्तबद्ध सैनिक म्हणून यशवंतरावांनी आपल्याकडे सोपविलेली कामगिरी निष्ठेने आणि तितक्याच शालीनतेने पार पाडली. त्याचवेळी त्यांचे विचारमंथन चालूच होते आणि समाजपरिवर्तनाच्या दृष्टीने जे एक एक पाऊल पुढे पडत होते त्यात चैतन्य आणण्यासाठी आपल्याला कोणती पूर्वतयारी करता येईल याचाही ते गंभीरपणे विचार करू लागले होते.

समाजपरिवर्तनाच्या बाबतीत ते किती जागरूक होते याचे एक उदाहरण मला देता येईल, विचार मंथनाच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारसरणीचा आणि तात्विक भूमिकेचा ते बारकाईने अभ्यास करीत होते. एका बौद्धिकाच्या वेळी अस्पृश्यतेबद्दलची तीव्र जाणीव व्यक्त करताना यशवंतराव एकदा म्हणाले होते. "आपण अस्पृश्यांवर फार मोठे अत्याचार करीत आहोत. त्याचप्रमाणे बाबासाहेबांच्यावरही घोर अन्याय सतत करीत आहोत. बाबासाहेबांनी मुंबईच्या विधानसभेत महारवतन रद्द करण्याच्या बाबतीत एक बिल आणले होते. हे वतन हे महार लोकांच्यावर गुलामगिरी लादणारे वतन होते. असा अन्याय कोणत्याही सुसंस्कृत समाजाने चालू ठेवला नसता. पण ते बिल नामंजूर करण्यात आले ही आपल्या समाजाच्या दृष्टीने नामुष्कीची गोष्ट होय." यशवंतराव चव्हाण हे बोलघेवडे समाज-

सुधारक नव्हते, ते कृतिशील नेते होते याचा प्रत्यय पुढे १९६० साली महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री ते झाले त्यावेळी आला. मुख्यमंत्री म्हणून पहिली गोष्ट जर त्यांनी कोणती केलं असेल तर महार वतन रद्द करण्याचे बिल त्यांनी मंजूर करून घेतले ही होय. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल त्यांना नितांत आदर होता. ते आवर्जून म्हणत असत की बाबासाहेबांनी जो लढा लढविला तो अस्पृश्यांच्या जीवन मरणाचा लढा होता. आणि या लढ्यात त्यांना साथ देणे हे त्यांच्या नव्हे, आपल्या समाजाच्या हिताचे आहे.

अस्पृश्योद्धारासाठी महात्मा गांधींनी जी चळवळ केली ती यशवंतरावांना मान्य होती. पण आंबेडकर यांनी अस्पृश्यांच्या मागण्या घटनात्मक मार्गांनी मिळविण्याचा जो प्रयत्न केला तो यशवंतरावांना मूलगामी स्वरूपाचा वाटला. शतकानुशतके दडपल्या गेलेल्या अस्पृश्यांना आपल्या उद्धारासाठी जास्तीत जास्त हक्क व सवलती मिळाल्या पाहिजेत आणि तो त्यांचा हक्कच आहे. ही आंबेडकरांची भूमिका यशवंतरावांना मान्य होती. आणि त्या बाबतीत ते बाबासाहेबांना हिरीरीने पाठिंबा देत असत. यशवंत-रावांनी अस्पृश्यांच्या बाबतीत समाजाला जी शिकवण दिली तो त्यांचा वारसाच आहे असे समजावयास हरकत नाही. त्या शिकव-णुकीचे प्रत्यक्ष आचरण त्यांनी जे केले त्याचे एक उदाहरण देता येण्यासारखे आहे.

बाबासाहेबांनी आपल्या समाजाच्या चिरंतन हितासाठी जेव्हा बौद्धधर्म स्वीकारला तेव्हां नवबौद्धांना अस्पृश्यांना दिल्या जाणाऱ्या सवलती व हक्क दिले जावे किंवा नाही हा वादाचा विषय झाला. यशवंतराव यांनी या वादाच्या बाबतीत निश्चित भूमिका घेतली

ती ही की नवबौद्धांना हे हक्क व सवलती देणे हाच न्यायाचा मार्ग आहे. सबंध देशात यशवंतराव चव्हाण हे एकच मुख्यमंत्री निघाले की ज्यांनी नवबौद्धांना हे हक्क दिले जातील ही घोषणा केली आणि तो अमलात्तही आणली. समाजसुधारणेच्या त्याचप्रमाणे समाजपरिवर्तनाच्या दृष्टीने टाकण्यात आलेले ते अत्यंत महत्वाचे पाऊल होते. डॉ. आंबेडकर यांच्या अनेक प्रकारच्या चळवळीत यशवंतराव प्रत्यक्षपणे भाग घेऊ शकले नाहीत. कारण प्रदेश-राज्यात म्हणा किंवा केंद्रस्थानी म्हणा ते सतत अधिकारस्थानीच राहिले. परंतु ज्या ज्या वेळी त्यांना आपली भावना व्यक्त करण्याचा प्रसंग येत असे त्या त्या वेळी दलितांबद्दलची कणव आणि त्यांच्या न्याय्य हक्कांबद्दलची सारी जाणीव ते प्रगट करीत असत.

यशवंतराव चव्हाण हे सर्वांगीण परिवर्तनाचे भोक्ते होते. विविध विषयांमध्ये त्यांना रस असे. नवनाट्य, नवकाव्य आणि विशेषत: दलितांचे काव्य याबद्दल त्यांना कुतुहल असे. मला आठवते, महाराष्ट्र टाईम्समध्ये आम्ही दलितांची अनेक कवने एकत्रित करून प्रसिद्ध केली होती. सबंध पानच आम्ही त्यासाठी रविवारच्या अंकाचं सुशोभित केलं होतं. त्या सुमारास दिल्लीला गेलो असतांना मी यशवंतरावांना ते सारे पान दाखविले. त्यांनी ते ठेवून घेतले, त वाचले, त्या कवनांचे मनन केले आणि नंतर मला व शंकर सारडा यांना पत्र पाठवून त्यांनी कळविलं की फार मोठी मोलाची सेवा तुम्ही केली आहे. त या पत्रात म्हणाले " दलितांचं हे नवकाव्य पेटून उठलेल्या हृदयांचं काव्य आहे. ते आमच्यापर्यंत अद्याप आलेलं नव्हतं. आम्हाला ते कळलंही नव्हतं. आज आमच्या नजरेस तुम्ही ते काव्य आणल त्याबद्दल धन्यवाद."

समाजपरिवर्तनाच्या मोहिमेला तर्कशुध्द आधार दिला होता तो एम्. एन् रॉय यांनी याची चव्हाणांना कल्पना होती. ते रॉय पंथात समाविष्ट झाले नाहीत. पण रॉय यांच्या ध्येय-धोरणाबद्दल, त्यांच्या कार्यक्रमाबद्दल त्यांना फार आस्था असे. रॉय यांनी आग्रहपूर्वक सांगीतले होते की सारा समाज सुसंस्कृत, नवमतवादी झाल्याशिवाय राजकीय क्रांतीला पूर्णत्व येणार नाही. रॉय यांना सारा समाज विचारी, विज्ञानाबद्दलची आस्था ठेवणारा बनवावयाचा होता. एकतर ज्याला बहुजनसमाज म्हणतात, त्याच्याशी रॉय यांना संपर्क साधावयाचा होता आणि त्या समाजाची बौद्धिक सांस्कृतिक पातळी उच्च दर्जाची त्यांना करावयाची होती. १९३७ साली तुरुंगातून सुटल्यानंतर ते जेव्हा पुण्याला आले तेव्हां त्यांनी आपली एक सभा जेथे मॅन्शनमध्ये घेण्याची सूचना केली होती. रॉय हे मॉस्कोमध्यं मनन, बाचन करीत असताना त्यांनी भारताबद्दल एक उत्कृष्ट पुस्तक लिहिले होते. India in Transition हे त्या पुस्तकाचे नांव. अत्यंत वाचनीय आणि विचार प्रवर्तक ते पुस्तक आहे. त्यात रॉय यांनी वेगवेगळ्या पुढाऱ्यांची भूमिका कशी आहे, त्या भूमिकांमध्ये गुणावगुण कोणते आहेत, त्यांची विचारसरणी पुरोगामी किती आहे, प्रतिगामी किती आहे, समाजपरिवर्तनाबद्दल प्रत्येकाची भूमिका कशी आहे याची चिकित्सा केलेली आहे. रॉय यांची धारणा अशी होती की सामान्य बहुजनसमाज आपल्या आंदोलनामध्ये सामील झाल्याशिवाय त्या आंदोलनाला धार चढणार नाही. जेथे मॅन्शनमध्ये सभा घेण्याची त्यांना कल्पना सुचली त्याचे कारण बहुजनसमाज तेथं एकवटलेला आहे, अशी त्यांची भावना

होती. स्वत: यशवंतरावांनी त्यांना पुढे एकदा प्रश्न केला की जेधे मॅन्शनमध्ये सभा घेण्याची कल्पना तुम्हाला का सुचली. त्यावर रॉय यांनी उत्तर दिले होते, " हा तुमचा समाज आहे आणि या समाजाच्या भावभावना तुम्ही जाणून घेतल्या पाहिजेत हे तुम्हाला दाखवून देण्यासाठी मी जेधे मॅन्शनमध्ये ही सभा घेतली."

रॉय यांना जे समाजपरिवर्तन हवे होते ते प्रबोधनातून होणारे समाजपरिवर्तन होय. अंधश्रद्धा, जाचक रूढी आणि संस्कार झुगारून दिल्या पाहिजेत. आणि तर्कावर आधारलेला विज्ञान-निष्ठ दृष्टिकोण आपण स्वीकारला पाहिजे हा रॉय यांचा आग्रह होता. आज राजीव गांधी ज्या " सायंटिफिक टेंपर "चा पुरस्कार करीत आहेत तो शास्त्रशुद्ध विज्ञाननिष्ठ दृष्टिकोण रॉय यांना हवा होता. यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या परीने तीच विचारधारा समाजापुढे ठेवली. आणि त्या दृष्टीने अधिकारारूढ झाल्यानंतर त्यांनी काही नव्या योजना अंमलात आणल्या, काही नवेनवे संकेत निर्माण केले. हे संकेत शिक्षणाच्या क्षेत्रात त्यांनी आणले. त्यांनी हे जाणले होते की सामान्य, अडाणी, दरिद्री शेतकऱ्याला आणि मजूराला शिक्षण उपलब्ध करून द्यावयाचे असेल तर शिक्षण हे त्यांना माफक मिळेल अशी व्यवस्था करावी लागेल त्या हेतूने त्यांनी एक क्रांतिकारक पाऊल टाकले आणि वर्षाला फक्त १२०० रुपयांपर्यंतचे ज्यांचे उत्पन्न आहे त्यांच्या मुलांना त्यानी शिक्षण सर्वस्वी मोफत केले.

त्याच्या जोडीला समाजप्रबोधनाच्या हेतूने त्यांनी साहित्य-निर्मितीकडे लक्ष पुरविले. महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यावरोबर

धोरणात्मक ज्या घोषणा त्यांनी केल्या त्यांत साहित्य आणि संस्कृति मंडळाच्या स्थापनेला त्यांनी अग्रस्थान दिले. साहित्य संस्कृति मंडळाच्या अध्यक्षपदी त्यांनी गाढे विद्वान तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची नेमणूक केली. त्यांना यशवंतरावांनी सांगितले की तुम्हाला ध्येयधोरण ठरविण्याचा पूर्ण अधिकार राहील आणि सरकारी दडपणे आणि आज्ञा यांचा अडसरही तुमच्या मार्गात येणार नाही. यशवंतरावांना मराठी भाषेत आणावयाचे होते ते मौलिक वाङमय होय-मग ते साहित्य, काव्य, कलेचे असो की विज्ञानाचे असो. यशवंतरावांनी शास्त्रीजींवर जो विश्वास टाकला तो त्यांनी शंभर टक्के फलद्रुप केला ही खरी आनंदाची गोष्ट होय. साहित्य संस्कृति मंडळाने गेल्या वीस वर्षाच्या काळात हजारावर मौलिक ग्रंथ मराठी भाषेत आणले. आणि आजवर अज्ञात राहिलेले साहित्य प्रकाशात आणले. यशवंतरावांनी विश्वकोशाचे (Encyclopedia) कामही शास्त्रीजींकडे सुपूर्द केले. यशवंतरावांचे वैशिष्ट्य असे आहे की ते फारसे बोलत नाहीत, वायफळ चर्चा करीत नाहीत, ते स्वतःच्या विचारात मग्न असतात आणि स्वतःच्या मननातून आपल्या कार्याची दिशा ते ठरवितात. सांस्कृतिक पुनरुज्जीवनाच्या आंदोलनाला त्यांनी जेवढे पाठबळ दिले असेल तेवढे दुसऱ्या कोणत्याही मुख्यमंत्र्याला देता आले नाही ही वस्तुस्थिती आहे. यशवंतरावांना समाजाची काळजी होती, समाजाबद्दल आस्था होती आणि हा समाज उन्नत झाला पाहिजे, विशेषतः ग्रामीण समाज उन्नत झाला पाहिजे हाच त्यांचा ध्यास होता.

ग्रामीण समाजाच्या बाबतीत यशवंतरावांनी जी कामगिरी पार पाडली आहे तिचे मूल्यमापन करताना एक गोष्ट लक्षात

ठेवली पाहिजे की त्यामागील कल्पना मूलतः समाजपरिवर्तनाची होती. गांधीजींच्या ग्राम स्वराज्याच्या कल्पनेला यशवंतराव फार मोठे महत्व देत असत. या कल्पनेचे विकसित स्वरूप म्हणजे रॉय यांची जनसमित्यांची योजना होय. या दोन्ही कल्पनांचा गाभा एकच आहे आणि तो म्हणजे विकेंद्रीकरणाचा. आजच्या जगात केंद्रीकरण इतक्या मोठ्या प्रमाणात झाले आहे की सारी समाजरचना, सारे नियोजन आणि सारा राज्यकारभार केंद्रीभूत झालेला आढळून येतो. म्हणजे वरून येणाऱ्या आदेशानुसार दिल्लीपासून गल्लीपर्यंतचे सारे व्यवहार चालतात. यशवंतरावांना जे विकेंद्रीकरण अभिप्रेत होते ते केवळ औपचारिक नव्हे. त्या विकेंद्रीकरणाचे स्वरूप व्यवहार्य करण्यावर त्यांचा कटाक्ष होता. यशवंतराव यांच्या राजकीय शिक्षणाचे बरेचसे श्रेय गांधीजी आणि नेहरू यांच्या प्रमाणेच रॉय यांच्याकडेही जाते. गांधीजींनी ग्रामस्वराज्याच्या कल्पनेतून त्यांच्या मनावर हे बिंबविले की नेतृत्व त्याचप्रमाणे राज्यकारभाराची सूत्रें तळागाळातील लोकांमधूनच विकसित झाली पाहिजेत. नेहरूंनी समाजवादाचे ध्येय त्यांच्यासमोर ठेवले आणि सर्वांगीण नियोजनाच्या भूमिकेचा पुरस्कार केला. रॉय यांनी स्वातंत्र्यपूर्वकाळात प्राथमिक काँग्रेस समित्या या संघर्षाच्या घटक त्याचप्रमाणे सत्तेच्या घटक झाल्या पाहिजेत असा दृष्टिकोण पुढे मांडला. त्यानंतरच्या काळात काँग्रेस समित्यांच्या जागी त्यांनी जनसमित्यांची प्रतिष्ठापना केली. या तिन्ही नेत्यांना सामाजिक परिवर्तनाचे उद्दिष्ट कशा रीतीने साध्य करून घ्यावयाचे होते त्याची कल्पना या विवेचनातून येऊ शकेल.

यशवंतरावांनी व्यवहार्य पद्धतीने विकेंद्रीकरणाची योजना अंमलात आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी चाणाक्षपणाने एक धोरण स्वीकारले आणि ते हे की ज्या जिल्हा परिषदा निवडल्या जातील त्यांच्या हाती सत्ता तर हवीच पण आर्थिक सामर्थ्यही त्यांना उपलब्ध करून दिले पाहिजे. म्हणून जिल्हा परिषदा समृद्ध तशाच प्रभावी करण्यावर त्यांनी भर दिला. आता प्रत्यक्षपणे जिल्हा परिषदांचा कारभार कसा चालला आहे, त्यांची कार्यपद्धती कशी आहे, त्यांच्या कार्यात त्रुटी किती आहेत, त्यांचे यशापयश कोणते हा प्रश्न अलाहिदा आहे. यशवंतराव चव्हाण यांनी मूलभूत रचना केली आणि प्रत्येक जिल्ह्याच्या कारभारासाठी जिल्हापरिषदांना विशिष्ट अधिकार बहाल केले, त्यांना सर्व सोयी सवलती उपलब्ध करून दिल्या आणि या जिल्हा परिषदा जिल्ह्याच्या भवितव्याच्या शिल्पकार झाल्या पाहिजेत हे उद्दिष्ट त्यांच्यापुढे ठेवले. त्यातून जे समाजपरिवर्तन झाले आहे. ते प्रत्यक्षपणे आपल्या प्रत्ययास येत आहे. यशवंतरावांना भूषण मानता येईल ते हे की महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांचा प्रयोग सर्वश्रेष्ठ ठरला आहे असा निर्वाळा निरनिराळ्या तज्ज्ञांकडून दिला जात आहे.

सामान्य जनतेच्या जीवनाला कोणती दिशा दाखविली पाहिजे याचे एक चित्र यशवंतरावांनी आपल्या डोळ्यांसमोर उभे केले होते. त्यात विकेंद्रीकरणाला जसे महत्वाचे स्थान आहे. तसेच सहकारी संघटनांनाही आहे. प्रबळ अशा सहकारी संस्था, सहकारी साखर कारखाने, सहकारी बँका महाराष्ट्रातच प्रामुख्याने निर्माण झाल्या. सहकारी उद्योगधंदे उभारण्यालाही यशवंतरावांनी चालना दिली. धनंजयराव गाडगीळ यांच्या प्रेरणेने ही सहकारी

चळवळ फोफावत गेली. यशवंतरावांनी समाजसमृद्धीसाठी या चळवळीला उत्तेजन दिलं आणि ते उत्तेजन देताना या घटकांमागे अर्थबळ उभे केले. सहकारी साखर कारखान्यांचे जे जाळे महाराष्ट्रात पसरले त्यांनी सारे समाजजीवन ढवळून निघालें. आज प्रबळ आर्थिक पायावर हे कारखाने उभे राहिलेले आहेत आणि त्यांच्यामुळे आजूबाजूचा सारा परिसर उजळून निघत आहे. त्या परिसरात औद्योगिक वसाहती तयार होत आहेत. आणि त्या औद्योगिक वसाहतीतून निर्माण होणाऱ्या उत्पादनासाठी प्रचंड गुदामे, मार्केटिंग यार्डस, मार्केटिंग फेडरेशन्सही तयार केली जात आहेत. समाजपरिवर्तनाच्या या मूलभूत कार्याचा पाया यशवंतरावांनी घातला. आता शिक्षण, विधवा विवाह, सामाजिक सुधारणा यापुरतेच समाज परिवर्तन मर्यादित राहिलेलं नाही. समाजपरिवर्तनाचा जो गाभा आहे तो असा की यातून दुबळा, अडाणी, पीडलेला समाज समृद्धीकडे वाटचाल करू लागावा. महाराष्ट्राचे समाजजीवन आज आमूलाग्र बदलत चाललेले आहे आणि त्या नव्या जीवनाचे शिल्पकार हे खरे यशवंतराव चव्हाणच होते. कारण त्यांच्याच चैतन्यमय प्रेरणेमुळे असे पुढारी निर्माण झाले की ज्यांनी त्यांच्या कार्यक्रमाचा वारसा चालविला आणि असे उद्योग, व्यवसाय निर्माण झाले की ज्यातून ग्रामीण महाराष्ट्राचा कायापालटच झाला.

त्या कायापालटाबद्दल वस्तुतः यशवंतरावांनी स्वतःच लिहावयाला पाहिजे होते असे मला वाटते. त्यांचं लेखन जे काही झालं ते कसं रसरशीत होतं, शैलीदारही होतं. त्याना लेखनासाठी वेळ मिळाला नाही हे खरे. ते जर साहित्य लेखनात पडले असते

तर समाजपरिवर्तनाच्या बाबतीतील त्यांच्या कार्याबद्दल त्यांना विचारप्रवर्तक असं लिहिता आलं असतं. त्यांच्याशी गप्पागोष्टी करण्याची मला संधी मिळत असे त्यावेळी त्यांचे वाचन आणि व्यासंग यांची मला कल्पना होत असे. मग मी विचार करीत असे की यशवंतराव दिल्लीच्या कामामध्ये, व्यापामध्ये आणि राज्य-कारभाराच्या तापामध्ये गढून गेलेले असतानाही पुस्तकामध्ये ते किती मग्न झालेले दिसून येत आहेत. त्यांचे ग्रंथालय मोठे होते आणि उत्कृष्टही होते. सगळी महत्वाची, विविध विषयांवरील पुस्तके ते स्वतः विकत घेत असत आणि रात्ररात्र जागून वाचून काढीत असत. त्यांच्या आवडीचे जे विषय असत त्यावरील पुस्तकांवर वर ते झेप टाकीत असत. मला आठवते व्ही. बी. कर्णिक यांनी एम्. एन्. रॉय यांच्यावर ६००–६५० पानांचा जो चरित्र-ग्रंथ लिहिला होता तो भेटीदाखल त्यांना देण्यासाठी मी त्यांच्या दिल्लीतील निवासस्थानी गेलो होतो. पण ते पुस्तक पहाताच यशवंतरावांनी त्याची किंमत पाहिली आणि न बोलता ते घरात गेले. येताना १२४ रुपये ते घेऊन आले आणि त्यांनी ते माझ्या हाती ठेवले मी त्यांना म्हटले "हे सप्रेम भेट म्हणून मला द्यावयाचे होते पुस्तक" त्यावर ते हसले आणि म्हणाले "मला हे पुस्तक भेट म्हणून नको आहे. मी ते विकत घेणार आहे." ते पुढे म्हणाले "व्ही. बी. कर्णिकांना म्हणावे की या पुस्तकाच्या ५० प्रती माझ्याकडे पाठवून द्या. आमचे गुरु किती श्रेष्ठ होते याचा इतिहास माझ्या साऱ्या मित्रांना या चरित्रग्रंथांतून कळेल आणि त्यातूनच मला खरे समाधान होईल."

वाचनाची आणि पुस्तकांची त्यांच्यामध्ये ही जी गोडी होती त्यामागे सुद्धा ही भावना होती की आपल्या समाजाला यातून काही नवीन मार्ग दिसेल, ज्ञानाची भांडारे त्या समाजापुढे खुली होतील. यशवंतराव ज्या परिस्थितीत वाढले ती परिस्थिती मी प्रत्यक्ष पाहिलेली आहे. अगदी गरीबीतून त्यांचे जीवन गेले. मला आठवतं कराडच्या एका घरात दुसऱ्या मजल्यावरील एका खोलीत ते रहात होते तेव्हा त्या खोलीत एक कांबळेच तेवढे पसरलेले होते. यशवंतरावांना त्या दारिद्र्याची कधी खंत वाटली नाही. शिक्षण घेत असतानाच त्यांनी भरपूर वाचन केलं. निर–निराळ्या लोकांशी संपर्क साधला आणि विचारपूर्वक पण नेटानं आणि निर्धारानं आपल्या जीवनाची आखणी केली. यशवंतराव जे कर्तृत्ववान जीवन जगले त्याचे श्रेय मी त्यांना स्वतःलाच देईन. ते जन्मभर शिकत राहिले आणि त्या शिक्षणाचा त्यांनी समाज–परिवर्तनाच्या आपल्या ध्येयासाठी उपयोग करून घेतला.

असा एक समर्थ माणूस महाराष्ट्रामध्ये जन्माला आला हे खरोखरच आपलं भाग्य आहे. यशवतरावांनी आयुष्यामध्ये जे जे काही कार्य केले त्या कार्याला एक दिशा होती, त्याला एक अधिष्ठान होतं. पण त्या अधिष्ठानाच्या मागे जी भूमिका होती ती समाजाचं हित साधावं ही होती. ते हित साधण्याच्या दृष्टीने त्यांनी आपल्यापरीने प्रयत्न केला. सुदैवाने त्याला साथ चांगली मिळाली. पण कोणत्याही अडचणी आल्या तरी यशवंतराव कधी विचलित झाले नाहीत. आपल्या ध्येयापासून आणि तत्वापासून ते कधीही ढळले नाहीत.

आज मला अभिमानानं सांगावसं वाटतं की त्यांच्या सहवासात वेळोवेळी राहण्याचं मला भाग्य लाभलं, साऱ्या संकटातून, तापातून आणि ताणातून त्यांचं जीवन गेलं. मला आठवतं मुंबईहून दिल्लीला ते आले की मी त्यांच्या हाती सिगारेटचा डबा आहे किंवा नाही हे पहात असे त्यातून त्यांच्या मनावर किती ताण आहे त्याचा मला बोध होत असे. या ताणा-बद्दल बोलताना ते मला म्हणाले " ताण कधीच कमी व्हायचा नाही. तो आमच्या जीवनाचा स्थायीभाव झालेला आहे. हे राजकारण असे आहे, आणि त्यात असे पवित्रे घेतले जातात, अशा काही, घडामोडी होतात की ताण पडल्याशिवाय जगणंच शक्य होणार नाही. " ते स्वतः अतिशय विचारी. आपल्या भावना त्यांनी कधी कोणाला कळू दिल्या नाहीत, आपलं मनही त्यांनी सहसा प्रगट होऊ दिलं नाही. त्यामुळे इतर नेत्यांच्या जशा चुका झाल्या तशा यशवंतरावांकडून झाल्या नाहीत. पण राजकीय परिस्थिती ही अशी बदलत असते आणि तिचे परिणाम असे काही अघटित होत असतात की तेथे विचार आणि तर्क-शुद्धता आणि न्यायाची भावना याना स्थान रहात नाही काही वेळी प्रवाहपतिताप्रमाणे व्यक्तीला आपल्या अपरोक्ष वाहत जावे लागते. सबंध जन्मभर राजकारण केल्यानंतर आणि बहुशः यशस्वीपणे केल्यानंतर यशवंतरावांना काहीशी माघार घेण्याची वेळ आली. पण त्याहीवेळी विचारपूर्वक त्यांनी पाऊल टाकले. आणि त्यावेळी नेत्यांच्या वा जनतेच्या भावभावनांचा त्यांनी विचार केला नाही. लोकप्रियतेकडेही पाठ फिरविली आणि मनाने जी त्यांना ग्वाही दिली त्या ग्वाहीनुसार ते स्वगृही परत आले.

आणि निश्चितपणाने त्यांनी समाजपरिवर्तनाचे अपुरे कार्य पुन्हा हाती घेतले. यशवंतराव चव्हाण हे अनेक कार्यासाठी, आंदोलनासाठी सतत आठवले जातील. पण त्यांच्याविषयी एक निर्वाळा मात्र दिला जाईल की महाराष्ट्रात समाजपरिवर्तनाची जी दिंडी अव्याहत चालू राहिली आहे तिच्यामधील अग्रस्थानीचे वारकरी म्हणून यशवंतराव चव्हाण यांचे नाव अभिमानाने घेतले जाईल.

यशवंतराव चव्हाण :
काँग्रेस संस्कृतीचे उपासक व प्रवक्ते

– द्वा. भ. कर्णिक

१३ मार्च १९८६

१९८१ सालच्या सुमाराला यशवंतरावांनी एक दिवस घोषणा केली की मी आता स्वगृही परत जात आहे. लोकांनी त्यांच्यावर कडक टीका केली. काही लोकांनी त्यांचा उपहास केला आणि काही लोकांनी म्हटले की हा केवळ संधीसाधुपणा आहे, ही लाचारी आहे. मी मात्र त्या घोषणेचा विचार करताना एक लेख लिहिला, त्यात यशवंतरावांच्या या घोषणेचे स्वागत केले आणि असं सांगितलं की यशवंतरावांना स्वगृही जाण्याखेरीज गत्यंतरच राहिलेलं नाही. आता स्वगृही म्हणजे अर्थातच इंदिरा काँग्रेसमध्ये सामील होणे. यशवंतरावांचे सबंध जीवन माझ्या

डोळ्यासमोरून गेलेले आहे, त्या जीवनामध्ये निष्ठा व्यक्त झाली असेल तर ती फक्त इंडियन नॅशनल काँग्रेसला. काँग्रेसचे ते पहिल्यापासून सेवक होते, निष्ठावान सेवक होते. मी कालच्या व्याख्यानात सांगितलं होतं की वयाच्या १७ व्या वर्षी त्यांनी काँग्रेसच्या आंदोलनात भाग घेतला आणि तेव्हापासून अखेरपर्यंत त्यांनी राजकारण सोडलं नाही, समाजकारण सोडलं नाही आणि काँग्रेसही सोडली नाही. आता काँग्रेस संस्कृती म्हटले की बरेचसे लोक उपहासाने उद्‌गार काढतात की ही कसली संस्कृती ? पण मी ज्या काँग्रेस संस्कृतीचा विचार करतो आहे, किंवा विचार करणार आहे, ती यशवंतरावांच्या काळातील काँग्रेस संस्कृती होय. माझ्या दृष्टीने यशवंतरावांचे दोन गुरु होते. एक महात्मा गांधी, ज्यांना मी त्यांचे आध्यात्मिक गुरू म्हणतो. आणि दुसरे वैचारिक गुरू पंडित जवाहरलाल नेहरू. काँग्रेसमध्ये गेल्यानंतर किंवा जाण्यापूर्वी सुद्धा यशवंतरावांनी जी ध्येयदृष्टी ठेवली ती ध्येयदृष्टी देण्याचं श्रेय या दोन, त्यांनी मानलेल्या गुरूंचे आहे. तो संपूर्ण कालखंड पाहिला तर तुम्हाला सांगतो, यशवंतराव या दोन गुरूंच्या पासून कधीही अलग झाले नाहीत हे तुम्हाला आढळून येईल.

•

मला एक प्रसंग आठवतो, १९३७ साली एम्. एन्. रॉय तुरुंगातून सुटून बाहेर आले आणि त्यांनी लगेच काँग्रेसमध्ये अधिकृतपणे प्रवेश केला. यशवंतरावांच्या संस्कारक्षम मनावर त्याचा फार परिणाम झाला. ज्याला Impact म्हणता येईल तो झाला. त्याक्षणी यशवंतरावांचे बौद्धिक गुरू म्हणून एम्. एन्. रॉय

स्थानापन्न झाले. त्यांना त्यावेळी साथ लाभली ती त्यांच्याच जिल्ह्यातील काही प्रमुख कार्यकर्त्यांची, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, ह. रा. महाजनी, भय्याशास्त्री वाटवे वगैरे ते कार्यकर्ते होते. आत्माराम बापू पाटीलही रॉयवाद्यांच्या पंथात सामील झाले होते. या मंडळींच्या सहवासात यशवंतरावांना रॉयवादाचे बाळकडू पाजले गेले होते. मला आठवते की सांगली जिल्ह्यातील तासगाव येथे जी एक परिषद भरविण्यात आली होती त्या परिषदेत यशवंतराव चव्हाण हे रॉय यांच्या व्यासपीठावर उभे राहिले होते. रॉय यांची निष्ठा काँग्रेसला होती; काँग्रेसच्या नेतृत्वाला नव्हती. त्यांचा सिद्धान्त म्हणा, भूमिका म्हणा अशी होती की काँग्रेसचे नेतृत्व लढाऊ वृत्तीच्या आणि कधीही तडजोड न करणाऱ्या ध्येयवाद्यांच्या हाती असले पाहिजे. त्या जहाल नेतृत्वाची संघटना उभारणे हे रॉय यांचे काँग्रेसमधील खरेखुरे आणि नियोजित कार्य होते. रॉय यांच्या दृष्टीसमोर काँग्रेसचे जे चित्र उभे होते ते असे की आज जरी काँग्रेसचे दरवाजे सर्व प्रकारच्या लोकांना, म्हणजे शेतकरी, कामकरी, मध्यमवर्गीय लोक, भांडवलदार आणि जमीनदार यांना मोकळे असले तरी कालांतराने चळवळीच्या दडपणाखाली यातील काही वर्ग साम्राज्यशाही-विरोधी आंदोलनातून बाहेर पडण्यासाठी ब्रिटिश साम्राज्यशाहीशी तडजोड करण्याचाही प्रयत्न करतील आणि म्हणून लढाऊ काँग्रेसजनांनी या वर्गांकडे आणि त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पुढाऱ्यांकडे कटाक्षाने लक्ष पुरविले पाहिजे आणि संभाव्य तडजोडीची मुळेच खुडून टाकली पाहिजेत. त्या दृष्टीने रॉय यांनी प्रतिस्पर्धी नेतृत्वाची कल्पना पुढे मांडली. अर्थातच गांधीजी, नेहरू या अधिष्टित नेतृत्वाला ते देत असलेले हे आव्हान होते.

या भूमिकेच्या बाबतीत यशवंतरावांच्या पुढे साहजिकच पेच निर्माण झाला. त्यांनी आधीच गांधीजी आणि नेहरू यांना आपली निष्ठा वाहिलेली होती आणि काँग्रेसचा जो प्रवाह म्हणून त्यांनी मानला होता त्यात अखंडपणे वाहत राहण्याची जणू त्यांनी खूणगाठ बांधली होती. अशा परिस्थितीत साहजिकच त्यांना वाटले की रॉय यांच्या बरोबर प्रतिस्पर्धी नेतृत्व निर्माण करण्याला आपणे मान्यता दिली तर काँग्रेसच्या प्रवाहापासून आपण दूर फेकले जाणार नाही काय? काँग्रेस संस्कृतीचा स्वीकार केल्यानंतर विचारांची दिशा कशी ठरते याचे हे एक उदाहरणच मानता येईल.

एम् एन्. रॉय यांच्यासारखा एक श्रेष्ठ पुढारी आणि निरनिराळ्या देशांमधील क्रांत्यामध्ये सहभागी होणारा एक क्रांतिकारक विचारवंत एका बाजूला संदेश देत असतानाही यशवंतराव काँग्रेसच्या अधिकृत प्रवाहापासून अलग झाले नाहीत यातूनच त्यांची मूलभूत निष्ठा प्रतीत होते असे मला वाटते. त्यानंतर ते रॉय पंथातून अलग झाले व गांधी आणि जवाहरलाल नेहरू यांच्या निखालस राष्ट्रवादी प्रवाहात कायम राहण्याचं त्यांनी ठरविलं. आता एक रॉयवादी म्हणून त्यांच्या या भूमिकेबद्दल मला कोणी विचारलं असतं तर मी त्या भूमिकेला मान्यता दिली नसती हे उघड आहे. पण आज मात्र माझ्या मनात विचार येतो की यशवंतरावांचं जे जीवन विकसित झालं, त्यांनी जे कार्य केलं, जे कर्तृत्व गाजविलं, त्याचा साकल्याने विचार केला तर काँग्रेसच्या प्रवाहामधून ते बाहेर पडले असते तर त्यांना निश्चितपणे ही कामगिरी बजावता आली नसती. कल्पना करा, यशवंतरावांनी

काँग्रेसचे कार्यकर्ते, काँग्रेसचे मंत्री म्हणून देशाची जडणघडण घडविण्याच्या कामी जे कर्तृत्व गाजविलं ते आमच्या बरोबर राहिले असते तर त्यांना साध्य करता आले असते का ? काँग्रेस-ची संघटना किती प्रबळ होती याची कल्पना करावयाची झाली तर काँग्रेस संघटनेमधून वेळोवेळी जे बाहेर पडले त्यांचे भवितव्य पुढे काय घडले याचा क्षणभर विचार करूया. हे श्रेष्ठ पुढारी होते, कर्तबगार होते. हेच पाहा ना सुभाषबाबू हे धीरोदात्त पुढारी होते. त्यांनी दिगंत कीर्ती मिळविली हे खरे आहे. पण या देशात त्याना आपला वेगळा पक्ष वनविता आला नाही. काँग्रेस-मधून बाहेर पडलेल्या लोकांना, मग ते काँग्रेस समाजवादी असोत, रॉयवादी असोत, कम्युनिस्ट असोत किंवा आचार्य कृपलानी आणि रफी अहमद किडवाई यांच्यासारखे थोर व्यक्तिगत पुढारी असोत पण काँग्रेसच्या प्रवाहापासून अलग झाल्यानंतर त्यांच्यापैकी कोणालाही निराळं भवितव्य घडविता आलं नाही, त्यांना देशाच्या राजकारणावर, समाजकारणावर आपला प्रभाव पाडता आला नाहीं. ती चूक यशवंतरावांनी केली नाही असं माझं मत आहे. त्यामुळेच त्यांच पुढचं जीवन उन्नत होत गेलं, विकसित होत गेलं.

यशवंतरावांच्या भावना विचारात घेताना स्वतः रॉय यांनी एकेवेळी जो निर्वाळा दिला होता त्याकडे मी आपले लक्ष वेधू इच्छतो, त्यांनी तुरुंगातून काँग्रेस समाजवादी पक्षाला उद्देशून पत्रे लिहिली त्यात त्यांनी अशी भूमिका घेतली की काँग्रेस ही एक चळवळ आहे. आंदोलन आहे. आणि निरनिराळ्या वर्गाच्या लोकांना त्यात स्थान आहे. आता या संघटनेमध्ये जर कोणी

समाजवादी पक्ष काढला तर त्याचा परिणाम काय होईल याचा विचार करा. एकतर काँग्रेस त्यामुळे प्रबळ राहणार नाही आणि दुसरी त्याहिपेक्षा महत्वाची गोष्ट म्हणजे तुम्ही त्या संघटनेमधून बाहेर फेकले जाल. म्हणून रॉय यांनी स्पष्टपणे सूचित केले की काँग्रेस समाजवादी पक्षाने काँग्रेसमध्ये समाजवादी पक्ष संघटित करू नये तर काँग्रेस ही जी प्रचंड साम्राज्यशाहीविरोधी चळवळ आहे, ती प्रबळ करण्यासाठीच आपली शर्थ करावी. रॉय यांनी हा जो संदेश दिला तोच यशवंतरावांनी जन्मभर आचरणात आणण्याचा प्रयत्न केला.

याच दृष्टिकोणातून आपण निःपक्षपातीपणाने तसेच बुद्धिनिष्ठ पद्धतीने संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाचा विचार केला पाहिजे. या आंदोलनाच्या बाबतीत यशवंतरावांनी जी भूमिका घेतली ती ही की कोणत्याही परिस्थितीत आपण काँग्रेसच्या प्रवाहापासून अलग होणार नाही. फलटण येथे भाषण करताना त्यांनी निर्भीडपणे जाहीर केलं की संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाला पाहिजे यात तिळमात्रही संदेह नाही. पण संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेपेक्षाही नेहरूंचं नेतृत्व टिकवून धरणं हे आपल्याला आवश्यक वाटतं. त्या भाषणावर सडकून टीका झाली. हा संधि-साधुपणा आहे, नेहरूंचं मन काबीज करण्याचा हा प्रयत्न आहे. आणि संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात फूट पाडण्याचा हा डाव आहे असंही त्यावर भाष्य करण्यात येऊ लागलं. पण यशवंतरावांच्या काँग्रेसनिष्ठेचा प्रत्यय आणणारी ही आणखी एक भूमिका होय असं मी तरी निदान त्या भूमिकेचं समर्थन करू शकतो.

यशवंतरावांच्या डोळ्यासमोर जो दृष्टिकोण होता तो हा की संयुक्त महाराष्ट्राचं आंदोलन यशस्वी होईल ते संघर्षातून होणार नाही; मतपरिवर्तनातून होईल. काँग्रेसच्या संस्कृतीचा तोच गाभा आहे. आता या ठिकाणी नेहरूंचं नेतृत्व टिकवून धरावयाचं असेल तर त्यांचं मतपरिवर्तन करूनच संयुक्त महाराष्ट्र मिळविला पाहिजे अशी यशवंतरावांनी भूमिका घेतली. पुढे या मतपरिवर्तनाचा प्रत्ययही आला. म्हणजे संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश एकट्या यशवंतरावांनी आणला असं माझं म्हणणं नाही. मुळीच नाही. प्रचंड चळवळ झाली, प्रचंड त्याग झाला, प्रचंड बलिदान झालं. असंख्य लोकांनी त्या चळवळीत भाग घेतला त्यातून महाराष्ट्राची स्थापना झाली आणि त्याचे श्रेय सर्वांनाच द्यावयाला पाहिजे. परंतु असा विचार मनात आल्यावाचून रहात नाही की जर हे मतपरिवर्तन घडून आलं नसतं तर संयुक्त महाराष्ट्र मिळाला असता का ?

आता काँग्रेसच्या एकंदर परंपरेचा विचार केला तर एक गोष्ट स्पष्ट होते की काँग्रेसचे नेतृत्व हेच कोणत्याही बाबतीत निर्णय घेण्याच्या दृष्टीने आपला अधिकार गाजवीत असते. ही परंपरा फार जुनी आहे आणि गांधीजी, सरदार पटेल, नेहरू यांनी ती परंपरा सतत चालत ठेवलेली आहे. राज्यपुनर्घटनेच्या वेळी अर्थातच नेहरू, इंदिरा गांधी आणि पंडित गोविंद वल्लभ पंत यांच्या हाती हा निर्णयाचा अधिकार होता आणि उघडच आहे की त्यांचे मतपरिवर्तन घडून आल्याशिवाय मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना होणे शक्य नव्हते. मुंबईसह हा शब्दप्रयोग मी मुद्दाम वापरीत आहे. कारण सबंध राज्यपुनर्रचनेत मुंबईच्या

भवितव्याबद्दलच मुख्यतः सगळी रणे माजली आणि संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेच्या बाबतीत खराखुरा अडसर आला तो मुंबईच्या भवितव्याबद्दलच होय. आता यशवंतरावांना काँग्रेसच्या परंपरेची पुरेपूर कल्पना होती. पंडितजींच्या निर्णायक सर्वाधिकाराचीही त्यांना जाणीव होती. त्या जाणीवेमुळेच फलटणच्या भाषणात त्यांनी इशाराच दिला होता की पंडितजींना डावलून देशातील कोणतेही प्रश्न सोडविता येणार नाहीत. त्यांची सारी धोरणे, आणि डावपेच त्या जाणीवेच्या आधारावरच अवलंबून राहिलेली असत.

त्यावेळच्या इतिहासाची जेव्हां मी आठवण करतो तेव्हां मला एक योगायोग विलक्षण प्रत्ययकारी वाटतो. तो योग म्हणजे इंदिरा गांधी यांची काँग्रेसच्या अध्यक्षपदावर नियुक्ती होणे हा होय. त्यांच्या अध्यक्षतेखाली चंडीगढ येथे काँग्रेसचे जे अधिवेशन भरले त्यात या प्रश्नाला आकस्मिकपणे चालना मिळाली. इंदिराजींचे माझ्या दृष्टीने जे एक वैशिष्टच होते ते हे की त्या निर्णय घेण्यात पटाईत होत्या आणि एकदां निर्णय घेतल्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्यात त्या कधीही कसूर करीत नसत. खरे सांगावयाचे तर संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेबद्दलचा सरकारी निर्णय घेण्याचे श्रेय जर कोणाला द्यावयाचे झाले तर ते इंदिरा गांधींनाच द्यावे लागेल. प्रथम त्यांनीच या प्रश्नात लक्ष घातले आणि त्यांना असे आढळून आले की महाराष्ट्रावर हा अन्याय केला जात आहे. त्यांनी आपले मत पंडितजींना कळविले आणि पंडितजींनी त्यावेळचे गृहमंत्री पंडित गोविंद वल्लभ पंत यांच्याशी याबद्दल चर्चा केली. भाषिक पुनर्रचनेच्या बाबतीत सारी कर्तुमकर्तुम शक्ती पंतजींच्या

हाती होती. पंडितजी व इंदिराजी यांचे मतपरिवर्तन होत असल्याचे पहाताच पंतजींनी हा प्रश्न इंदिराजींकडे सोपविला आणि त्यांना हा प्रश्न सोडविण्याचा अधिकार दिला. इंदिरा गांधी यांनी चंदीगढच्या अधिवेशनात एक समिती नेमली आणि तिच्यापुढे हा प्रश्न ठेवला एवढेच नव्हे तर तात्काळ निर्णय घेण्याची विनंती केली. हीच ती नऊ सदस्यांची समिती होय. त्या समितीत यशवंतराव चव्हाण यांच्या गटाचे प्राबल्य होते. बहुधा इंदिरा गांधीनी त्या दृष्टीनेच समितीची रचना केली असावी.

आता गंमत म्हणून एक आठवण सांगतो. चंदीगढचे राज्यपाल त्यावेळी काकासाहेब गाडगीळ हे होते. त्यांनी काँग्रेस नेत्यांसाठी एक स्वागत समारंभ आयोजित केला होता. मी त्या समारंभाला हजर होतो. आणि म्हणून प्रत्यक्ष पाहिलेली घटना म्हणून मी सांगतो. यशवंतरावांची आणि पंडित पंतांची त्या समारंभात भेट झाली तेव्हां पंडित पंत क्षणभर थबकले आणि यशवंतरावांना म्हणाले "यशवंतरावजी, खूष आहात ना आता तुम्ही" ते ऐकताच पत्रकारांना एक स्कूप मिळाला. त्यांनी लगेच एक 'फ्लॅश' न्यूज दिली "संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न आता मिटण्याच्या मार्गावर आहे." थोड्याच दिवसात हा प्रश्न मिटलाही. महत्वाची गोष्ट ही की मतपरिवर्तनावर यशवंतरावांनी जी भिस्त ठेवली होती ती फळास आली.

काँग्रेस संस्कृतीची ज्यावेळी आपण चिकित्सा करू लागतो त्यावेळी ती गांधी-नेहरूंच्या काँग्रेसची संस्कृती आहे हे आपण लक्षात ठेंवले पाहिजे. त्या संस्कृतीत ध्येयवाद होता. प्रचंड

ध्येयवाद होता आणि त्या ध्येयवादाचे उद्दिष्ट काय होते ? राष्ट्रीय एकात्मता, धर्मनिरपेक्षता आणि समाजवादी निष्ठा. यशवंतरावांना अभिप्रेत होत्या त्या या तीन निष्ठा. त्याच्या जोडीला महात्मा गांधींची सत्याग्रही निष्ठा येते त्याचप्रमाणे गांधीजींनी नैतिक आचाराचा जो आदर्श उभा केला, जे संस्कार निर्माण केले त्यांचाही समावेश होतो. आजच्या काँग्रेस संस्कृती-वद्दल कोणाला काय म्हणावयाचे असेल ते त्यांनी म्हणावे. पण यशवंतरावांच्या वेळी जी संस्कृती रूढ होती तिचा निकष आपण त्यांच्या कृतीला लावला पाहिजे.

काँग्रेसच्या संस्कृतीत मी आधी म्हटल्याप्रमाणे कॉन्सेन्ससला अग्रस्थान असे. वस्तुतः कॉन्सेन्सस हा शब्दप्रयोग यशवंतरावांनीच काँग्रेसमधील सत्तास्पर्धेच्या, वारसदाराच्या निवडीबद्दलच्या वेळी प्रथम उद्घोषित केला. पंडितजींच्या निधनानंतर जेव्हां त्यांचा वारसदार आणि भारताचा पंतप्रधान निवडण्याची वेळ आली तेव्हां यशवंतराव या देशात नव्हते. ते अमेरिकेला गेलेले होते. मध्यरात्रीच्या सुमारास त्यांना पंडितजींच्या निधनाची बातमी सांगण्यात आली आणि अमेरिकेचे विख्यात परराष्ट्रमंत्री डीन रस्क यांनी स्वतः त्यांना सांगितले की माझ्याबरोबर विमानाने भारतात चला, तुमचे सारे अमेरिकेतील कार्यक्रम रद्द करण्यात आलेले आहेत. यशवंतराव आणि डीन रस्क हे नंतर पंडितजींच्या अंत्ययात्रेत सामील झाले. दुसऱ्याच दिवशी यशवंतरावांनी जाहीर केले की पंडितजींचा वारसदार कॉन्सेन्ससने निवडण्यात यावा. ते म्हणाले " काँग्रेस पक्षाचे जें पुढारी आहेत, पार्लमेंटचे सभासद आहेत, निरनिराळ्या प्रदेश राज्यांचे मुख्यमंत्री आहेत त्यांच्या

विचाराने ही निवड व्हावी आणि संघर्षातून नव्हे तर सर्वसंमतीने भावी पंतप्रधानांच्या निवडीवर शिक्कामोर्तब करण्यात यावे." यशवंतरावांच्या आयुष्यात ज्या ज्या वेळी संघर्ष उभे राहिले त्या त्या वेळी प्रत्येक निर्णय घेताना त्यांनी कॉन्सेन्ससच्या बाजूनेच कौल दिला. यशवंतरावांच्या राजनीतीचं हे खरं स्वरूप आहे, आता मतपरिवर्तन कसं घडवायचं, त्यासाठी कोणते मार्ग स्वीकारावयाचे हा प्रश्न अगदी वेगळा आहे. परंतु एकंदर ध्येय ठरविताना मतपरिवर्तनाला जास्त महत्व द्यावं हीच यशवंतरावांची भूमिका होती. ही भूमिका राजकारणामध्ये जशी त्यांनी चालू ठेवली त्याचप्रमाणे समाजकारणामध्येही त्यांनी उपयोगात आणली. शक्यतो संघर्ष होऊ द्यायचा नाही, लोकांना सांभाळून घेऊन, त्यांची मने मिळवून राज्यकारभार करावयाचा ही यशवंतरावांची राजनीती होती आणि ती कॉन्सेन्सस या एकाच शब्दातून ती दिग्दर्शित होते.

हे कॉन्सेन्सस कसे घेतलें गेले याची कहाणी मात्र मोठी मनोरंजक आहे. त्यावेळी कामराज हे काँग्रेसचे अध्यक्ष होते आणि सर्वाधिकारीही होते यशवंतरावांच्या सूचनेप्रमाणे सर्व पुढाऱ्यांचे मत ऐकून घेण्याचे आणि विचारांती व सार्वमताच्या आधारे निर्णय घेण्याचे कार्य कामराज यांच्याकडे सोपविण्यात आले होते. पण वस्तुस्थिती अशी होती की कामराज आणि त्यावेळी अस्तित्वात असलेला सिंडिकेटचा गट यांचे एका बाबतीत निश्चित मत ठरले होते की कोणत्याही परिस्थितीत मोरारजी देसाई हे पंतप्रधान होऊ नयेत. म्हणून प्रत्यक्षपणे घडून येत असे ते असे की काँग्रेसचे पुढारी, मुख्यमंत्री त्यांच्यापुढ आले की आधीच ते प्रश्न

करावयाचे, " नो मोरारजी ?" आणि त्यांनी मान हलविण्याच्या अगोदर कामराज जाहीर करावयाचे " परक्कलम " म्हणजे प्रश्न मिटला. ही वस्तुस्थिती ' फार्स ' म्हणण्याइतकी उघड होती. त्यामागे मुख्य कारण होते ते असे की त्यावेळी लालबहादूर शास्त्री हे अत्यंत लोकप्रिय होते आणि सिंडिकेटचा कल त्यांच्याकडे झुकलेला होता. खरे सांगावयाचे तर भुवनेश्वरच्या अधिवेशनात पंडितजींना पक्षघाताचा झटका आला आणि त्याचवेळी त्यांचे ॲक्टिव्ह लाईफ नाहीसे झाले, त्यापूर्वी कामराज योजनेनुसार पंडितजींनी मोरारजी, पाटील यांच्याप्रमाणेच लालबहादूर शास्त्री यांनाही मंत्रिमंडळातून बाहेर काढले होते. पण भुवनेश्वर नंतर लगेच त्यांनी शास्त्रीजींना तेवढे परत बोलावून घेतले आणि आपली महत्वाची राज्यकारभारविषयक कामे त्यांच्याकडे सोपविली. यातून त्यांनी सूचित केले ते हे की आपला वारसदार कोणी होणार असेल तर ते लालबहादूर शास्त्री हेच होत. कामराज यांनी ते जाणलं होतं आणि म्हणून पडितजींचा वारसदार निवडण्याची त्यांच्यावर जबाबदारी पडली त्यावेळी त्यांनी शास्त्रीजींचीच निवड जाहीर केली. पण ती कॉन्सेन्सस घेतल्यानंतर हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

यशवंतरावांची मुत्सद्देगिरी अशी की त्यांनी स्वतः आपल्याबद्दल कोठेही शब्द बाहेर काढला नाही. त्यांचे म्हणणे एवढेच की काँग्रेसच्या नेत्यांचा तो अधिकार आहे आणि त्यांनी विचारपूर्वक ही निवड करावी. शास्त्रीजींची निवड करण्याच्या बाबतीत पुढाकार घेतला तो वसंतराव नाईक यांनी. पण यशवंतरावांशी विचारविनिमय केल्यानंतरच एक वजनदार मुख्यमंत्री म्हणून

त्यांनी पहिलं पाऊल टाकलं. नमूद करण्यासारखी गोष्ट ही की तेव्हांपासून मुख्यमंत्र्यांना दिल्ली दरबारात विशेष महत्व प्राप्त झालं आणि वसंतराव नाईक यांच्या शब्दाला मोठंच महत्व दिलं जाऊ लागलं.

मुख्यमंत्र्यांच्या शब्दाला मान दिला जाऊ लागला त्यालाही थोडा इतिहास आहे. पंडितजींच्या हयातीत जेव्हा पंडित गोविंद वल्लभ पंत यांचे निधन झाले तेव्हां डेप्युटी लीडर कोणाला मानले जावे आणि त्याचे भविष्यकाळात स्थान कोणते असावे याबद्दल एक वाद निर्माण झाला. या वादामागे कारणपरंपरा अशी होती की मौलाना आझाद व पंडित पंत हे आपल्या अधिकारानुसार डेप्युटी लीडर मानले गेले होते. पण पंतांच्या निधनानंतर मोरारजी देसाई हे त्या मानाचे स्वतःला मानकरी समजू लागले. त्यांचे म्हणणे असे की अर्थमंत्री म्हणून दुसऱ्या क्रमांकाचा सन्मान आपल्यालाच दिला गेला पाहिजे. त्यांच्या नेहमींच्या घिसाडघाईच्या वृत्तीमुळे त्यांनी आपले हे मत जाहीरही केले. पण त्याचवेळी जगजीवनराम यांनी असा आग्रह धरला की केंद्रीय मंत्रीमंडळात अगदी प्रथमपासून आपला समावेश झाला असल्यामुळे पंडितजींच्या नंतरच्या ज्येष्ठ नेतृत्वाचा मान आपल्याकडे चालत येतो. आता यातून नेतृत्वाबद्दल एक पेचच निर्माण झाला. कारण डेप्युटी लीडर हा भावी वारसदार होय अशीच एक समजूतही दृढ झाली होती. पंडितजी असे दूरदर्शी की त्यांनी या समजुतीवर घाव घालण्याचाच निर्णय घेतला. त्यांनी प्रथमच असे जाहीर केले की आपला वारसदार निवडण्याचा अधिकार जनतेचा आहे आणि जनता पार्लमेंटातील एकाद्या नेत्यापुरतीच निवड मर्यादित करील असे

समजून का चालावे ? कदाचित प्रदेश राज्यातील एखाद्या मातबर मुख्यमंत्र्याचीही आपला वारसदार म्हणून निवड केली जाणे शक्य आहे. पंडितजींनी डेप्युटी लीडरच्या प्रश्नाला अशी कलाटणी दिल्यानंतर साऱ्या राष्ट्राचे लक्ष मुख्यमंत्र्यांकडे वेधले गेले. आणि महाराष्ट्राच्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट ही की ज्या तीन मुख्यमंत्र्यांची नावे त्यावेळी प्रामुख्याने पुढे आली त्यांत बंगालचे बिधन रॉय, मद्रासचे कामराज आणि महाराष्ट्राचे यशवंतराव चव्हाण यांचा समावेश झालेला होता चव्हाणांनी आपल्या स्वतःसाठी केवढी प्रतिष्ठा निर्माण केली होती त्याचा हा सबळ पुरावाच होय. यशवंतरावांच्या नंतर वसंतराव नाईक यांनीही भारतीय राजकारणात तसेच मानाचे स्थान संपादन केले.

यशवंतरावांनी राष्ट्रीय प्रवाहापासून अलग न होण्याचे जे धोरण स्वीकारले त्याचेच हे फळ त्यांनी कालांतराने हस्तगत केले यात संशय नाही. काँग्रेस संघटनेमधील अंतर्गत प्रवाहांचा विचार केला तरी आपल्याला हेच दृश्य पहावयाला मिळेल. ज्यावेळी यशवंतराव काँग्रेस संघटनेमध्ये पुढे येत होते त्यावेळी लोकमान्य टिळकांच्या अनुयायांचा गट खूपच प्रभावी होता. तो इतका प्रभावी होता की असहकारितेच्या आंदोलनाच्या वेळी टिळक अनुयायांनी तात्यासाहेब केळकरांच्या नेतृत्वाखाली प्रतियोगी सहकारितेचा जेव्हा पुकारा केला तेव्हां पंडित मोतीलाल नेहरूंनी पुण्यातील एका भाषणात संतापाने उद्गार काढले की काँग्रेस ही महाराष्ट्र काँग्रेसची कदापिही बटीक होणार नाही. यशवंतरावांच्या पुढे हा कधी पेचच आला नाही. कारण त्यांनी लोकमान्य टिळकांचा जाज्वल्य राष्ट्रवाद स्वीकारला. पण टिळकांच्या अनु-

यायांकडे मात्र त्यांनी पाठ फिरविली कारण प्रत्येक वेळी त्यांनी निश्चय केला होता तो हा की गांधी-नेहरूच्या खेरीज इतर कोणत्याही पंथाशी आपण वांधिलकी स्वीकारावयाची नाही.

राजकारणातच नव्हे पण समाजकारणामध्येही त्यांनी हेच तारतम्य ठेवले. हेच पहा ना सामाजिक सुधारणेच्या वाबतीतील त्यांचे गुरु ज्योतिबा फुले, शाहू महाराज, भाऊराव पाटील हे होते. हे सारे ब्राम्हणेतर पुढारी होते. तसे पाहिले तर यशवंतरावांना ब्राह्मणेतर चळवळीतील लोकांबद्दलही अतिशय जिव्हाळा असे. पण राष्ट्रवादाशी सुरुवातीच्या ब्राह्मणेतर पुढाऱ्यांचे रिश्तेनाते जुळले नाही. तथापि नंतरच्या काळात शेतकरी कामकरी पक्षाच्या नावाने ब्राम्हणेतरांतील जहालमतवादी लोक एकत्र आले आणि त्यांनी लढाऊ क्रांतिकारक असा पवित्रा घेतला. त्यांची भूमिका विख्यात दाभाडी प्रबंधातून प्रगट झाली. हा प्रबंध कम्युनिस्ट आंदोलनाला पाठिंबा देणारा होता. पण त्या प्रबंधाच्या उपासकांची अशी जिद्द होती की त्यांनी या प्रबंधाच्या पायावर खुद्द कम्युनिस्ट इंटरनॅशनलची मान्यता प्राप्त करून घेण्याचा पवित्रा टाकला आणि तशी मागणी इंटरनॅशनलला सादर केली. यशवंतराव चव्हाण हे शेतकरी कामकरी पक्षापासून सर्वस्वी अलिप्त राहणे शक्य नव्हते. माझी अशी माहिती आहे की या पक्षाच्या मुंबई येथे भरलेल्या पहिल्या अधिवेशनाला ते हजरही राहिले होते. या पक्षाचे पुढारी पूर्वीच्या ब्राम्हणेतर पुढाऱ्यांप्रमाणे मवाळ नव्हते आणि ब्रिटिश सत्तेपुढे लाचार होणारे तर मुळीच नव्हते. साहजिकच यशवंतरावांनी त्यांच्या ध्येय धोरणाचा गंभीरपणे विचार केला आणि त्या विचारांनुसारच ते या अधिवेशनाला

हजर राहिले होते. तथापी पुन्हा एकादा त्यांच्या मनात काँग्रेस-च्या राष्ट्रीय प्रवाहाबद्दलचा विचार उचंबळून आला आणि या प्रवाहापासून अलग होण्यातील धोका जाणून त्यांनी शे. का. पक्षाकडेही पाठ फिरवली.

याच विचाराने कम्युनिस्ट पक्षाचेही आकर्षण त्यांनी टाळले. त्या वेळचा कम्युनिस्ट पक्ष हा जितका प्रबळ होता तित-काच तरुण मनावर मोहिनी घालण्याइतका ध्येयवादीही होता. विशेषतः सोव्हियट राज्यक्रांतीचे जे वलय त्याच्याभोवती उभे होते त्यामुळे यशवंतरावांच्या सारख्या संस्कारक्षम तरुण पुढाऱ्याला त्याचे आकर्षण वाटणे क्रमप्राप्त होते. स्वतः यशवंत-रावांनाही काही काळ असे वाटू लागले होते की आपण कम्युनिस्ट पक्षाच्या तर आहारी जाणार नाही ना? पण विचारीपणा आणि काँग्रेस निष्ठा यांचे आकर्षण त्यांच्या बाबतीत अधिक प्रबळ ठरले आणि पुढे कधीही काँग्रेस प्रवाहापासून ते विचलित झाले नाहीत.

प्रत्येक पेचप्रसंगात त्यांना काँग्रेस संस्कृतीचा स्थायीभाव झालेल्या मतपरिवर्तनाच्या भूमिकेने खराखुरा आधार दिला यात संशय नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेसाठी त्यांनी पंडित-जींच्या मतपरिवर्तनावर भर दिला. त्याचप्रमाणे संयुक्त महा-राष्ट्रातील जे घटक विभाग होते त्यांच्या नेत्यांना धीर, आधार देऊन आणि त्यांच्या मागण्यांचा अत्यंत सहानुभूतीने विचार करून त्यांनी महाराष्ट्र स्थापनेच्या मार्गातील सर्व अडसर दूर केले. त्यांनी जो नागपूर करार केला ते त्यांच्या सहिष्णुतेच्या आणि दूरदृष्टीच्या धोरणाचे अत्यंत उत्कृष्ट उदाहरण होय. त्यांनी विदर्भाचे सर्व नेते मग ते कन्नमवार असोत की खेडकर असोत

त्यांना कळकळीने सांगितले की तुम्ही संयुक्त महाराष्ट्रासाठी जो त्याग करीत आहात. त्या त्यागाचे आम्ही चीज करू, विदर्भाच्या ज्या काही मागण्या असतील, जे काही हक्क आणि सवलती तुम्हाला हव्या असतील त्या मान्य करण्याच्या दृष्टीने आम्ही कोणतीही कुचराई करणार नाही. यशवंतरावांनी हे नुसते आश्वासन दिले नाही. तर आपल्यापरीने त्यांनी ते तंतोतंत पाळले. त्यांना ही जाणीव होती की आपल्याला मिळणार असलेल्या राज्याचा कोणीही सुखासुखी त्याग करीत नाही. तर त्यांना महाराष्ट्राशी एकरूप होण्यासाठी महाराष्ट्रानेही त्यागबुद्धी आणि न्यायबुद्धी दाखविली पाहिजे. तेवढ्यासाठी त्यानी नागपूर करारान्वये विदर्भाचे सांत्वन केले, मराठवाड्याचे तसेच मन मिळविले आणि गुजरातचा विरोध नाहीसा करण्यासाठी डांगवर पाणी सोडलं इतकेच नव्हे तर गुजरातची नवी राजधानी बसविण्यासाठी म्हणून न्याय्य इतके अर्थबळ देण्याची तयारी दाखविली. वस्तुत: गुजरात हा बनिया लोकांचा देश. त्या दृष्टीने गुजरातशी तडजोड घडवून आणताना अतिशय काळजीपूर्वक आणि सावधानतेने पावले टाकणे आवश्यक होते. यशवंतराव अर्थातच सावध होते. पण त्यांनी एक भूमिका घेतली आणि ती ही की संयुक्त महाराष्ट्र स्थापन व्हावयाचा असेल तर आपल्याला लहानसान गोष्टीकडे लक्ष द्यावयाला वेळ नाही. आपण महाराष्ट्र स्थापन होण्यापूर्वीच त्यातील घटक भाग आहेत त्यांना आपल्याबरोबर घेतलं पाहिजे. यशवंतरावांनी निरनिराळे करार मदार करून, देवाण घेवाणीच्या मार्गाचा आश्रय घेऊन गुण्यागोविंदाने सारे प्रश्न मिटविले. याचे श्रेय जसे यशवंतरावांना द्यावयाला पाहिजे त्याचप्रमाणे त्यांच्या भूमिकेलाही द्यावयाला पाहिजे. ही भूमिका मी प्रथमपासून सांगत

आलो आहे की ही मतपरिवर्तनाची भूमिका होती, कॉन्सेन्ससची होती. त्या भूमिकेनुसार यशवंतरावांनी आपल्या राजकारणाची सूत्रे हलविली आणि आपल्या हाती खंबीरपणे सत्ता ठेवताना त्यांनी मित्रांना संतुष्ट केले आणि आपल्या विरोधकांनाही शक्य तोवर तक्रारीला जागा ठेवली नाही.

मला माहीत आहे काँग्रेस संस्कृतीचा आज उपहास होत आहे. पण लक्षात ठेवा, या देशात जर कोठली संघटना शंभर वर्षे टिकून राहिली असेल तर ती काँग्रेस होय. तिला इतिहास आहे, परंपरा आहे. काँग्रेसपक्ष वरखाली जातो. त्याचे काही आडाखे बरोबर येतात, काही चुकतात. पण ताकत आणि तपश्चर फक्त काँग्रेस पक्षाकडे आहे हे विसरून चालणार नाही. यशवं रावांनी ते पुरेपूर जाणले होते. आणि त्यांनी हेही जाणले होते ज्या ज्या वेळी संकटे, पेचप्रसंग येत त्या त्या वेळी काँग्रेस नेतृत्व त्या संकटांचा मुकाबला केला आहे आणि संघटनेचा व राज्यकारभाराचा गाडा सुरळितपणे आणि सुरक्षितपणे आहे. आता उपहास केल्या जाणाऱ्या काँग्रेस संस्कृतीबद्दल करताना माझ्यासमोर जे एक उदाहरण उभे राहते ते गांधी यांनी पंजाबचा पेचप्रसंग सोडविताना आखलेल्या होय. लोंगोवाल यांच्याशी करार करताना त्यांनी ही घेतली की पंजाबमध्ये कोणता पक्ष निवडून येतो याचा करण्याचे कारण नाही. महत्वाची गोष्ट आहे. ती ही राष्ट्रीय प्रश्न सुटला पाहिजे. मग सत्ता कोणाच्या जाईना, राजीव गांधी यांनी ही जी भूमिका घेतली शाहीची भूमिका होती. त्याचा गाभा मतपरिवर्तन, [illegible] होता आणि काँग्रेसची मूलभूत संस्कृत

यशवंतराव हे इंदिरा काँग्रेसनधून फुटले ते या भावनेने की इंदिरा काँग्रेस ही गांधी-नेहरूंची काँग्रेस राहिलेली नाही, ती काँग्रेसच्या या संस्कृतीपासून ढळत चालली आहे असे त्यांच्या मनाने घेतले. त्यानंतरच्या काळात वाराखडीतील निरनिराळ्या अक्षरांनुसार काँग्रेस ओळखली जाऊ लागली आणि मग मत-मतांतराचा इतका गोंधळ निर्माण झाला की खरी काँग्रेस कोणती आणि खोटी कोणती याबद्दलच संभ्रम वाटू लागला. यशवंतरावांच्या वनवासाचाच हा कालखंड म्हणता येईल. या कालखंडात आकाशात दोरा तुटलेल्या पतंगासारखीच त्यांची अवस्था झाली. स्वर्णसिंग यांच्या काँग्रेसतर्फे ते लोकसभेत निवडून आले आणि जनता पक्षाच्या राजवटीत विरोधी पक्षांचे नेते हे पदही त्यांनी भूषविले. पण त्यांची मनस्थिती स्थिर नव्हती, खंबीरपणे आणि विचाराने पाऊल टाकणारे यशवंतराव आयुष्यात प्रथमच अंधारात चाचपडत असल्यासारखे दिसू लागले. त्यानंतरच्या काळात काँग्रेस (स) ही समाजवादी काँग्रेस झाली आणि जनता पक्ष दुभंगल्यानंतर यशवंतराव चरणसिंग यांच्या नेतृत्वाखाली देशाचे उपपंतप्रधानही झाले. सत्तारूढ झाल्यानंतरचा हाही काळ वनवासाचाच काळ म्हणता येईल. यशवंतरावांची पुण्याई अशी की ते पार्लमेंटमध्ये निवडून आले. पण त्या पुण्याईवर काँग्रेस (स) ला ते सुप्रतिष्ठित करू शकले नाहीत. त्या अवस्थेत त्यांचे जे विचारमंथन झाले त्यातून त्यांना ही जाणीव झाली, आणि प्रत्यक्ष अनुभवही आला की इंदिरा काँग्रेस हीच खरी काँग्रेस मानणे भाग आहे. त्या काँग्रेसने पुढे १९८० साली पार्लमेंटची निवडणूक जिंकली विधानसभांच्या निवडणुका जिंकल्या आणि पुन्हा एकदा देशामध

स्वतःसाठी कर्तुमकर्तुमशक्ती निर्माण केली. भारतीय समाजावर प्रभाव टाकणारी ही एकमेव संघटना आहे असा त्यांच्या मनाने निर्वाळा दिल्यानंतर आपल्या भवितव्याचा विचार न करता, कोणत्याही प्रकारची अपेक्षाही न ठेवता यशवंतरावांनी प्रांजळपणे जाहीर केलं की मी 'स्वगृही' परत जाण्याचा निर्णय घेतला आहे. यशवंतरावांचा स्वगृही प्रवेश ही एक महत्वाची, ऐतिहासिक घटना होती. आज त्यांना त्याचं फळ वघायला मिळालं नाही हे दुर्दैव होय. पण राष्ट्रीय काँग्रेसची जी पूर्वपीठिका आहे, जी पुण्याई आहे ती लक्षात घेतली तर यापेक्षा दुसरा मार्ग यशवंतरावांच्या पुढे होता असे मला तरी वाटत नाही. त्यांनी जे पाऊल टाकलं ते योग्यच होतं असं मी निःसंकोचपणें सांगू शकतो. काल मला ॲडव्होकेट नाथ चव्हाण भेटले त्यावेळी ते मला म्हणाले की एक बुद्धिवादी आणि एक बुद्धिनिष्ट व्यक्ती यशवंतरावांच्या भूमिकेचे कशा रीतीने समर्थन करीत आहे, हे ऐकण्यासाठी मी मुद्दाम आलो आहे. त्यांना मी आवर्जून सांगू इच्छितो की मी हे जे समर्थन करीत आहे ते निष्ठेने आणि विचारपूर्वक करीत आहे. त्याचं कारण असं आहे की यशवंतरावांना दुसऱ्या कोठल्याही पक्षामध्ये स्थान नव्हतं आणि त्यात स्थान मिळावं असं त्याना वाटतही नव्हतं. त्यांनी जी आयुष्यभर भूमिका घेतली, त्या भूमिकेशी ते प्रामाणिक राहिले. त्या त्या वेळच्या त्यांच्या भूमिकेतून त्यांच्यावर संकटे कोसळली, अनेक पेचप्रसंग निर्माण झाले, संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात युद्धाच्या काळी, स्वातंत्र्यानंतर देशाची जी पुनर्रचना झाली, लोकशाहीवर जे आघात झाले त्या त्या वेळी यशवंतरावांना मोठ्या धैर्याने आपला मार्ग शोधावा लागला. पण माझी अशी धारणा आहे की या सर्व घडामोडीमध्ये

अभंग राहिलेले जर नेतृत्व कोठले असेल तर ते यशवंतरावांचेच नेतृत्व होय. माझ्या मते, पंडितजींच्यानंतर विचार देणारा हा एकच नेता होता. यशवंतरावांना राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय प्रवाहांची जाण होती, कोणते पक्ष तौलनिक दृष्टीने सवळ, दुर्बल ठरतील यांचे आडाखे ते बांधू शकत होतें. भारताची घडण घडविण्याच्या बाबतीत काय केले पाहिजे, देश कोणत्या रीतीने पुढे आणला पाहिजे याबद्दलची स्पष्ट अशी कल्पना होती. ही कल्पना त्यांना पंडितजींच्या दृष्टिकोणातून, गांधीजींच्या ध्येयधोरणातून आली आणि त्यांनी मनाशी ठाम निर्णय केला की काँग्रेस या दोन नेत्यांची आहे. आणि त्यांच्या पावलावर पाऊल टाकणं हा आपला धर्म आहे. त्या भावनेनेच त्यांनी आपली पावले टाकली. यशवंत-रावांचे भावी काळात स्थान कोणते राहिले असते याचा आपण आज विचार करू शकत नाही परंतु एवढं मात्र खरं की यशवंतराव हे विचारी नेते म्हणून या देशामध्ये कायमचे आठवले जातील. त्यांनी वेळोवेळी विचार दिला. समाजपरिवर्तनाची जी कार्ये आहेत त्या कार्यांना कांग्रेसचा पाठिंबा मिळवून दिला. काँग्रेस-मधील भिन्न भिन्न गटांना एकत्र ठेवण्यात यशवंतरावांचेच कौशल्य उपयोगी पडलेलं दिसून येईल. त्यांनी वेळोवेळीं तडजोडी केल्या. कॉन्सेन्सस निर्माण करण्यासाठी काही वेळी माघारी ही घेतली. पण ही तडजोड त्यांनी कधीही तत्वावर केली नाही. त्यांचे ध्येयधोरण एकच होते आणि ते म्हणजे सर्वांना शक्यतो बरोबर घेऊन आणि निरनिराळ्या घटक विभागांना विश्वास देऊन राज्य-कारभार करणं हे होय. त्यांच्या कारकीर्दीमध्ये महाराष्ट्रामध्ये कोठलाही संघर्ष निर्माण झाला नाही. त्यांनी उभ्या महाराष्ट्रावर जशी छाप टाकली तशीच भारतावरही आपल्या व्यक्तित्वाची, विचारनिष्ठेची छाप टाकली.

कधीमधी मात्र विचार येतो की १९६२ साली केंद्रस्थानी जाण्याऐवजी ते महाराष्ट्रातच राहिले असते तर ? तर कदाचित् महाराष्ट्राची जडणघडण अधिक कौशल्याने झाली असती. यशवंतरावांचं मनही महाराष्ट्राभोवतीच घोटाळत होतं. त्यांना महाराष्ट्राला काही नवीन दिशा दाखवावयाची होती. त्यांना दलितांच्या दृष्टीने विचार करून आंबेडकरांचे अपुरे राहिलेले कार्य पुरे करावयाचे होते. त्यांना महाराष्ट्राचा सांस्कृतिक विकास घडवून आणावयाचा होता. पण त्याहि पलीकडे महाराष्ट्रात खंबीरपणे पाय रोवून त्यांना काँग्रेसची एकता राखावयाची होती. बंगलोरच्या अधिवेशनानंतर काँग्रेसमध्ये दुफळी पडत असलेली पाहून त्यांनी एकजुटीचा एक ठराव काँग्रेसपुढे मांडला होता. त्या ठरावाचा गौरव करताना के. के. शहांनी महाराष्ट्र काँग्रेसच्या शिबिरात असे उद्‌गार काढले होते की यशवंतरावांचा ठराव हा गीता, बायबल आणि कुराण यांच्याइतका पवित्र आहे. यशवंतरावांना साध्य करावयाची होती ती काँग्रेसची एकता. त्यांचा ध्यास होता तो काँग्रेसचा प्रवाह अखंडित ठेवण्याचा. हा प्रवाह जितका शुद्ध ठेवता येईल तितका ठेवावा होच त्यांची आकांक्षा होती. उभ्या जन्मभर त्यांनी काँग्रेसची सेवा केली. ती सेवा त्यांनी निष्ठेने केली आणि त्या निष्ठेच्या जाणीवेनेच ते स्वगृही परत गेले. यशवंतरावांच्या निष्ठावंत जीवनाचा परिपाक आणि प्रतीक म्हणूनच मी या घटनेकडे पाहतो.

‘ दिल्ली दरबारातील यशापयशाची मीमांसा ’

मा. श्री. द्वा. भ. कर्णिक–

१४ मार्च १९८६

आजच्या माझ्या भाषणाचा विषय आहे. " दिल्ली दरबारातील यशापयशाची चिकित्सा. " दिल्ली दरबार हा शब्दप्रयोग मी जाणूनबुजून केलेला आहे. कारण दिल्ली ही अनेक साम्राज्यांची राजधानी झालेली आहे. मोगल साम्राज्याची, ब्रिटिशांची आणि आता भारतीय लोकशाहीची. ब्रिटिशांनी आपली सलतनत कलकत्त्याहून हलविली आणि ते दिल्लीला येऊन थडकले याचं कारण असं आहे की दिल्लीला फार मोठा इतिहास आहे आणि प्रत्येक राजवटीला पुढे घडवावयाचाही होता. तो दिल्लीमध्येच घडेल अशी सर्वसाधारण आकांक्षा होती. खरं

सांगावयाचं तर ती वैभवशाली नगरी आहे. साम्राज्याची राजधानी होण्याच्या लायकीचे ते वैभव आहे. आपल्यापैकी ज्यांनी दिवाण ई आम्, दिवाण ई खास पाहिला असेल त्यांना तेथे एक वचन कोरलेले आढळून आले असेल. फारसी भाषेतील तें वचन आहे ते असे:

"अगर बर रूहे जमीनस्त । हमीनस्तो, हमीनस्तो, हमीनस्त'

त्याचं भाषांतर असं आहे की, "या पृथ्वीतलावर जर कोठे नंदनवन असेल, तर ते इथे आहे, इथे आहे. इथेच आहे." दिल्लीचं जे महात्म्य आणि वैभव आहे ते या वचनामध्ये अतिशय चांगल्या रीतीने समाविष्ट झालेलं आपल्याला आढळून येईल. दिल्लीच्या दरबाराचं असं वैशिष्ट्य सांगता येईल की तेथे जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला, पुढाऱ्याला हे महात्म्य जाणून आपली पावलं टाकली पाहिजेत. म्हणजे तिथे जे काही प्रकार घडतील, जी जी संकटे येतील त्यांच्याशी सामना देऊनच आपलं राजकारण केलं पाहिजे. दिल्ली दरबार म्हटला, त्यातील राजवटींची आठवण केली की आपल्या डोळ्यासमोर कट, कारस्थाने वगैरे अशा गोष्टी येतातच. सुदैवाने भारतीय लोकशाहीची जी राजवट आहे तीत कट, कारस्थाने होत नाहीत. पण राजकीय डावपेच मात्र खेळले जातात. हे जे मी सांगतो आहे त्याच्या पाठीमागची माझी भूमिका अशी आहे की यशवंतराव चव्हाण दिल्लीमध्ये गेले तेव्हां त्यांना पुरेपूर कल्पना होती की इथे राजकीय डावपेच खेळले जातात आणि त्या डावपेचांना तोंड देऊनच आपल्याला आपलं कर्तव्य करावे लागेल. अर्थात आपल्या लोकशाहीमध्ये जें डावपेच होतात ते इनोसंट अशाच प्रकारचे असतात. ते डावपेच मात्र खरे

पहिल्या प्रथमच मी तुम्हाला सांगतो. आपलं स्वातंत्र्य आलं आपली राज्यघटना तयार झाली. आणि ज्यावेळी राष्ट्रपतींची निवड करावयाची वेळ आली तेव्हा पंडितजींचं असं मत होतं की हे सन्मानपद राजाजींना देण्यात यावं. अत्यंत हुशार आणि कर्तबगार अशी ती व्यक्ती होती. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर पहिले गव्हर्नर जनरलही ते झाले होते. पण राजाजींचा इतिहास जरा निराळा होता. ते पाकिस्तानचे पुरस्कर्ते म्हणून बदनाम झालेले होते. काँग्रेसमधील पुढाऱ्यांना म्हणजे स्वतः वल्लभभाई पटेल, राजेंद्र प्रसाद यांना राजाजींना हा सन्मान द्यावा असे वाटत नव्हते. पहिला वहिला सन्मान होता तो. म्हणून त्यांनी पंडितजींना सांगितलं की या पदावर बसावयाला योग्य व्यक्ती असेल तर बाबू राजेंद्र प्रसाद हे होत. पंडितजी हे लोकशाहीवादी आणि लोकशाहीचे कट्टे पुरस्कर्ते. त्यांनी हे मत मान्य केलं. आणि राजेंद्रप्रसाद पहिले राष्ट्रपती झाले.

पुन्हा ज्यावेळी दुसरी वेळ आली तेव्हां पंडितजींच्या पुढे प्रश्न आला की राष्ट्रपतीपद कोणाला द्यावे ? पंतप्रधान या नात्याने त्यांना आपला अधिकार गाजविता आला असता. पण काँग्रेस पक्षाची भूमिका काय आहे पुढाऱ्यांचं मत काय आहे हे समजावून घेतल्याशिवाय पंडितजी हे कुठलेही पाऊल टाकत नसत. त्यांची इच्छा होती की डॉ. राधाकृष्णन् यांना हा सन्मान देण्यात यावा. त्यांनी आपल्या मनाशी ही निवड केलीही होती पण राजेंद्र प्रसाद यांच्याच वाजूने काँग्रेस पक्षाचा कौल पडला. आणि पंडितजींनी पुन्हा एकदा लोकशाहीचा निर्णय स्वीकारला. हा निर्णय त्यांनी स्वतः मात्र राधाकृष्णन् यांना कळविला नाही.

दिल्लीमधील वारा वर्षाच्या वास्तव्यात मला जे प्रत्यक्ष अनुभव आले आहेत त्यांच्या अनुरोधाने मी सांगू शकतो की पंडितजींनी हे काम मौलाना आझाद यांच्याकडे सोपविले. दिल्लीतील राजकीय डावपेचाचाच हा एक प्रकार होय.

मौलाना आझाद हे दिल्लीतील त्यावेळचं एक प्रस्थ होतं. राजविंडे असे त्यांचे नेतृत्व होते. ज्याला कमांडिंग पोझिशन म्हणता येईल ती त्यांच्यापाशी होती. त्यांनी राधाकृष्णन् यांना शांतपणानं समजावून सांगितलं. एक फारशी शेरही त्यांनी ऐकविला. त्या शेरात असे सांगितलं होतं की वाट पाहणं, पेशन्स दाखविणं ही एक महत्वाची गोष्ट आहे. राधाकृष्णन् यांनी तो संदेश ऐकला पंडितजींनीही आपली आकांक्षा बाजूला ठेवली आणि आपल्या पक्षाचा जो निर्णय आहे तो शिरसावंद्य मानला.

हे सगळे डावपेच सुरुवातीपासून खेळले जात होते. पंडितजी सरदार पटेल, पटेल आणि मौलाना आझाद, पंडितजी आणि रफी अहमद किडवाई यांच्यामध्यें वेळोवेळी संघर्ष होत असत. व्यक्तिगत संघर्ष सुद्धा होत असे. परंतु यापैकी एकाही पुढाऱ्याला असं वाटलं नाही की आपलं म्हणणं मान्य झालं नाही म्हणून बाहेर पडावं आपण. त्यापैकी कोणत्याही पुढाऱ्याच्या मनातही असं आलं नाही आणि त्यांनी ते केलंही नाही. पंडितजींच्या समोर असे अनेक पेच यावयाचे आणि प्रत्येक वेळी त्यातून ते मार्ग काढावयाचे.

कालच्या भाषणात मी पार्लमेंटातील डेप्युटी लीडरच्या निवडीचा उल्लेख केला होता. त्या बाबतीत पंडितजींनी एक अभिनव तोडगा काढला. त्याला मी डावपेच असेच म्हणतो.

त्यांनीं सांगितलं की डेप्युटी लीडर एकच न निवडता, लोकसभेसाठी एक आणि राज्यसभेसाठी एक असे दोन डेप्युटी लीडर निवडावे. म्हणजे डेप्युटी लीडर हा पुढे वारसदार म्हणून मानला जावा ही जी समजूत झाली होती तिच्यावरच पंडितजींनी आघात केला. पंडितजी जे डावपेच लढवीत असत ते मोठ्या कौशल्याने आणि विलक्षण चाणाक्षपणाने लढवीत असत.

कामराज योजना अमलात आणतांना त्यांनी भावी काळचा वारसदार निवडण्याच्या बाबतीत अडचण येऊ नये अशा पद्धतीने सारा बनाव घडवून आणला. वरकरणी त्यांनीं असा भास निर्माण केला की काँग्रेस पक्षाची संघटना मजबूत करण्यासाठी या मंत्र्यांचा ते उपयोग करून घेणार आहेत. पण त्यांच्या योजनेची चीरफाड करताना स. का. पाटील यांनी पंडितजींच्यावर सरळ आरोप केला की पुढेमागे वारसदार होऊ शकतील अशी माणसे बाजूला काढण्याच्या हेतूनेच पंडितजींनी हा व्यूह रचला. आता पंडितजींच्या अंतरंगात काय शिजत असेल याचे भाकित कोण करू शकेल. आपण एवढीच समजूत करून घ्यावयाची की दिल्लीमध्ये असे डावपेचाचे प्रकार नेहमीच घडत आलेले आहेत. एवढे खरे की दिल्लीला जाण्यापूर्वी यशवंतरावांना याची पुरेपूर जाणीव होती.

ज्या परिस्थितीत यशवंतराव दिल्लीला गेले त्यावेळचा थोडा इतिहास मी आपल्याला सांगतो. १९६२ साली कृष्णमेनन यांचं संरक्षण मंत्रीपद यशवंतरावांना घेण्याची पाळी आली त्यावेळी खरं सांगायचं म्हणजे यशवंतरावांना महाराष्ट्र सोडावयाचा नव्हता. मुंबई सोडावयाच्यावेळी त्यांची भेट घेण्याचा मला जो

TRAO CH

योग आला होता त्यावेळी प्रत्यक्षपणे त्यांनी माझ्यापाशी उद्‌गार काढले होते; " आताच कुठे महाराष्ट्राचं राज्य सुरू झाल आहे आणि माझ्या कारकीर्दीची सुरुवात होत आहे. तेव्हा अशा वेळी महाराष्ट्रातील सारी जबाबदारी बाजूला टाकून दिल्लीला जाणं मला काही आवडत नाही " तथापी १९६० साली महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचा सोहळा साजरा केला गेला आणि संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश राजभवनामध्ये ठेवण्यात आला तेव्हां पंडितजी आणि इंदिरा गांधी दोघेही या सोहळ्याला हजर होते. त्यावेळी यशवंतरावांनी का कोण जाणे पण, उत्स्फूर्तपणे एक भविष्यवाणी केली होती की हिमालयावर संकट आलं तर महाराष्ट्राचा सह्याद्री हिमालयाच्या संरक्षणासाठी धावून जाईल. आता हे सहजपणे केलेले उत्स्फूर्त वक्तव्य होते. पण काय योगायोग पहा, वर्ष दीडवर्षाच्या काळातच हिमालयाच्या संरक्षणासाठी सह्याद्रीला धाव घ्यावी लागली. आता तिथे यशवंतरावांचं चांगलं स्वागत होणं स्वाभाविकच होतं. कारण कृष्णमेनन हे अत्यंत बुद्धिमान आणि पंडितजींच्यावर प्रभुत्व असलेले एकमेव नेता असले तरी ते एक वादग्रस्त व्यक्तिमत्व होतं. त्यामुळं चीनी आक्रमणानंतर कृष्णमेनन यांना काढून टाकण्यात यावं आणि संरक्षण मंत्रीपद दुसऱ्या कोणाकडे तरी सोपवावं अशा रीतीचा देशभर प्रचार सुरू झाला. पण कृष्णमेनन यांच्यावर पंडितजींचा अतिशय लोभ होता. आणि तितकाच विश्वासही होता. काश्मीरची बाजू त्यांनी ज्या हिरीरीने राष्ट्रसंघटनेपुढे ठेवली होती तिच्याबद्दल तर पंडितजींना एकप्रकारची कृतज्ञताही वाटत होती. शिवाय कृष्णमेनन हे संरक्षणमंत्रिपद समर्थपणे सांभाळीत आहेत अशीही त्यांची भावना होती. परंतु त्यावेळी कृष्णमेनन यांच्याबद्दल

इतके प्रचंड काहूर उठलें की अखेरीस पंडितजींनाच प्रत्यक्ष लोकांनी सुनावले की जर कृष्णमेननच्या बाबतीत आपण निर्णय घेणार नसाल तर पंडितजी, आपल्या बाबतीत सुद्धा आम्हाला विचार करावा लागेल. इतक्या तीव्र भावना त्यावेळी पार्लमेंटमध्ये आणि पार्लमेंटच्या बाहेर आणि देशामध्ये पसरलेल्या होत्या की पंडितजींना कृष्णमेनन यांच्या बाबतीत निर्णय घेणे भागच पडले.

आपल्या दृष्टीने भूषणास्पद गोष्ट आहे ती ही की संरक्षण मंत्रीपद कृष्ण मेनन यांच्यासारख्या समर्थ माणसापासून काढून घेतल्यानंतर ती जागा घ्यावयाला पंडितजींच्या दृष्टीनं एकच माणूस समर्थ ठरला आणि ते म्हणजे यशवंतराव चव्हाण हे होते. यशवंतरावांनी त्यावेळी पंडितजींचे हात बळकट करण्यासाठी दिल्लीला जावयाचे मान्य केले आणि ते दिल्लीला जावयाला निघाले. त्यांच्या यशाचे पूर्वचिन्हच म्हणून की काय ते दिल्ली-मध्ये पोहोचण्यापूर्वीच चीनी सैन्याने आणि चीनी सरकारने आपले सैन्य मागे घेतले आणि बिनशर्तपणे त्यांनी ते मागे घेतले. त्याचक्षणी युद्धबंदी भारतात आणि विशेषतः सीमेवर झाली. त्याक्षणी यशवंतरावांच्या शिरावरील एक मोठा भार नाहीसा झाला. तो भार अवघड होता. कारण आपली लष्करी तयारी आहे किंवा नाही. याच्याबद्दलही शंका होती आणि पुढची पावले काय टाकावीत हेही निश्चितपणे ठरलेले नव्हते. तथापी यशवंतरावांचं भाग्य असं उजळलं की चिनी आक्रमण परत घेण्यात आलं आणि त्यांचा मार्ग सीमेपुरता तरी निष्कंटक झाला.

पण त्याच सुमारास जी एक घटना घडली तिचा मी उल्लेख करू इच्छितो, ती घटना अशी की दिल्लीला जाण्यापूर्वी

यशवंतरावांनी जी काही भाषणे दिली. त्यातील पुण्याच्या भाषणात त्यांनी लोकांना पटेल आणि समजेल अशा शब्दात चीनी आक्रमणाची चिकित्सा केली. त्यांनी असं सांगितलं की चीनचे हे आक्रमण हे कम्युनिस्ट आक्रमण आहे असे समजावयाला पाहिजे. त्या दृष्टीने भारतीय राष्ट्रवादाला निर्माण झालेला हा धोका आहे. त्या संदर्भात त्यांनी पुढे असेही सांगितले की जी कम्युनिस्ट राष्ट्रे आहेत त्यांच्यावर आपल्याला फारसा भरंवसा टाकता येणार नाही आणि सोव्हियट युनियन आपल्याला संरक्षणाच्या दृष्टीनं मदत करील असं गृहीत धरून चालणार नाही. यशवंत-रावांच्या या भूमिकेपेक्षा वेगळी अशी भूमिका पंडितजींनी घेतली. त्यांच्या मते हे कम्युनिस्ट आक्रमण नव्हे. राष्ट्रवादी भावनेने चीनने टाकलेले हे पाऊल आहे. त्या दृष्टीने या आक्रमणाकडे कम्युनिस्ट आक्रमण म्हणून पाहण्याचे आपल्याला कारण नाही. यशवंतरावांनी जी भूमिका घेतलेली होती त्याच भूमिकेला आधार देणारे क्रुश्चॉव्ह यांनी एक निवेदन मॉस्कोमध्ये जाहीर केले होते. त्या निवेदनात ते म्हणाले होते की चीन हे आमचे बंधूराष्ट्र आहे. आणि भारत हे आमचे मित्रराष्ट्र आहे. म्हणजे फरक केवढा होता याची कल्पना करा. तात्पर्य यशवंतरावांनी जी भूमिका घेतलेली होती तिला अप्रत्यक्षपणं क्रुश्चॉव्ह यांनी पाठिंबा दिलेला आपल्याला दिसून येईल. तथापी पंडितजींकडे जी माहिती उपलब्ध होती ती वेगळी होती आणि ती अत्यंत महत्वाची होती. जगातील जे राजनैतिक गट आहेत त्यांच्याकडून त्याचप्रमाणे इंटेलिजन्स ब्यूरोकडे आलेली आणि सर्व प्रकारे अत्यंत खात्रीलायक अशी ही माहिती होती. त्या माहितीच्या आधारे पंडितजीनी यशवत-रावांच्या निदर्शनास आणले की तुमचा निष्कर्ष परिस्थितीशी

विसंगत आहे. पंडितजींनी त्यांना असेही सांगितले की सोव्हियट युनियन आपल्याला जो काही पाठिंबा देत आले आहे तो चालूच राहील असे समजावयाला हरकत नाही.

माझ्या दृष्टीने हाही एक राजकारणाचा डावपेच मानावा लागेल. यशवंतरावांना साहजिकच पंडितजींना सांगावे लागले की माझी भूमिका चुकीची ठरली आहे आणि यापुढे मी तुमच्या भूमिकेलाच पाठिंबा देईन. दिल्ली दरबारात सुरुवातीलाच यशवंतरावांना सहन करावा लागणारा हा आघात होता. त्यानंतरच्या काळात यशवंतराव आपले विचार मांडण्याचे टाळू लागले ही या घटनेची फलश्रुती मानावी लागेल. त्यांच्या मनान त्यावेळी अस घेतलं असण शक्य आहे. की अशी स्वतंत्र भूमिका घेणं दिल्लीला मानवणार नाही आणि म्हणून तोंडाला खीळ घालण हेच योग्य होय. त्यांनी आपल कार्यमात्र चालू ठेवल आणि पुढील काळामध्ये निरनिराळ्या खात्यांच्या ज्या जबाबदाऱ्या त्यांच्याकडे सोपविण्यात आल्या. त्या त्यांनी समर्थपणे पार पाडल्या. त्यांनी पडितजींचा विश्वास संपादन केला आणि मंत्रिमंडळातही आपल्यासाठी मानाचे स्थान तयार केले. त्यांचे यश असे की पंडितजी आणि नंतर लालबहादूर शास्त्री या दोन्ही प्रधानमंत्र्यांना त्यांच्याकडे कोणतेही खाते सोपविण्याच्या बाबतीत कधी गैरविश्वास वाटला नाही. त्या काळामध्ये यशवंतरावांनी संरक्षण मंत्री, गृहमंत्री, परराष्ट्र मंत्री, अर्थमंत्री अशा सर्वच महत्वाची पदे सांभाळली आणि त्यांच्या स्वभावानुसार त्यांनी ती कौशल्याने आणि जबाबदारीने सांभाळली.

त्यांच्या कार्यपद्धतीचा एक परिपाठ असा असे की प्रत्येक खाते हाती घेतल्यानंतर ते आपल्या सगळ्या अधिकाऱ्यांना, विश्वासात घेत असत त्यांच्याकडून कामकाजाची सर्व माहिती ते करून घेत असत, कोणकोणते प्रश्न आहेत त्यांचा उलगडा करून घेत असत आणि त्यानंतर आपल्या धोरणाची ते अंमलबजावणी करीत असत. लोकशाहीमध्ये सरते शेवटी अंमलबजावणी नोकरशाहीकडूनच केली जाते. ध्येय धोरणाचा अंदाज दिला गेल्यानंतर अंमलबजावणीचे कार्य वरिष्ठ अधिकारीच करीत असतात. त्यांच्यावर जबाबदारी टाकणे आणि त्यांचा विश्वास संपादन करून आपला राज्यकारभार चालविणे हे मंत्र्याचे काम असते. यशवंतरावांनी अधिकाऱ्यांचा विश्वास संपादन केल्यामुळे त्यांचे काम यशस्वीपणे पार पडत गेले.

त्यांचा विचार करताना मला सरदार वल्लभभाई पटेल यांची प्रकर्षाने आठवण होते. सरदारांची कार्यपद्धतीही याच प्रकारची असे. एकदां माणूस नेमला आणि त्याच्या हाती कारभार सोपविला म्हणजे सरदार कधीही अंमलबजावणीत हस्तक्षेप करीत नसत. स्वातंत्र्यानंतरच्या सुरुवातीच्या काळात सरदारांच्यावर फार मोठी जबाबदारी पडली. विशेषतः देशी संस्थानांच्या विलीनीकरणाचा अत्यंत कठीण, तसाच नाजुक प्रश्न त्यांना हाताळावयाचा होता. त्यांचे चिटणीस व्ही. पी. मेनन यांच्यावर त्यांनी सर्व जबाबदारी टाकली. म्हणजे सामीलनामे तयार करणे, त्यांच्या अनुषंगाने राजे महाराजांशी चर्चा करणे, त्यांची मने मिळविणे. हे काम मेनन यांनाच करावे लागत असे. सरदार अखेरच्या मुलाखती तेवढ्या घेत असत आणि भल्या पहाटे फिरावयाला

जातांनाच त्यांच्या या मुत्राखती आटोपत असत. त्यानंतर फायली त्यांच्यापुढे येत आणि फायलीवरील अधिकाऱ्यांचे शेरे आणि मुलाखतीत स्पष्ट झालेली बाजू यांचा विचार करून सरदार आपले निर्णय देत असत. ते निर्णय कधीही फिरविले जात नसत आणि सरदारांचे शिक्कामोर्तब झाले की प्रत्येक प्रकरण निकालात निघत असे.

यशवंतरावांचे ध्येयधोरण सुद्धां याच प्रकारचं होतं ते यशस्वी ठरले, अगदी प्रत्येक खात्यात. त्याचे कारण असे आहे की अतिशय श्रेष्ठ, हुशार, बुद्धिमान् आणि अभ्यासू अशा व्यक्तींची ते निवड करीत असत आणि कारभाराचे सर्व काम ते त्यांच्याकडे सोपवून मोकळे होत असत. त्यामुळे कामाच्या बाबतीत कोठल्याही प्रकारचे पेचप्रसंग त्यांच्यापुढे कधीही आले नाहीत. यशस्वी कारकीर्द जी त्यांची झाली त्याचे कारण असे आहे की ते आपल्या अधिकाऱ्यांवर विश्वास टाकीत असत आणि अधिकाऱ्यांनाही त्यांच्याबद्दल नितांत विश्वास वाटत असे.

आता यशवंतरावांनी ज्या एका गोष्टीकडे दुर्लक्ष केले त्याबद्दलची हकीकत मी तुम्हाला सांगतो दिल्लीमध्ये अत्यंत प्रबळ अशी जर कोणती एक शक्ती असेल तर ती वृत्तपत्रे ही होय. त्यात वृत्तपत्रांच्या संपादकांचा जसा समावेश होतो, तसाच वार्ताहरांचाही, "स्पेशल कॉरेस्पॉण्डट" म्हणून ज्यांना म्हटले जाते त्यांच्या हाती तर राजकारणी पुरुषांचे भवितव्य घडविण्याचे सामर्थ्य असते. प्रधानमंत्री आणि प्रत्येक मंत्री यांच्याकडे खास लक्ष पुरवीत असतात. पंडितजींची तर अशी प्रथा असे की मंत्रिमंडळात फेरबदल करताना नव्या मंत्र्यांची निवड करताना

त्याचप्रमाणे राष्ट्रीय धोरणांची आखणी करताना काही प्रथितयश वार्ताहरांच्या तर्फे भावी घटनांबद्दल ते वावड्या उडवीत असत. आपल्या कृतीबद्दलच्या प्रतिक्रिया काय होतात, आपले ध्येयधोरण कशा रीतीने जनमनाचा ठाव घेते हे अजमावून पहाण्याचा एक मार्ग म्हणून ते या वावड्या उडविण्याला सहाय्यभूत होत असत. त्यासाठी ब्रेकफास्ट, लंच आणि डिनरला काही प्रमुख पत्रकारांना ते बोलावून घेत असत आणि त्यांच्याशी ते खाजगीपणे विचार-विनिमय करीत असत. काही वृत्तपत्रातून काही वेळी असा काही मजकूर प्रसिद्ध होत असे की ज्यातून पंडितजींच्या ध्येयधोरणाची चुणुक लोकांना पहावयाला मिळत असे. म्हणजे त्यातील बातम्या-नुसार प्रत्यक्षपणे कार्य होत असे असे मुळीच नव्हे. पंडितजी लोकांच्या प्रतिक्रिया बघून आपले निर्णयही बदलत असत. पण वार्ताहरांशी स्नेहसंबंध ठेवून ते आपला कार्यभाग मात्र साध्य करून घेत असत. वृत्तपत्रकारांशी असा स्नेहबंध निर्माण करण्याचा यशवंतरावांनी कधीच प्रयत्न केला नाही अशी माझीच नव्हे तर अनेक पत्रकारांची त्यांच्याबद्दल तक्रार होती. वृत्तपत्रे ही 'फोर्थ इस्टेट' म्हणून मानली जाते आणि त्यांचे आपण सहकार्य घेणे आवश्यक आहे याची यशवंतरावांनी जाणीवच ठेवली नाही. त्याचा परिणाम असा झाला की एक समर्थ, कर्तबगार आणि राष्ट्राचे भवितव्य घडवून आणणारे पुढारी म्हणून वृत्तपत्रातून त्यांची प्रतिमा कधीच प्रगट झाली नाही.

यशवंतराव चव्हाणांचे वैभव मी गोव्यामध्ये पाहिले होते. १९६३ साली गोव्यामध्ये जी निवडणूक झाली त्या निवडणुकीच्या वेळी संरक्षणमंत्री म्हणून पहिल्या प्राथमचे निवडणुकीत भाग

घेण्यासाठी यशवंतराव आलेले होते. सबंध गोव्यातील जनसमुदाय दाभोळी विमानतळावर त्यांच्या स्वागतासाठी जमा झालेला मी पाहिला. योगायोग असा की त्यावेळी त्याच विमानाने किंवा त्याच्या आधीच्या विमानाने लालबहादूर शास्त्रीही आले होते. ते निरीक्षक म्हणून आलेले होते. गोव्यातील परिस्थिती पाहण्यासाठी आणि हाताळण्यासाठी काँग्रेसने त्यांना पाठविले होते. काँग्रेसच्या निवडणुकीतील परिस्थितीबद्दल त्यांना अंदाज घ्यावयाचा होता, ती समजावून घ्यावयाची होती. त्यावेळी महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष प्रबळपणे पुढे आलेला होता. आणि तो काँग्रेसला विरोध करीत होता. तेव्हां अशा परिस्थितीत काँग्रेसचे चॅन्सेस तरी काय आहेत हे पहाण्यासाठी काँग्रेस श्रेष्ठीनी लालबहादूर शास्त्री यांना पाठविले होते. मी प्रत्यक्ष पाहिलेले आहे म्हणून सांगतो लालबहादुर शास्त्री विमानतळावर एकटे वसलेले होते. माझी आणि शास्त्रीजींची पूर्वीची ओळख होती म्हणून मी त्यांच्याकडे गेलो. त्याचक्षणी यशवंतरावांची भव्य मिरवणूक सुरू होण्याच्या बेताला आली होती. मी शास्त्रीजींना म्हटले "आपण मिरवणुकीत सामील होत नाही का?" त्यावर शास्त्रीजी लगेच म्हणाले "अरे भाई, यह जुलूस मेरा नही है, यह डिफेन्स मिनिस्टर के सन्मान में चल रहा है" आणि मग शांतपणे ते आपल्या वाहनाची वाट पहात वसले.

सहज आठवले म्हणून सांगतो, काँग्रेसच्या प्रचंड मिरवणुकी होत होत्या. जयघोष निनादत होता, सभाही भव्य होत होत्या. पण शास्त्रीजी किती विचारी होते, त्यांचे जजमेंट किती अचूक होते याचा प्रत्यय दोन दिवसांनी त्यांची माझी भेट झाली त्यावेळी

त्यांच्या बोलण्यातून मला आला. मांडवी हॉटेलमध्ये नास्ता घेत असताना त्यांनी मला सहज प्रश्न केला "कर्णिकजी चुनाव के बारे मे आपका खयाल क्या है?" मी एवढेच म्हटले "काँग्रेसला ५/६ सीटस् सहज मिळतील" त्यावर शास्त्रीजींनी तात्काळ उत्तर दिलं "यह होनेवाला नही है, मामला अपने खिलाफ है" शास्त्रीजींनी दोन दिवसांच्या आत सबंध परिस्थिती पाहिली होती आणि त्यांचे जजमेंट असे झाले होते की काँग्रेसला गोव्या-मध्ये यश मिळणार नाही, ज्याला राजकीय आडाखे म्हणतात ते आडाखे बांधल्यानंतरच व्यक्ती किंवा नेता पुढे जाऊ शकतो. शास्त्रीजींचा मोठेपणा असा की गोव्याच्या परिस्थितीबद्दल त्यांनी जो अंदाज बांधला होता तो थोड्याच दिवसात अचूक ठरला. कारण १९६३ सालच्या निवडणुकीत काँग्रेसला एकही जागा मिळाली नाही. भाऊसाहेब बांदोडकर यांनी आपल्या महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाला भव्य विजय मिळवून दिला होता.

यशवंतरावांच्या बाबतीत मला एवढेच म्हणावयाचे आहे की दिल्लीमध्ये त्यांनी आपल्या ध्येयदृष्टीचा प्रत्यय आणून दिला आणि आपली पावले विचारीपणानेही टाकली. पण त्यांनी आपले विचार प्रकट करुन नेतृत्वाचा कस मात्र दाखवून दिला नाही. त्यांनी विचारीपणाने पावले टाकली. पण तो विचारीपणा फारच सावधानपणाचा ठरला इतका की नेतृत्वाच्या स्पर्धेत ते हिरीरीने पुढे सुद्धा आले नाहीत त्यामुळे पुढे सगळे प्रश्न निर्माण झाले, वारसदारीचा प्रश्न पंडितजींच्या निधनानंतर पुढे आला पण यशवंतरावांना स्थान मिळालें ते दुय्यम प्रकारचे होते. वृत्तपत्रांतून जी प्रतिमा त्यांची निर्माण झाली ती दुय्यम प्रकारचीच होती.

वृत्तपत्रांशी आणि वार्ताहरांशी जिव्हाळ्याचे संबंध ठेवण्यात यशवंतरावांनी जी अनास्था दाखविली तिच्यामुळेच त्यांची प्रतिमा तेजाने उजळून निघाली नाही.

पंडितजींचे निधन झाले त्यावेळेचा आपण विचार करूया ते त्यावेळी अमेरिकेत होते. अमेरिकन परराष्ट्रमंत्री डीन रस्क यांनी त्यांना फोन करून ही वार्ता दिली आणि म्हटले " सारे कार्यक्रम रद्द करा आणि माझ्याबरोबर चला म्हणजे पंडितजींच्या अंत-यात्रेला आपण हजर राहू शकू. " दिल्लीतील वातावरण त्यावेळी असे स्फोटक होते की नेतृत्वपदी कोण येईल याचा नियम नव्हता. मोरारजीभाईंनी नेहमीच्या उतावीळपणाने म्हणा किंवा हेकट-पणाने म्हणा त्यावेळी एकदम जाहीर केले, की " मी या स्पर्धेमध्ये भाग घेणार आहे, प्रधानमंत्रीपदावर बसण्याचा माझा हक्क आहे." आता पंडितजींचे अंत्यसंस्कार दुसऱ्या दिवशी व्हावयाचे होते. त्याआधीच मोरारजींनी असे निवेदन करणे हे खात्रीने औचित्यपूर्ण नव्हते त्यांच्या या चुकीचे फळ त्यांना भोगावे लागले. यशवंत-रावांच्या तालमीत तयार झालेले वसंतराव नाईक यांनी मात्र विमानतळावरून तडक शास्त्रीजींचे निवासस्थान गाठले. त्यांनी मुंबईहून येतायेताच आपला विचार पक्का केला होता आणि प्रधानमंत्रीपदासाठी शास्त्रीजींची निवड केली होती. त्यांनी शास्त्रीजींना सांगितले " आम्ही प्रधानमंत्रीपदासाठी आपली निवड केली आहे आणि आपण त्याला संमती दिली पाहिजे." लालबहादुर असे चाणाक्ष आणि हिकमती की त्यांनी तोपर्यंत एक अवाक्षर सुद्धा काढले नव्हते. त्यांना कोणी विचारले की ते लगेच म्हणत " हा पक्षाचा प्रश्न आहे. पक्षांचे नेतृत्व जे काही

ठरवील ते मला मान्य आहे." त्यांनी पुढे असेही सूचित केले की "पंडितजींची कन्या इंदिराजी आहेत. त्या जर प्रधानमंत्री झाल्या तर मला फार आनंद होईल आणि मग कोणताही प्रश्नच उभा राहणार नाहीं."

आता त्यावेळी काँग्रेसचा खरा नियंता जर कोणी असेल तर ते कामराज होते. सिंडिकेटचे ते मुख्य होते. सिंडिकेटमध्ये अतुल्य घोष, स. का. पाटील, संजीव रेड्डी अशी मातबर नेतेमंडळी होती. कामराज आणि सिंडिकेट यांनी एक गोष्ट ठरविली होती की काही झाले तरी मोरारजी देसाई यांना प्रधानमंत्री केले जाऊ नये. यशवंतरावांना जेव्हां विचारण्यात आलं त्यावेळी त्यांनीच प्रथम 'कॉन्सेन्सस' हा शब्दप्रयोग उच्चारला. ते म्हणाले "कॉन्सेन्ससनेच या बाबतीतला निर्णय झाला पाहिजे." सर्वसंमत अशा निवडीबद्दलचा पर्याय यशवंतरावांनीच अशा रीतीने सुचविला. कॉन्सेन्सस घेण्याचे कार्य अर्थातच कामराज यांच्याकडे सोपविण्यात आले होतें. त्यांचा मोरारजी देसाई यांच्याबद्दलचा निर्णय आधीच ठरलेला असल्यामुळे दुसरे नाव जे लालबहादुर शास्त्री यांचे होते ते सर्वसंमतीने मंजूर झाले. कॉन्सेन्ससचा पर्याय स्वीकारला गेल्यामुळे त्यावेळी निवडणूक घेण्याचीही वेळ आली नाही.

ही झाली १९६४ सालची गोष्ट. १९६६ साली शास्त्रीजींच्या निधनानंतर त्यांचा वारसदार कोण असावा याबद्दल पुन्हा प्रश्न निर्माण झाला. याही वेळी यशवंतराव परदेशी होते. ते ताश्कंदला शास्त्रीजींना सहाय्य करीत होते. ताश्कंदच्या करारावर सही झाल्यानंतर शास्त्रीजींचे आकस्मिक निधन झाले. यावेळी

मात्र यशवंतरावांनी पद्धतशीरपणाने पुढाकार घेतला हे मला प्रत्यक्ष माहीत आहे. त्यांनीं पहिल्या प्रथम जाऊन इंदिराजींची भेट घेतली आणि त्यांना एवढेच सांगितले की "आपण जर उभ्या राहणार असला तर मी आपल्याला पाठिंबा देईन, आणि जर आपण उभ्या राहणार नसला तर मात्र आपण मला पाठिंबा द्यावा." अर्थात, कामराज यांना हे मान्य नव्हते. त्यांना असे वाटले की इंदिरा गांधी प्रधानमंत्री झाल्या तर आपले जे सिंडिकेट आहे त्याचे प्रभुत्व कायम राहील कारण इंदिराजी अनभिज्ञ आहेत. राजकारणामध्ये मुरलेल्या नाहीत तेव्हा त्यांना प्रधान-मंत्रीपद देण्यात आले तर आपण आपल्या पद्धतीने राज्यकारभार चालवू शकू, म्हणजे राज्यकारभारावर आपली छाप कायम राहू शकेल. त्या विचाराने त्यांनी इंदिरा गांधी यांचे नाव पुढे आणले. ते यशस्वी रीतीने मंजूरही करून घेण्यात आले. यावेळी मात्र यशवंतरावांच्या कॉन्सेन्ससला वाव मिळाला नाही. कारण मोरारजीभाईंनी निवडणूक लढविण्याचे ठरविले. या अटीतटीच्या लढाईत मोरारजी यांचा पराभव झाला आणि इंदिरा गांधी तिसऱ्या प्रधानमंत्री म्हणून निवडून आल्या.

आता इथे थोडेसे मी विषयान्तर करू इच्छितो. मोरारजी भाई तात्विक दृष्टया आपली भूमिका पक्केपणाने अमलात आणतात असा एक समज त्यांच्या बाबतीत रूढ आहे. विशाल द्वैभाषिकाच्या मुख्यमंत्रिपदाची निवड करावयाची वेळ आली तेव्हां मोरारजीभाईंनी अशी भूमिका घेतली की मला जर कोणाचा विरोध झाला तर मी त्या पदासाठी उभा राहणार नाही आणि हिरे हे दंड थोपटून उभे राहिल्यानंतर ते खरोखरच उभे

राहिले नाहीत आणि मग भाऊसाहेब हिरे व यशवंतराव यांच्या-मध्ये सामना होऊन त्यात यशवंतराव मुख्यमंत्री म्हणून निवडून आले. परंतु यावेळी मोरारजीभाईंना आपले ते तत्व आठवले नाही. कदाचित् त्यांना स्वतःलाच जाणीव झाली असावी की ही नीती चालणार नाही. राजनीतीचाच आपल्याला अवलंब केला पाहिजे. म्हणून प्रधानमंत्रीपदासाठी होणारी निवडणूक त्यांनी लढविली पण तीत त्यांचा पराभव झाला.

इंदिरा गांधी यांच्या प्रधानमंत्रीपदाच्या कालखंडाकडे आता आपण वळूया. त्या ज्यावेळी पार्लमेंटमध्ये प्रथम आल्या त्यावेळी राममनोहर लोहिया यांनी एकच उद्‌गार काढला " अरे यह तो गुंगी गुडिया है " गुंगी गुडिया म्हणूनच त्यांनी इंदिरा गांधींकडे पाहिले. इतर बरेच लोकही तसेच म्हणू लागले. त्यावेळी खुद्द कामराज यांना वाटले की, इंदिराजींना फार दिवस राज्य करता येणार नाही, आपण आज ना उद्या त्यांच्या हातातून सत्ता घेऊ शकू किंवा त्यांना आपल्या धोरणाप्रमाणे वागावयाला आपण भाग पाडू. परंतु त्यांची ही अपेक्षा आणि अनेकांचे इंदिराजींच्या बाबतीतील भाकित खोटे ठरले कारण इंदिरा गांधी यांनी थोड्याच दिवसात आपला अधिकार प्रस्थापित केला आणि पार्लमेंटमध्येही त्या प्रभावी भाषणे करू लागल्या. त्यानंतर काँग्रेसच्या प्रत्येक कार्यवाहीमध्ये त्या भाग घेऊ लागल्या आणि काँग्रेस सबळ करण्यासाठी त्यानी खूप प्रयत्नही केले. तथापी १९६७ साल आले आणि त्या साली काँग्रेसचा अनेक प्रांतांमध्ये पराभव झाला. उत्तरेकडील प्रांतामध्ये तर हा पराभव विशेषेकरून झाला आणि काँग्रेसची सत्ता विधायक दलाच्या हाती गेली. यावेळी

अनेक पक्ष एकत्र येऊन त्यांनी विधायक दल वनविले होते हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. काँग्रेसचा हा सर्वात मोठा पराभव होता आणि इंदिरा गांधी यांना ते सर्वात मोठे आव्हान होते. इंदिरा गांधी यांच्या वावतीत एक गोष्ट निश्चितपणाने सांगता येईल की त्यांच्या इतकी धीराची आणि जिद्दीने लढणारी बाई पृथ्वीतलावर मिळणार नाही. १९७० साली त्याची उभ्या राष्ट्राला आणि जगाला प्रचीती आली. त्या साली बांगलादेशचे युद्ध पेटले आणि तुम्हाला सांगतो की इंदिरा गांधी यांनी त्यांचे सारे सामर्थ्य पणाला लावले. स्वतः निर्णय घेण्याची त्यांची क्षमता, जिद्दीने लढाई करण्याची त्यांची ताकद यांचा कळस केला. ते युद्ध जिंकल्यानंतर त्यांचे कट्टर विरोधक असलेले वाजपेयी यांनी त्यांची कालीमातेशी तुलना केली हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. म्हणजे ही सामान्य बाई नव्हे ती प्रत्यक्ष कालीमाता दुर्गामाताच आहे अशी त्यांनी घोषणा केली. त्यांच्या तेजस्वी पराक्रमाने सारे राष्ट्रच भारावून गेल्यासारखे झाले होते. त्यानंतर १९७१-७२ साली पार्लमेंटच्या निवडणुका झाल्या, विधानसभांच्या निवडणुका झाल्या आणि त्यात इंदिरा गांधींना प्रचंड बहुमत मिळाले. त्याचक्षणी इंदिरा गांधी यांची राजवट या देशामध्यें रूजली इतकेच नव्हे तर ती अत्यंत प्रभावीपणे मार्ग आक्रमण करू लागली. यशवंतरावांचे त्यावेळचे कार्य अतिशय महत्वाचे होते. ते आणि इंदिरा गांधी यांच्यामध्ये जे सहकार्य निर्माण झाले ते इतके घनिष्ट होते की इंदिरा गांधी यांच्या किचन कॅबिनेटचे ते सभासद झाल्याचे जाहीर केले गेले. किचन कॅबिनेट म्हणजे अगदी अंतस्थ गट. त्या गटामध्ये सुद्धा यशवंतरावांची गणना केली जात होती.

यशवंतरावांनी पूर्ण विचारांनी इंदिरा गांधी यांना आपले सहकार्य अर्पण केले आणि मग ज्या ज्या अडचणी येतील त्या दूर करण्यासाठी त्यांनी आपल्या परीने शिकस्तीचे प्रयत्न केले.

पण राजकारण हे वारांगनेप्रमाणे चंचल असते. त्यात युती होतात आणि कालांतराने त्या मोडूनही पडतात. राजकारणातील डावपेचांचाच हा प्रश्न असतो. हे डावपेच असे असतात की ज्यांचा सामान्य जनांना बोध होऊ शकत नाही, पत्ताही लागत नाही. इंदिरा गांधींनी आपल्या सत्तेची प्रतिष्ठापना करण्यासाठी आपल्या विश्वासातील एक गट तयार केला. किचन कॅबिनेट म्हणून तो काहीशा उपहासाने संबोधिला जाऊ लागला. त्या गटात यशवंतराव होते, सुब्रह्मण्यम् होते, अशोक मेहताही होते. अशोक मेहता यांच्या प्रेरणेनेच इंदिरा गांधी यांनी रुपयाचे अवमूल्यनही केले आणि ते कामराज व सिंडिकेट यांच्या अपरोक्ष. कामराज यांना त्याचेच फार वैषम्य वाटले आणि तेथूनच त्यांचा व इंदिरा गांधी यांचा बेबनाव सुरू झाला. पण आश्चर्य असे की कालांतराने किचन कॅबिनेटही संपुष्टात आले.

राजकारणात किती झपाट्याने फेरबदल घडून येत असतो याचे हे एक उदाहरणच मानता येईल. हा फेरबदल इतक्या वेगाने झाला की परवापरवा पर्यंत इंदिरा गांधी यांच्या विश्वासातील प्रमुख म्हणून मानले गेलेल्या यशवंतरावांवर सिंडिकेटशी संगनमत करीत असल्याचा दोषारोप उघडपणाने केला जाऊ लागला. त्या बाबतीत मी हैदराबाद काँग्रेस अधिवेशनाचे उदाहरण देऊ शकतो. त्या अधिवेशनाला मी प्रत्यक्षपणे हजर होतो म्हणून

सांगतो की हैद्राबाद अधिवेशनात जी कुणकुण ऐकू येऊ लागली होती ती ही की सिंडिकेटने यशवंतरावांना आपल्या बाजूला ओढून घेतले आहे. आता राजकीय प्रांगणात वावड्या उडविणारे लोक भरपूर असतात. वृत्तपत्रांचे वार्ताहर याना त्या वाजूने त्यांच्यामध्ये मालमसाला भरीत असतात. त्या वावड्यात खरे खोटे किती याची शहानिशा कोणीच करु शकत नाही. एवढं खरं की यशवंतरावांचे सिंडिकेटशी साटेलोटे जमले आहे ही वातमी हैद्राबादच्या अधिवेशनात सर्वत्र परसली

त्याचा परिणाम व्हावयाचा तोच झाला आणि इंदिरा गांधी यांना यशवंतरावांबद्दल संशय वाटू लागला. हा संशय योग्य होता की अयोग्य होता याचे विवेचन मी करत नाही. परंतु पुढील काळामध्ये ज्या घटना घडल्या त्यांची पार्श्वभूमी या वार्ताविहारा-मुळे तयार झाली यात संशय नाही. त्या संशयाचे निराकरण करण्याचा दोघांनीही-म्हणजे यशवंतराव वा इंदिरा गांधी यांनी प्रयत्न केला नाही. तसा त्यांनी केला असता तर कदाचित् त्यांच्यामधील संघर्षाचे कारणही उरले नसते. पण या संशयाच्या वातावरणातच राष्ट्रपती झाकिर हुसेन यांचे निधन झाले आणि भावी राष्ट्रपती म्हणून कोणाला निवडावे याबद्दल काँग्रेस पक्षातच वाद निर्माण झाला. तसे पाहिले तर भारतातच नव्हे तर जगाच्याही दृष्टीने हा अत्यंत महत्वाचा विषय होता. निदान त्या विषयाच्या बाबतीत तरी इंदिरा गांधी व यशवंतराव यांच्या-मध्ये विचारविनिमय व्हावयाला काही हरकत नव्हती, नव्हे तो विचारविनिमय होणेही आवश्यक होते. नाही म्हटले तरी ते दोघेही दिल्लीत होते; त्यांच्या भेटीगाठीही होत होत्या. पण खुद्द

यशवंतरावांनी मला सांगितल्याचे आठवते की राष्ट्रपतींच्या बाबतीत दोघांनीही आपले मन खुले केले नाही. म्हणून इंदिराजींची निवड कोणती आणि यशवंतरावांची कोणती याबद्दल दोघांनाही एकमेकांचे मत कळले नाही.

त्या परिस्थितीत बंगलोर येथे काँग्रेस पार्लमेंटरी बोर्डाची बैठक झाली आणि तीत ५ विरूद्ध ४ मतांनी संजीव रेड्डी यांचे नांव उमेदवार म्हणून निवडण्यात आले. लोकशाहीचा संकेत विचारात घेतला तर फक्त एका मताने राष्ट्रपतिपदासाठी उमेदवार निवडणे हे खात्रीने औचित्यपूर्ण नव्हते. लोकशाहीच्या दृष्टीनेही ही प्रथा चुकली. कारण पार्लमेंटरी बोर्ड अशा तांत्रिक बहुमताने असा महत्वाचा निर्णय घेत नसते. यशवंतरावांना त्याची जाणीव होऊ नये ही आश्चर्याची गोष्ट आहे. त्यावेळी त्यांची प्रतिष्ठा अशी होती की सिंडिकेटच्या नेत्यांना ते निर्णयापासून खात्रीने परावृत्त करू शकले असते. पण अजाणतेपणी का होईना त्या ठरावाला संमती दिली आणि त्यातून काँग्रेसच्या इतिहासात क्वचितच घडला असेल असा संघर्ष निर्माण झाला.

इंदिराजी डावपेच खेळण्यात मोठ्या प्रवीण होत्या. बंगलोरच्या बैठकीत त्यांनी आकस्मिकपणे बाबू जगजीवनराम यांचे नांव राष्ट्रपतिपदासाठी पुढे आणले. पण स्वतः जगजीवनराम राष्ट्रपतीपदी प्रतिष्ठित व्हावयाला तयार नव्हते. त्यांनी लगेच जाहीर केले की, " मी इतका काही म्हातारा झालेलो नाही की प्रत्यक्ष सक्रीय राजकरण सोडून मी राष्ट्रपती बनावे. " एवढे खरे की बंगलोरच्या बैठकीने इंदिरा गांधी यांचा तात्पुरता का होईना पराभव केला. मी म्हणतो ' तात्पुरता ' कारण त्यानंतर इंदिरा

गांधी यांनी लगेच असा एक पवित्रा घेतला की ज्यामुळे सारे राष्ट्र हादरून गेले. दिल्लीतील डावपेचाच्या दृष्टीनेही या पवित्र्याने कळस गाठला असे म्हटले पाहिजे.

या डावपेचाचे दोन भाग होते. एक आघात करणारा आणि दुसरा क्रांतिकारक पण विधायक स्वरूपाचा. त्यांनी आघात केला तो मोरारजी देसाई यांच्यावर. मोरारजी देसाई यांचे त्यांनी अर्थमंत्रिपदावरून उच्चाटण केले. त्याचबरोबर त्यांनी चौदा बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची घोषणा केली. आता बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची हिरीरीने भूमिका घेतली होती ती यशवंतरावांनी. त्यांच्याच नेतृत्वाखाली महाराष्ट्र काँग्रेसने बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा ठराव आधीच मंजूर करून घेतला होता. त्या दृष्टीने महाराष्ट्राने या विषयावर अग्रस्थान पटकावले होते, पण त्याबद्दलची प्रसिद्धी मात्र भारतात करण्यात आलेली नव्हती वस्तुतः यशवंतराव दिल्लीत असल्यामुळे त्यांना ही प्रसिद्धी मिळविता आली असती आणि या विषयावर महाराष्ट्र काँग्रेस अग्रस्थानी असल्याचे श्रेयही मिळविता आले असते. पण वृत्तपत्रांना आणि वार्ताहरांना महत्व देण्याच्या बाबतीत यशवंतरावांनी नेहमीच अनास्था दाखविली आणि दिल्लीतील मातबर वार्ताहरांची तर त्यांनी उपेक्षा केली हे एक कटू सत्य आहे.

आता इंदिरा गांधी यांनी दुहेरी डावपेच टाकून आपल्या प्रतिपक्षीयांना अक्षरशः नामोहरम करून टाकले होते. यशवंतरावांपुढे सुद्धा असा एक पेच निर्माण झाला होता की मोरारजीभाई यांच्या विरुद्ध केलेल्या कृतीबद्दल नापसंती व्यक्त करावी

तर बँकांच्या राष्ट्रीयीकरणाच्या ऐतिहासिक निर्णयाला दुय्यम स्थान दिले असा त्यांच्यावर आक्षेप येण्याचा संभव होता. म्हणून त्यांनी विचारांती पहिल्या विषयावद्दल मौन धारण केले आणि बँकांच्या राष्ट्रीयीकरणाबद्दल मात्र इंदिरा गांधींचे मनःपूर्वक अभिनंदन केले. त्यात त्यांनी हेही सूचित केले की यापुढे त्या जी जी पावले टाकतील त्यात आपले हार्दिक सहकार्य त्यांना लाभेल आणि आपल्या निष्ठेबद्दल इंदिरा गांधी यांनी अणुमात्रही संदेह बाळगू नये.

सिंडिकेटला अर्थातच हे मान्य नव्हते. त्यांनी काँग्रेसमध्ये दुफळी पाडण्याचा निर्णय घेतला आणि मग या गटाने त्या गटाला पदच्युत करणे, एका गटाने दुसऱ्या गटाविरुद्ध विषारी प्रचार करणे आणि खरी काँग्रेस कोणती याबद्दलचा वाद अटीतटीनें लढविणे या सर्व राजकारणाला ऊत आला. यशवंतरावांच्या पुरते एवढे म्हणता येईल की त्यांनी जी भूमिका घेतली ती एकजुटीची भूमिका होती आणि त्यापासून ते पुढे ढळले नाहीत. इंदिरा निष्ठेचीच ही भूमिका होती असेही तिच्याबद्दल म्हणता येईल. त्यावेळी मुंबईमध्ये महाराष्ट्र काँग्रेसचे जे शिबिर यशवंतरावांनी भरविले होते त्यात अधिकृतपणे एकजुटीचा हा ठराव त्यांनी मंजूर करून घेतला. त्यावेळी भाषण करताना यशवंतरावांनी कळकळीने सांगितले की जे काही झाले गेले ते विसरून जा आणि काँग्रेसच्या निष्ठेने कार्याला लागा. एकजुटीच्या ठरावाचे समर्थन करताना के. के. शहा यांनी असे म्हटले की हा ठराव म्हणजे काँग्रेसची गीता, कुराण आणि बायबल आहे, असे मानून आपण मागील इतिहासावर पडदा टाकला पाहिजे. यशवंतरावांची ही भूमिका

त्यावेळी इंदिराजींनाही मान्य झाली होती हे मी निःसंदिग्धपणे सांगू शकतो. खरे तर त्यांनाही आधार हवा होता आणि यशवंतरावांचा आधार मिळाल्यावरोवर त्यांनाही खात्री पटली की आपले राजकीय स्थान आता डळमळीत होणार नाही. पुढील काळामध्ये इंदिराजींनी जी जी पावले टाकली ती यशवंतरावांच्या सल्लामसलतीने टाकली यात तिळमात्रही संशय नाही.

मग प्रश्न असा येतो की इंदिरा गांधी व यशवंतराव यांच्यामध्ये दुरावा का निर्माण झाला? पार्लमेंटरी बोर्डाच्या बैठकीतून निर्माण झालेला दुरावा यशवंतरावांनी सांधला होता. पण आता त्याकाळचा विचार मनात आला की असे वाटते की त्यानंतरच्या काळामध्ये त्या दोघांमधील संबंध सर्वस्वी जिव्हाळ्याचे राहिले असतील किंवा काय याबद्दल निश्चितपणे निर्वाळा देता येणे कठीण आहे. इंदिरा गांधी या अतिशय धोरणी असल्याकारणाने यशवंतरावांचे महत्व जाणून त्यांनी त्यांना कधी दुखविले नाही यात संशय नाही. पण नंतर लगेच अलाहाबाद हायकोर्टाचा त्यांच्या निवडणुकीबद्दल जो निर्णय प्रकट झाला त्या बाबतीतील उपाययोजना करण्याच्या बाबतीत इंदिरा गांधींनी यशवंतरावांशी विचार विनिमय केला असेल असे मात्र मला वाटत नाही. या निर्णयात हायकोर्टाने तांत्रिक कारणासाठी इंदिरा गांधी यांची निवडणूक अवैध ठरविली होती. शिवाय त्यावर त्यांनी अपीलही सादर केले होते. तेव्हां त्या अपीलाचा निकाल लागेपर्यंत इंदिरा गांधी यांनी राजीनामा द्यावा काय हा एक प्रकारचा पेच त्यांच्यापुढे उभा राहिला होता. इंदिरा गांधी यांनी राजीनामा दिला असता तर काय झाले असते हे सांगणे कठीण आहे. त्या

स्वत: राजीनामा देण्याचा विचार करीत होत्या असेही म्हणतात. पण त्या बाबतीत त्यांच्यावर संजय गांधी यांनी दडपण आणले हे मात्र निश्चित आहे. संजय गांधी यांनी त्यांना निक्षून सांगितले की जर तुम्ही अधिकारपद सोडले तर तुम्ही पुन्हा अधिकारपदावर येणार नाही हे निश्चित समजा आणि त्या दृष्टीने जो निर्णय घ्यावयाचा असेल तो घ्या. संजय गांधी यांच्या म्हणण्यामध्ये तथ्य नव्हते असे मुळीच नव्हे. देशातील त्यावेळची राजकीय परिस्थिती लक्षात घेतली तर इंदिरा गांधी एकदा उच्च पदावरून बाजूला सरल्या असत्या तर राजकारणाला कोणती कलाटणी मिळाली असती हे सांगणे कठीण आहे.

नैतिक दृष्टीने आणि लोकशाही संकेताच्या दृष्टीने या प्रश्नाचा विचार करावयाचा झाला तर इदिरा गांधी यांनी यावेळी राजीनामा द्यावयालाच पाहिजे होता. तो त्यांनी न दिल्या-मुळे राज्यघटनेशी विपरीत अशी त्यांची कृती झाली असे जरी म्हणता आले नाही तरी लोकशाहीच्या व्यवहाराशी विसंगत असे त्यांचे वर्तन झाले यात संशय नाही. त्यांच्या या कृतीचा जो परिणाम झाला तो असा की जयप्रकाश नारायण यांनी बंडाचा पुकारा केला, गुजरात, बिहारमधे क्रांतीची लाट उसळली आणि इंदिरा गांधी यांना या देशामध्ये आणीबाणीही अखेरीस पुकारावी लागली.

एक लोकशाहीवादी म्हणून मला कोणी विचारलेकी यशवंतरावांचे अशावेळी काय कर्तव्य होते तर मी निश्चितपणे म्हणेन की त्यावेळी यशवंतराव आणि जगजीवनराम यांनी इंदिरा गांधी यांना सांगितले असते की आणीबाणी जाहीर करणे

हे चुकीचे आहे आणि त्या धोरणाच्या बाबतीत आम्हाला आपल्याशी सहकार्य करता येणार नाही तर इंदिरा गांधी या आणीबाणीच्या धोरणापासून खात्रीने परावृत्त झाल्या असत्या. अर्थात आता या बाबतीत आपल्याला काहीच बोलता येणार नाही. कारण इंदिरा गांधी गेल्या आहेत, यशवंतरावही गेले आहेत आणि फार मोठं पाणी वाहून गेलं आहे गंगानदीतून आणि सगळ्याच नद्यांतून. एवढे खरे की आणीबाणीची भूमिका घेतल्यानंतर सबंध काँग्रेसची परिस्थिती अत्यंत वाईट झाली आणि त्या काळात जे काही अत्याचार झाले असतील, ज्या काही कृती घडल्या असतील त्या सर्वांचा परिणाम एकच झाला आणि तो म्हणजे १९७७ साली काँग्रेसचा पराभव होऊन देशामध्ये जनता पक्षाची राजवट प्रस्थापित झाली.

काँग्रेसचा त्यावेळी पराभव झाला खरा. पण यशवंतराव मात्र महाराष्ट्रातून पार्लमेंटमध्यें निवडून गेले. त्यानंतर विरोधी पक्षाचे नेते म्हणूनही ते निवडले गेले. साहजिकच त्यावेळी जनता पक्षाने इंदिरा गांधी यांच्याविरुद्ध जी संघटित मोहीम उभारली त्यांच्याविरुद्ध जे खटले भरले त्यांच्या चौकशीसाठी जे कमिशन नेमले आणि एकंदरीने त्यांना जे सूडबुद्धीने वागविले त्या सर्व गोष्टींचा विरोधी पक्षाचे पुढारी म्हणून यशवंतरावांनीं निषेध करावयाला पाहिजे होता. ते त्यांचे कर्तव्य होते. इंदिराजींच्याबद्दलच्या निष्ठेशीही ते सुसंगत ठरले असते. पण यशवंतरावांनी जी भूमिका घेतली ती दुबळेपणाची होती आणि त्यामुळे इंदिराजी व ते यांच्यामधील दुवा घट्ट होण्याऐवजी त्यांच्यामध्ये एक प्रचंड दरी निर्माण झाली. त्यानंतरच्या काळामध्ये इंदिरा गांधी एका बाजूला

आणि यशवंतराव विरोधी बाजूला अशा तऱ्हेचे चित्र देशामध्ये निर्माण झाले. हे चित्र डोळ्यासमोर ठेवूनच आपल्याला यशवंतरावांच्या दिल्लीतील यशापयशाचे परिमाण ठरवावे लागेल.

यशांचा विचार केला तर यशवंतरावांनीं दिल्लींच्या मुक्कामात देश विदेशातील मुत्सद्यांशी कौशल्याने वाटाघाटी केल्या हे प्रथम नमूद करावे लागेल. अमेरिका, ब्रिटन आणि रशिया या तीन प्रबळ राष्ट्रांशी त्यांचे संबंध आले, आर्थिक आणि लष्करी या दोन्ही क्षेत्रातील मागण्या त्यांना कराव्या लागल्या. त्याविषयी डावपेचही खेळावे लागले. यशवंतराव त्या बाबतींत उणे पडले नाहीत, देशातील प्रश्नांच्या बाबतीत त्यांनीं चांगले कार्यक्रम आखले, वेळोवेळी सरकारचे व लोकांचे चांगल्या रीतीने मार्गदर्शनही केले. आणि निरनिराळ्या खात्यांचा कारभार समर्थपणे सांभाळला. त्यांचे हे यश त्यांच्या टीकाकारांनाही मान्य करावे लागेल.

पण दुसऱ्या दृष्टीने आपण विचार करावयाला लागलो तर मला असे वाटते की दिल्लीतील अखेरच्या दिवसात यशवंतरावांच्या पदरीं काहीसे अपयशच आले. त्या अपयशाचे एक प्रमाण जनता पक्षातील फाटाफुटीच्या वेळी त्यांनी ज्या नेतृत्वाला साथ दिली त्यातून प्रकर्षाने प्रगट होते. ती वेळ व परिस्थिती अशी होती की जनता पक्षाचे नेतृत्व मोरारजी देसाई यांच्या व्यतिरिक्त कोणत्या नेत्याकडे जावे याचा खल होत असताना प्रामुख्याने दोन नावे पुढे आली होती- एक चरणसिंग आणि दुसरे जगजीवन बाबू. मला स्वतःला असे वाटते की यशवंतरावांनी जगजीवनराम यांच्या बाजूने कौल दिला असता तर जनता पक्षाची

राजवट पुढील पाच वर्षेपर्यंत टिकूही शकली असती. कारण जगजीवनराम हे एक निष्णात ॲडमिनिस्ट्रेटर म्हणून नावाजले गेले होते. त्यांच्यामध्ये अनेक प्रकारच्या लोकांना बरोबर घेंऊन जाण्याचे मुत्सद्दीपणही होते. त्या दृष्टीने ते जनता पक्षाची आवळचाची मोट एकत्रितपणे सांभाळू शकले असते. तथापी यशवंतरावांना त्यांच्या-बद्दल विश्वास वाटला नाही याचे प्रमुख कारण असे आहे की त्यांच्या बरोबर त्याचवेळी प्रबळ असा जनसंघ आणि त्यांचे नियंते असलेली आर्. एस्. एस्. ही संघटनाही होती. त्यामुळे त्यांच्याशी आपल्याला सहकार्य करता येणार नाही असे यशवंत-रावांना वाटले. त्यांनी माझ्याशी बोलताना ते स्पष्टही केले. मला आठवते, त्यावेळी मी त्यांना प्रश्न केला की आपल्या आशीर्वादाने जे शरदराव पवार महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री झाले त्यांच्या मंत्रीमंडळामध्ये जनसंघ आहे त्याचे काय ? त्यावर यशवंतरावांनी स्पष्टपणे मला सांगितले " मी शरदला सांगितले होते की तू राज्यकारभार आपल्या हाती घेऊ नकोस, मला ते मान्य नाही " आता हे खरे की खोटे हे कोण सांगू शकणार ? शरदरावही सांगू शकतील किंवा नाही याची शंका आहे. परंतु मला असे वाटते की त्यावेळी यशवंतरावांचे जजमेंट चुकले आणि त्यातून अखेरच्या काळामध्ये त्यांच्या पदरी अपयश आले, एवढेच नव्हे तर लोकांमध्ये अशी एक भावना निर्माण झाली की यशवंत-रावांची भूमिका सतत बदलत असते आणि तिला आता तर कोणते स्थिर अधिष्ठान राहिलेले नाही.

नंतरच्या काळामध्ये त्यांनी ज्यावेळी घोषणा केली की मी स्वगृही जात आहे त्याचा अर्थ साधारणपणे लोकांनी असा केला

की यशवंतराव चव्हाण यांचा हा पराभवच आहे. अर्थात याबद्दल जो तो आपल्या परीने चिकित्सा करू शकेल. माझ्या दृष्टीने मात्र ज्या परिस्थितीत यशवंतरावांनी हा निर्णय घेतला त्याचा विचार केला तर यशवंतरावांचे हे अपयश मानता येणार नाही. त्याचें कारण असे आहे की यशवंतरावांनी ज्या काँग्रेसबद्दल निष्ठा बाळगली होती ती गांधी-नेहरूंची काँग्रेस होती तीच पुढे इंदिरा काँग्रेस झाली. अर्थात काँग्रेसमधील दुफळीनंतर ती इंदिरा काँग्रेस म्हणून ओळखली जाऊ लागली. आता १९७०, ७१, ७२ साली ही काँग्रेस अत्यंत प्रबळ झाली. १९७७ साली तिच्या पदरी अपयश आले. पण १९८० साली इंदिरा गांधी यांनी पुन्हा निवडणूका जिंकल्या आणि आपल्या काँग्रेसची अधिकच घट्ट पायावर त्यांनी प्रतिष्ठापना केली. या प्रतिष्ठापनेला मान्यता देणे अपरिहार्य होते. यशवंतरावांनी ती मान्यता देताना निःसंकोचपणे जाहीर केले की इंदिरा काँग्रेस हीच खरीखुरी गांधी नेहरूंची काँग्रेस आहे आणि म्हणून आपण स्वगृही परत जात आहे. माझ्या मते यशवंतरावांनी काही अपेक्षा, आकांक्षा डोळ्यासमोर ठेवून हा निर्णय घेतला नव्हता. त्यांना त्यातून काही साध्य करावयाचे होते असेही मला वाटत नाही. या बाबतीत त्यांचे माझे जे वेळोवेळी बोलणे झाले होते त्याचा मी निर्वाळा देऊ शकतो. हा निर्णय घेण्यापूर्वी कित्येक दिवस आधी त्यांनी मला सांगितले होते की मला जे काही मिळवावयाचे होते ते मी मिळवले आहे. आता मला कोठलीही अपेक्षा, आकांक्षा राहिलेली नाही. त्या भूमिकेमागे त्यांचा एक दृष्टीकोण होता तो मात्र स्पष्ट केलाच पाहिजे. माझ्याशी बोलताना त्यांनी मला म्हटले होते " यातून मला स्वतःला काही साध्य करून घ्यावयाचे नाही. परंतु माझ्याबरोबर जो माणसे

राहिली, सतत राहिली, निस्वार्थीपणे लढत राहिली त्यांची परिस्थिती आता दुर्धर होत चालली आहे. त्यांना यापुढे मी फार काळ अंधारात ठेवू इच्छित नाही. माझे जे एकनिष्ठ अनुयायी आहेत, जे अतिशय श्रद्धायुक्त अंतःकरणाने माझ्या पाठीमागे आलेले आहेत, माझ्यासाठी ज्यांनी अतिशय कष्ट उपसले आहेत, त्याग केला आहे, यातना सहन केल्या आहेत त्यांच्यासाठी इंदिरा काँग्रेसमध्ये जाण्याखेरीज माझ्यापुढे मार्ग राहिलेला नाही. त्यांचे भवितव्य यातून घडेल अशी माझी धारणा आहे" ती धारणा ठेवून यशवंतरावांनी इदिरा काँग्रेसमध्य पदार्पण केले. त्यानंतरचा सारा इतिहास आपल्यापुढे उभा आहे.

दिल्ली दरबारातील यशवंतरावांचे कार्य विचारात घेतले तर त्यांच्या पदरी काही यश पडते त्याचप्रमाणे अपयशाचेही ते धनी झालेले आढळून येतात. त्यांच्या कारकीर्दीत काही चांगल्या गोष्टी घडल्या तशाच काही अनिष्ट घटनाही घडल्या. पण त्यांचा साकल्याने विचार करताना मला असे मात्र म्हणावेसे वाटते की या कालखंडात जर यशवंतराव बोलके झाले असते तर त्यांच्या कार्याला निःसंशय फार मोठा उठाव मिळाला असता. त्यांच्याबद्दल माझा आक्षेप होता- आणि जो मी वेळोवेळी त्यांच्यापुढे प्रकटही करीत असे- तो हा की काँग्रेसमधील एक विचारवंत म्हणून त्यांनी जे विचार प्रकट करावयाला पाहिजे होते, जी भाष्ये करावयाला पाहिजे होती, ज्या विचारमंथनाला चालना द्यावयाला पाहिजे होती ते ऐतिहासिक कार्य त्यांनी कधीच पार पाडले नाही. माझें असे ठाम मत आहे की काँग्रेसमध्ये नेहरूंच्या नंतर विचार मांडणारा एकच नेता होता तो म्हणजे यशवंतराव चव्हाण हेच

होत. त्यांनी विचार मांडू नये हे मला मुळीच पटले नाही. कदाचित चीनच्या आक्रमणाच्या बाबतीत त्यानी जो विचार मांडला होता तो नेहरूंना पटला नाही हे त्यांनी पाळलेल्या मौनाचे एक कारण असू शकेल. तेव्हापासून यशवंतराव यांची एकच भावना झाली की आपल्याबद्दल जो संशय निर्माण झाला आहे, काहीसे जे किल्मिश निर्माण झाले आहे ते उगाच बोलून वाढवू नये. त्या दृष्टीने त्यानी आपले विचार मनातच ठेवले आणि पुढील काळात त्या विचारांना कधी वाचाच फोडली नाही.

यशवंतरावांनी जे मौन पाळले त्याचा अनुभव मी स्वतः घेतला आहे. गोव्याला भाऊसाहेब बांदोडकर स्मृति व्याख्यानमाला आम्ही सुरू केली. त्या व्याख्यानमालेत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, डॉ. जयंतराव नारळीकर, राजा रामण्णा यांच्यासारख्या विद्वानांनी आणि शास्त्रज्ञांनी व्याख्यानपुष्पे गुंफली. त्यावेळी यशवंतरावांना मी सतत आग्रह केला की त्यानी आपले विचार मांडावे. राजकारणाचा नसला तरी समाज धारणेचा समाजपरिवर्तनाचा कोठलाही विचार त्यांनी मांडावा ही माझी इच्छा होती. पण यशवंतरावांनी आमची विनंती मान्य केली नाही आणि आपला विचार मांडला नाही.

मला निश्चितपणे असे वाटते की यशवंतरावांनी विचार मांडला असता तर नेतृत्वाला आणि अनुयायांना दिलासा मिळाला असता आणि कदाचित पुढे जे महाभारत घडले ते घडलेही नसते. त्यांच्यासारखा विचार देणारा माणूस गप्प राहिला, त्याने मौन धारण केले हे सुद्धा देशाच्या दृष्टीने एक दुर्दैवच

होय असे मी समजतो. देशाचा विकास होण्याच्या दृष्टीने यशवंत-रावांच्या सारखा विचारवंत आर्थिक म्हणा, सामाजिक म्हणा, राजकीय म्हणा या सर्व विषयांवर अधिकारवाणीने बोलू शकला असता. ते बोलले नाहीत आणि त्यामुळे वैचारिक दृष्टीने एक पोकळी निर्माण झाली. ऐतिहासिक दृष्टीने आणि विचारांच्या दृष्टीने ती पोकळी आता कधीच भरून येणार नाही. यशवंतराव यांच्यासारखा एक विचारवंत, खंदा राजकारणी पुरुष, ज्याला गांधी, नेहरू, रॉय यांच्यासारख्या विभूतींचा वारसा लाभलेला होता तो आज पडद्याआड झाला आहे. त्यांची स्मृती तेवढी आज आपल्याला आधार तशीच स्फूर्ती देणार आहे. त्यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन करून मी माझ्या व्याख्यानमालेचा शेवट करीत आहे. धन्यवाद.

दा.भ. कर्णिक

' महाराष्ट्र दिशाहीन होतो आहे काय ? '

मा. श्री. रायभानजी जाधव, औरंगाबाद

नेतृत्त्वात वारंवार बदल होत गेल्यामुळे गेल्या पांच-सात वर्षात महाराष्ट्राची शेती, सिंचन, उद्योगधंदे, मनुष्यबळ निर्मिती आणि विज्ञान, तंत्रज्ञान या सर्वच क्षेत्रात कशी परागती होत आहे याचे विदारक चित्रण या व्याख्यानात केलेले आहे.

गेल्या पांच-दहा वर्षात जे प्रांत विकासाच्या संदर्भात महाराष्ट्राच्या तुलनेत कुठेच नव्हते ते आज आपल्या विकासाचा वेग महाराष्ट्रापेक्षा अधिक वाढवत आहेत – पुढे जात आहेत. खरे म्हणजे मुळातच ताकदवान असलेला महाराष्ट्र ही गती इतरांपेक्षा सहज जास्तीची ठेवू शकला असता. असे का घडले नाही याचे संक्षिप्त विवेचन ' महाराष्ट्र दिशाहीन होतो आहे काय ? ' या विषयावरील व्याख्यानाद्वारे इथे करण्याचा लेखकाने (वक्त्याने) प्रयत्न केलेला आहे.

श्री. रायभानजी जाधव

शिक्षण : हिंदी ' साहित्य विशारद ' १९५७ सर्वप्रथम,
मराठी ' साहित्य आचार्य '१९६१ महाराष्ट्रात सर्वप्रथम,
बी. ए. (ऑनर्स) १९६३ सुवर्णपदक विजेते,
एम्. ए. (मुंबई विद्यापीठ) सर्वप्रथम-सुवर्णपदक विजेते.

जन्म : १९४२ साली. सामान्य शेतकरी कुटुंबात.

- १९६४ साली डेप्युटी कलेक्टर म्हणून निवड. १९७३ अखेर महाराष्ट्रातील निरनिराळ्या जिल्ह्यात डेप्युटी कलेक्टर म्हणून काम.
- १९७५ ते १९७६ पर्यंत महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचे प्रायव्हेट सेक्रेटरी. नंतर सरकारी नोकरीचा त्याग करून काँग्रेस पक्षात प्रवेश.
- १९८० साली विधीमंडळ सभासद म्हणून निवड.

सामाजिक कार्य :

- महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण समितीचे चेअरमन
- महाराष्ट्र राज्य मिनिमम् वेजेस बोर्डाचे चेअरमन
- मराठवाडा इलेक्ट्रॉनिक्स असो., सहकारी साखर कारखाने, जिनिंग आणि प्रेसिंग कारखाने, मराठवाडा डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि., इत्यादींचे चेअरमन म्हणून काम.
- देवगिरी टेक्स्टाईल मिल्स लि., पुलगांव टेक्स्टाईल मिल, टेक्स्टाईल कॉर्पोरेशन ऑफ मराठवाडा लि., एम्. एस्. एफ्. सी., एम्. आय्. डी. सी., एम्. एस्. एस्. आय्. डी. सी., सिकॉम इत्यादिवर संचालक (Director) म्हणून काम.

परदेश दौरा :

- १९८१ इरिगेशन कॉन्फरन्ससाठी इस्त्रायल व इजिप्त येथे प्रतिनिधी म्हणून.
- १९८३ इस्त्राईल व इजिप्त
- १९८३, १९८४ मध्ये ग्रीस, जर्मनी, फ्रान्स, हॉलंड, इटली, ऑस्ट्रेलिया येथे ट्रेड युनियन्स, इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट आणि पर्यटन यासाठी (Tourism) अभ्यास दौरा
- १९८४ मध्ये इलेक्ट्रॉनिक्सच्या विशेष अभ्यासासाठी अमेरिका व जर्मनी येथे दौरा

प्रकाशित साहित्य :

- वाङमयीन समिक्षा, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र यावर तीन पुस्तके व दोनशे-हून अधिक लेख प्रसिद्ध.

इतर विशेष :

- तंत्र शिक्षण व इलेक्ट्रॉनिक्स यामध्ये विशेष रस, शेती हा जिव्हाळ्याचा विषय, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरील चर्चासत्रे व परिसंवाद यात सहभाग

जनतेच्या विविध जिव्हाळ्याच्या प्रश्नांना विधिमंडळात वाचा फोडणारे जनहितदक्ष व जागरुक विधिमंडळ सदस्य म्हणून काम.

सध्या कन्नड सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन.

श्री. रायभानजी जाधव
' हर्षवर्धन ' अदालतरोड,
औरंगाबाद (महाराष्ट्र)

रायभान जाधव

' महाराष्ट्र दिशाहीन होतो आहे काय ? '

मा. श्री. रायभानजी जाधव–

४–१०–१९८६

अध्यक्ष श्री. पी. डी. पाटील, उपाध्यक्ष श्री. शिंदे, ग्रंथपाल विठ्ठलरावजी आणि बंधू-भगिनींनो ! आपण गेली पंचावन्न वर्षे ही शारदीय व्याख्यानमाला चालवत आहात, याबद्दल मला खरोखरीच अतिशय आनंद होत आहे. सामान्यतः आपणा सर्व दाक्षिणात्यांच्या संदर्भामध्ये असं म्हटलं जातं की आपण लोक आरंभशूर आहोत. एखाद्या गोष्टीची सुरवात करावयाची आणि उत्साह आहे तोपर्यंत ती चालवायची – आणि मध्येच ती सोडून द्यायची, परंतु आपल्या या संस्थेने एक निष्ठा म्हणून गेल्या पंचावन्न वर्षापासून हे ज्ञानसत्र सतत चालू

ठेवलेलं आहे. त्याबद्दल मी आपणां सर्वांना मनापासून धन्यवाद देतो– आजच्या या व्याख्यानमालेचं उद्घाटन करण्याचं भाग्य आपण मंडळींनी मला दिलंत, त्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो आणि या आपल्या पंचावन्नवर्षीय शारदीय व्याख्यान–मालेचं उद्घाटन झालं असं मी जाहीर करतो.

आजचा माझा जो चर्चेचा विषय आहे तो अतिशय जिव्हाळ्याचा असा विषय आहे. मी प्रथमच कऱ्हाडकरांच्या सेवेमध्ये इथं उपस्थित आहे. प्रथमदर्शनी माझ्या असं लक्षात आलं की अलिकडच्या काळामध्ये माणसाने जी प्रगती केलेली आहे त्याचा आढावा घेणारं भाषण जर आपण केलं तर ते जास्त उपयुक्त होईल. परंतु पुन्हा मनामध्ये विचार आला की गेल्या दहा-बारा वर्षांपासून माझ्या मनामध्ये जो एक विषय घर करून राहिलेला आहे. त्याच्या संदर्भात माझी जी काही प्रतिक्रिया आहे. ती आपल्यापुढे व्यक्त केली तर जास्त संयुक्ति होईल. कारण जो नवा महाराष्ट्र घडवायचं भाग्य या कऱ्हाडच्या सुपुत्राला मिळालेलं होतं, इथच याच भूमीमध्ये त्यांनी जी स्वप्नं पाहिलेली होती– महाराष्ट्राच्या संदर्भातली ती पूर्ण झाली की नाही याच्या संबंधीचा पडताळा करून पाहण्याची संधी जर आपल्याला मिळाली तर जास्त संयुक्तिक होईल म्हणून मी आजचा हा विषय निवडला आहे.

विषय आहे " महाराष्ट्र दिशाहीन होतो आहे काय ? " दिशाहीन होतो आहे हे कशावरून ठरवायचं किंवा तो होतो आहे ही आपल्या मनामध्ये जी शंका निर्माण होती आहे ती

तरी कशामुळे ? आपल्या मनामध्ये हा पहिला प्रश्न निर्माण होतो आणि त्याचं उत्तर आहे– एकोणीसशे साठ साली जेव्हा महाराष्ट्र निर्माण झाला– आपल्या सगळ्यांच्या कष्टामधून तेव्हा विधानसभेमध्ये त्या वेळचे महाराष्ट्राचे नेते– स्व. यशवंतरावजी चव्हाण यांनी केलेल्या भाषणाची आठवण झाली म्हणजे हा प्रश्न का निर्माण होतो हे कळेल. अनेक प्रकारचे प्रवाह त्यावेळी निर्माण झाले होते. काही मंडळींना असं वाटत होतं की पश्चिम महाराष्ट्रातील ही जी सामाजिक-शैक्षणिक चळवळीमध्ये पुढे गेलेली मंडळी आहेत ती मंडळी बाकीच्या उर्वरित भागावर कुरघोडी करतील आणि आपलेच काय म्हणणे असेल किंवा महाराष्ट्रामध्ये जो काही मलिदा असेल तो आपल्या पानावर ओढून घेतील आणि जे काही मागासलेले भाग आहेत ते मागासलेलेच राहतील. हे मराठी राज्य न होता मराठा राज्य होईल. अशा अनेक प्रकारच्या शंकाकुशंकांनी त्यावेळी महाराष्ट्राचं मन विचलित झालेलं होतं. या विचलित झालेल्या मनाला यशवंत-रावजींनी निश्चित स्वरूपाचं आश्वासन दिलेलं होतं की, हे मराठी राज्य होईल आणि जी आपली धाकटो भावंडे आहेत, काही ऐतिहासिक कारणांमुळे जे मागासलेले राहिलेले आहेत अशा सगळ्या धाकट्या भावंडांना सशक्त करून आपल्या बरोबर घेऊन सगळा महाराष्ट्र एकजीव, एकसंध असा आपण उभा करणार आहोत. महाराष्ट्र हा शब्द उच्चारल्याबरोबर आपल्या अंगावर रोमांच उभे राहतात. या प्रांताचा हिंदुस्थानच्या जडणघडणीमध्ये काही महत्वपूर्ण असा वाटा आहे. आणि तो महत्वपूर्ण वाटा आपण आतापर्यंत मोठ्या अभिमानाने

सांगत आलेलो आहोत. ' महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले ! महाराष्ट्राविना राष्ट्रगाडा न चाले ।।' अशी आपली सगळ्यांची मनोमन धारणा आहेच, परंतु आज आपण आत्मनिरीक्षण केलं पाहिजे. आजच्या प्राप्त परिस्थितीमध्ये आपण असं म्हणू शकतो का ? काल आपण म्हणत होतो सर्वंकष असं हे आपलं विधान होतं. परंतु गेल्या पाच-सहा वर्षांमध्ये हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागामध्ये विकासाच्या ज्या प्रक्रिया सुरू झालेल्या आहेत त्या प्रक्रिया गेल्या दहा वर्षांत, किंवा आपण पाच वर्षांचा काळ घेऊ या–मी चर्चेला थोडासाच काळ घेतो–त्याचं कारण असं की आपण मोठा कालखंड चर्चेला घेतला तर तासा-दीड तासामध्ये आपल्या विषयाचं प्रतिपादन करणं मोठं अवघड होऊन बसतं आणि मग धरसोड होते म्हणून अलिकडचाच काळ मी घेतो. कारण अलिकडे गेल्या पाच सहा वर्षात आपण सगळ्यांनी चिंताक्रांत व्हावे अशा प्रकारची परिस्थिती महाराष्ट्रामध्ये निर्माण झालेली आहे.

मी आपल्याला सांगितलं की यशवंतरावजींनी काय अभिवचन दिलं होतं " की हा प्रांत एकजीव, एकसंध असा उभा राहील आणि इतिहासकाळामध्ये या देशातल्या नेतृत्वाच्या संदर्भामध्ये जी एक ऐतिहासिक अशी महत्वपूर्ण भूमिका महाराष्ट्राने वटविलेली आहे ती पुढे चालू राहील. हे जे अग्रेसरत्व आहे ते कायम टिकवले जाईल आणि महाराष्ट्रामध्ये प्रत्येक क्षेत्रात पुरुषार्थाला वाव राहील– नव्हे, त्याचीच पूजा बांधली जाईल. " आपण एकोणीसशे साठ सालापासून एकोणीसशे पंच्याऐंशी-शहाऐंशी सालापर्यंत जर प्रवास केला तर हे जे

अभिवचन दिलेलं होतं ते परिपूर्ण साकारलं आहे असं आपल्याला म्हणता येईल का ? दुर्दैवाने महाराष्ट्राचं मुख्यमंत्रीपद यशवंतरावजींना फार दिवस चालविता आलं नाही. देशाची काही निराळी मागणी होती आणि अडीच वर्षामध्ये ते देशाची सेवा करण्यासाठी दिल्लीला गेले, परंतु उद्या घडला जाणारा महाराष्ट्राचा पाया भक्कम विचारांच्या अधिष्ठानावर त्यांनी उभा केलेला होता. आणि ते अधिष्ठान त्यांनी तुम्हाला आणि मला दिलेल होतं पुढची इमारत पूर्ण करण्यासाठी. ती इमारत उभी राहिली आहे की नाही, हे पाहण्याचं काम तुमचं माझं आहे. आणि त्यात जर काही चुका झाल्या असतील, उणीवा राहिल्या असतील किंवा काळाचा वेध घेऊन आपला जो महाराष्ट्र उभा करायचा आहे, तो उभा राहिला नसेल तर मग अशा प्रकारचा प्रश्न आपण चर्चेला घेणं आवश्यक आहे. मला काही मंडळी म्हणाली की, तुम्ही कन्हाडला जाताय पण या विषयावर फारसं भडक बोलू नका; हा भडक बोलण्याचा प्रश्न नाही. हा आत्मनिरीक्षण करण्याचा प्रश्न आहे. काही विषयाच्या संदर्भात तुलनात्मक आकडे देऊन मी आपल्यासमोर तो मांडणार आहे.

आपण प्रगत, समृद्ध अशा प्रांताची जी एक संकल्पना आपल्या मनामध्ये वाळगतो ती काय आहे ? ती अशी आहे की प्रांत किंवा देश– आपण प्रांताचा विचार करतो– याच्या लोकसंख्येला आपापल्या कर्तबगारीनुसार देशाच्या किंवा प्रांताच्या जडण-घडणीमध्ये आपला वाटा उचलता यावा अशा प्रकारची परिस्थिती त्या प्रांतात, त्या प्रांताच्या समाजामध्ये असली पाहिजे. काम करणे हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि जर

तो नाकारला गेला तर माझ्या जीवनामध्ये काही अर्थ उरत नाही. तेव्हा तो नाकारण्याची परिस्थिती ज्या समाजव्यवस्थेमध्ये निर्माण झाली असेल ती समाजव्यवस्था निश्चितपणे कुजल्याशिवाय रहात नाही किंवा मोडकळीत निघाल्याशिवाय राहात नाही. अशा प्रकारची जर सामाजिक परिस्थिती आपली असेल तर आपला प्रांत अग्रेसर आहे किंवा एकोणीसशे साठ साली एका नव्या प्रांताची मराठी मनाच्या अनेक आशा-आकांक्षांची अभिव्यक्ती इथं होईल, आविष्कृती पाहायला मिळेल असं वाटत होतं ते जर आज वाटत नसेल तर हा प्रश्न चर्चेला घेणं अत्यंत आवश्यक आहे. माझ्यासारख्या माणसाला तसं वाटत नाही म्हणून मी आज मुद्दाम तुम्हा कराडकरांची सेवा करण्यासाठी हा विषय तुमच्यासमोर मांडतो आहे.

अपेक्षा पहिली अशी होती, किंवा प्रगत प्रांताची संकल्पना आपल्या मनामध्ये ती अशी असते की प्रायमरी सेक्टरमध्ये म्हणजे शेतीच्या क्षेत्रामध्ये उत्कर्ष झाला पाहिजे, विकास झाला पाहिजे, कमीत कमी माणूसबळ देऊन जास्तीतजास्त उत्पादन काढण्याची आपल्याला तांत्रिक शक्ती या क्षेत्रामध्ये मिळाली पाहिजे आणि जेवढी काही साधनसामुग्री आपल्याकडे उपलब्ध आहे तिचा अत्यंत काटेकोरपणे उपयोग करून घेऊन आपली उत्पादन क्षमता मोठ्या प्रमाणांत वाढली पाहिजे, जेणे करून लोकांच्या गरजा भागून जास्तीचं उत्पन्न दुसऱ्याच्या गरजा भागविण्यासाठी आपण निर्माण करू शकतो. किंवा आपल्या गरजेपेक्षा आपल्या कृषिमधून जास्तीच उत्पादन काढता आलं तर जास्तीच्या झालेल्या उत्पादनावर प्रक्रिया करणारी कारखानदारी आपल्याला

उभी करता आली पाहिजे. आणि शेतीच्या क्षेत्रामध्ये वळविता आली पाहिजे. जेणे करून आपल्याला शेतीच अद्ययावत तांत्रिकीकरण करता येईल. महाराष्ट्राच्या संदर्भात मी याचा विचार आपल्यापुढे ठेवणार आहे. आपण कृषीला प्रायमरी सेक्टर आणि उद्योगधंद्याला सेकंडरी सेक्टर म्हणतो. प्रायमरी सेक्टरवरची जास्तीची लोकसंख्या सेकंडरी सेक्टरकडे वळविणे व सामावून घेणे याला आपण गतिशील विकासाचे लक्षण म्हणतो.

आता आपल्याला माहिती आहे की पाश्चिमात्य देशात अठराव्या किंवा एकोणीसाव्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये या औद्योगिकरणाला सुरवात झाली. तो समाज आज औद्योगिक समाज म्हणून जगतो आहे आणि तो समाज कृषक म्हणून जगत नाही. तो औद्योगिक समाज म्हणून जगतो आहे. आणि त्याच्या-नंतर आपण आज ज्याला पांढरपेशी म्हणू, प्रगत म्हणू असं सेक्टर म्हणजे टर्शरी म्हणजे एका समाज घटकातील ही माणसं प्रायमरी सेक्टर, सेकंडरी सेक्टर आणि टर्शरी सेक्टर या तिन्ही सेक्टरमध्ये सगळी सामावून घेता आली पाहिजेत. आपापल्या वकुवाचा, शक्तीचा, बुद्धीचा कुठल्यातरी क्षेत्रात उपयोग करून घेण्याची संधी या समाजातल्या व्यक्तीला मिळाली पाहिजे. त्यात कुणी बेकार राहाता कामा नये. बेकार राहील अशी परिस्थिती समाजामध्ये निर्माण होऊ देताच कामा नये. आणि ही आहे प्रगत समाजाची संकल्पना.

आता आपण या तीन कसोट्यात हिंदुस्थानच्या संदर्भा-मध्ये चर्चा करीत नाही तर महाराष्ट्राच्या संदर्भामध्ये चर्चा

करीत आहोत, महाराष्ट्र पुन्हा बलाढ्य व्हावा, महाराष्ट्र विद्यमान व्हावा. महाराष्ट्र पुन्हा देशाला आदर्शवत रहावा आणि अशी यशवंतरावजींची कल्पना होती. मग या तिन्ही क्षेत्रांमध्ये महाराष्ट्राचा अग्रक्रम जर कायम राहिला असेल तर महाराष्ट्र निश्चितपणे अजूनही देशातला अग्रेसर प्रांत ठरल्याशिवाय राहणार नाही. आम्ही अजून कालच्या गप्पा मारतो आहोत. काल होतो आम्हो प्रत्येक क्षेत्रात पुढे. शैक्षणिक क्षेत्रात होतो, सामाजिक क्षेत्रात होतो, राजकीय नेतृत्व महाराष्ट्रानेच हिंदुस्थानाला दिल. आज या तिन्ही क्षेत्रामध्ये आपण कुठे आहोत याचा विचार आपल्याला केला पाहिजे. पहिल्यांदा आपण जरा शेतीच्या क्षेत्राकडे वळूया.

महाराष्ट्रामध्ये एकूण तीनशे आठ लक्ष हेक्टर जमीन आहे. पैकी लागवडीखाली दोनशे एक लक्ष हेक्टर जमीन आहे. या लागवडीलायक जमिनीची एकोणीसशे पंच्याहत्तर शहात्तर यावर्षी सुखठणकर कमिटीने जी पाहणी केली होती तेव्हा त्या कमिटीच्या असे निदर्शनास आले होते की एकूण सत्याऐंशी तालुके हे दुष्काळग्रस्त आहेत किंवा अवर्षण प्रवण आहेत. जिथं सातत्याने दुष्काळ पडतो आहे. पाण्याची उपलब्धता नाही, कोरडवाहू शेती आहे आणि ती किफायतशीर नाही. तिच्यावर जीवन जगणं हे अशक्य आहे आता पुन्हा एकोणीसशे पंच्याऐंशी-शहाऐंशीला एक नवी समिती बसली आहे. त्या समितीचा मी सदस्य आहे. आणि परवा सहा आणि सात तारखेला आम्ही आमचा अहवाल पूर्ण करतो आहोत. अहवाल आमचा पूर्ण व्हायचा आहे, शासनाला सादर करायचा आहे.

त्यामुळे त्याच्यातील गुप्तता आज मला सांगता येणार नाही. पण एक अभ्यासक म्हणून आपल्याला एवढं जरूर सांगतो की गेल्या दहा वर्षांमध्ये हा जो आवर्षण-प्रवण भूमीचा प्रश्न होता तो आणखीन विकट झालेला आहे आणि त्याचं क्षेत्र वाढलेलं आहे, म्हणजेच महाराष्ट्रात बिनभरवशाच्या कोरडवाहू शेतीचं क्षेत्र वाढतं आहे.

शेतीच्या क्षेत्रावर महाराष्ट्रातील जवळजवळ नव्वद टक्के लोकसंख्या अवलंबून आहे. आणि या शेतीचं आधुनिकीकरण ज्या गतीने व्हावयास पाहिजे होतं ते झालेलं दिसत नाही. काही विभाग अपवाद म्हणून सोडले तर मी जे म्हणतो आहे ते खरं आहे. वाढती लोकसंख्या, ही अशी बिनभरवशाची कोरडवाहू शेती वाटून घेऊन जणू काय दारिद्र्याच्याच वाटपात मग्न आहे म्हणूनच तिचं जीवनमान हे उंचावण्याऐवजी खालावत चाललेलं आहे. दुष्काळ आम्ही परिणामकारक उपाय योजना करून रोखू शकलेलो नाही. वसंतदादांसारखी या मातीशी नात लावून बसलेली माणसं महाराष्ट्राचं वाळवंट होत आहे म्हणून सचिंत आहेत.

निसर्गाच्या हे संकट आपल्याला दूर करणं अवघड आहे, अशक्य आहे असं काही नाही. आपण असे नशिबवान आहोत, भाग्यवान आहोत की निसर्गाने आपल्याला तिन्ही ऋतु दिलेले आहेत आणि थोडा फार पाऊस पडला तर दगड टाकला तर तो उगवून येईल अशी सुपीक भूमी विधात्याने महाराष्ट्राला दिलेली आहे. या संदर्भात अभ्यास करण्यासाठी मी ज्यावेळी

प्रथम इस्रायलला गेलो तेव्हा तेथील सिंचन पद्धती आणि शेती पाहून मी थक्क झालो. इस्रायलला नऊ महिने उन्हाळा आणि तीन महिने हिवाळा असतो. पावसाळा असत नाही. हिवाळ्यामध्ये आपल्याकडे जसं दंव पडते तशा प्रकारचा पाऊस त्यांच्या नशिबानं पडला तर पडतो. एकूण चार इंच पाऊस आहे आणि उन्हाळ्यामध्ये चाळीस डिग्री तपमान असते. आपल्या कन्हाड-करांना चाळीस डिग्री तपमान माहिती नाही. आम्हा औरंगाबाद-करांना व नागपूरकरांना ते माहिती आहे. खाली वाळू आहे वर चाळीस डिग्रीचा सूर्य तळपतो आहे. पाट– पाणी देण्याच्या पद्धतीने जी आपली चगळ चाललेली आहे. अशी चंगळ त्यांना करता येत नाही. जिथं चार इंच– सुद्धा पाऊस पडत नाही तो देश आज जगामध्ये शेतीच्या संदर्भात नेता ठरलेला आहे. ' इस्रायल इज् द् लीडर ऑफ् ॲग्रीकल्चरल कन्ट्रीज ' कृषि-प्रधान देशांचा इस्रायल नेता आहे. इस्रायलमध्ये वाळू आहे, पाऊस पडत नाही, सूर्य तापतो, माणूससुद्धा काळवंडून जावा असा सूर्य तापतो. मग तिथं लहानसहान झुडपंसुद्धा कशी तग धरत असतील ? केवळ तग धरत नाहीत तर आपल्यापेक्षा दहापट मोठी व शक्तिमान असतात. अर्धा किलोचा टोमॅटो आहे, एक क्विंटलचा केळीचा घड आहे, चाळीस किलोचं कलिंगड आहे, अडिचशे ग्रॅमची मिरची आहे आणि पंचेचाळीस लिटरखाली जर गाईनं दूध दिलं तर दुसऱ्या दिवशी ती शिजवली जाते. आणि आपल्याकडे पंचेचाळीस लिटर गाय दूध देत असली तर तिला पहिलं बक्षिस दिलं जात. एवढं तपमान त्या गाईला सोसणं शक्य नाही. तेव्हा एअरकंडिशन्स तबेले बांधले जातात,

एवढ्या तपमानात गुलाबाची फुले येऊ शकत नाहीत. ग्रीन हाऊसेस केली जातात आणि ठिबक पद्धतीने व फवारणी पद्धतीने– तुषार पद्धतीने पाणी दिलं जातं. आणि विशेष म्हणजे आपल्यापेक्षा अडीचपट जास्तीच उत्पादन एकरी काढलं जातं. आम्ही कोणीही बहात्तर क्विंटल हेक्टरी कापसाचं उत्पादन फलटणला काढू शकत नाही, मंगळवेढ्यालाही काढू शकत नाही, आणि परभणीच्या ब्लॉक कॉटन सॉईलमध्येही काढू शकत नाही. हे जर इस्रायल करू शकतो, इस्रायल कशाला आता आपण महाराष्ट्राच्या संदर्भात बोलतो आहोत, आपल्या भोवतालची राज्ये करायला लागली आहेत. कर्नाटक करतो आहे, आंध्र करतो आहे, केरळ करतो आहे मग आम्ही वाळवंट होऊ अशी नुसती भीती व्यक्त करण्यामध्ये काही अर्थ नाही. तर मुळातच वाळवंट असलेल्या राजस्थानने जमीन संपादून झाडे लावण्याचा जो प्रयोग सुरू केला आहे त्याचा विचार केला पाहिजे. परंतु या संदर्भात कितीसे प्रयत्न होताहेत ? आमचे दर हेक्टरी उत्पादनसुद्धा इतर राज्याच्या मानाने फार कमी आहे.

आम्ही मोठ्या अभिमानाने सांगतो की हिंदुस्थानच्या सातव्या पंचवार्षिक योजनेत महाराष्ट्राचा वाटा हा सगळ्यात मोठा आहे. खरं आहे, तो आहे साडेबारा टक्के, आपल्या पेक्षा लोकसंख्येने दुप्पट असलेल्या उत्तर प्रदेशाचा वाटा सुद्धा साडेबारा टक्केच आहे. आपल्या इतकीच लोकसंख्या असलेला आंध्रप्रदेश याचा वाटा मात्र साडेसात टक्के आहे. पण देशाच्या नियोजनामध्ये साडेबारा टक्के वाटा मागणाऱ्या महाराष्ट्राचं उत्पादनाचं स्थान काय आहे? आपली सातवी

योजना उत्तरप्रदेशाएवढी आहे. उत्तरप्रदेशाचं क्षेत्रफळ आपल्या पेक्षा तिप्पट आहे, लोकसंख्या दुप्पट आहे. देशाच्या साधन–सामुग्रीमधील मोठा वाटा आम्ही आमच्या हुषारीने आणतो. आपण कौतुक जरूर केलं पाहिजे, परंतु देशाच्या साधन सामुग्रीचा हा वाटा आम्ही अत्यंत काटकसरीने वापरतो आहोत की नाही आणि देशाच्या उत्पन्नामध्ये आम्ही लक्षणीय वाढ करतो आहोत की नाही हे पाहिले पाहिजे आणि देशाच्या उत्पन्नामध्ये जर आमचा पहिला नंबर नसेल, नुसता पैसे ओढण्यामध्ये आमचा पहिला नंबर असेल, तर मला असं वाटतं की देशाच्या पातळीवर हा एक गुन्हा आहे. इतर गोष्टींचा फारसा विचार न करता केवळ मी सांगणार आहे आपल्याला कोर सेक्टर ज्याला आपण म्हणतो ॲग्रोकल्चरल इरिगेशन, इंडस्ट्रीज उत्पादन देणारी खाती आहेत. उत्पादन मिळालेली खर्च करणारी खाती आपण सोडून देऊ.

कोर सेक्टर आपण प्रामुख्याने विचारात घेऊन फार दूरवर सखोल इतका विचार आपल्याला करता येणार नाही म्हणून तीन-चार मुद्यांकडेच आपले लक्ष मी वेधू इच्छितो. विशेषतः प्रगत राज्यांची महाराष्ट्राबरोबर तुलना केली तर आपलं दर हेक्टरी शेतीचं उत्पादन खालून दुसऱ्या किंवा तिसऱ्या नंबरवर येतं. काही बाबतीत तर हा नंबर १७ वर जातो. एकूण शेतीच्या उत्पादनात महाराष्ट्राचा वाटा हिंदुस्थानच्या पातळीवर सातव्या नंबरवर लागतो. नियोजनात नंबर एक मी घ्यायचा, परंतु शेतीचं उत्पादन दर हेक्टरी आसामपेक्षा कमी, पंजाब-हरियाणापेक्षा कमी. पंजाब-हरियाणा

पेक्षा कमी आहे हे एक समजू शकू. पण कालपर्यंत आमच्या तुलनेत कुठेही नसणारा कर्नाटक आणि याचा वाटा आता आमच्यापेक्षा जास्तीचा झालेला आहे. विशेषतः गेल्या पांच-सात वर्षापासून या मंडळींनी प्रादेशिक अस्मितेच्या पोटी का होईना परंतु आपापल्या प्रांतामध्ये आपल्याला गाडून घेण्याची संवय लावलेली आहे. प्रादेशिक अस्मितेपोटी असेल किंवा आणखी कशाच्या पोटी असेल पण विशेषतः एकोणीसशे ऐंशी-एक्याऐंशी सालापासून या प्रांतात निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये जी प्रगती चाललेली आहे ती नेत्रदीपक आहे, कौतुक करण्यासारखी आहे. आणि गेल्या एकोणीसशे ऐंशी- एक्याऐंशी पासून आम्ही मंडळी या प्रत्येक क्षेत्रामध्ये किती पीछेहाट केलेली आहे याचेही आकडे मी आपल्यासमोर मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. तेव्हा शेतीच्या संदर्भात दर हेक्टरी उत्पन्न आमचं कमी, देशाची एकूण (टोटल प्रॉडक्टिव्हिटी) आपण ज्याला म्हणतो त्या प्रॉडक्टिव्हिटीमध्ये सुद्धा आमचा वाटा पार खालचा. उत्पादनाचा दर हेक्टरी राज्यनिहाय तक्ता पाहिला तर तांदळाच्या उत्पादनात तो महाराष्ट्राचा पांचवा नंबर लागतो तर गव्हाच्या बाबतीत तो सर्वांपेक्षा कमी आहे. कापसाच्या उत्पादनाच्या बाबतीतही महाराष्ट्राचा नंबर हा सातव्या क्रमांकावर आहे. भुईमुगाच्या बाबतीतसुद्धा- बागाईत भुईमुगात- तिसरा तर कोरडवाहूमध्य सगळ्यात शेवटचा यावरून वर जे प्रतिपादन केले आहे ते स्पष्ट होईल. शेतीच्या उत्पादनाच्या संदर्भातसुद्धा महाराष्ट्र मागेच पडत चाललेला आहे. हे दिशाहीन नियोजनाचेच फळ नाही काय?

यशवंतरावजींनी महाराष्ट्राची धुरा हाती घेतली तेव्हा वर्वे यांच्या अध्यक्षतेखाली एक सिंचन आयोग नेमलेला होता. महाराष्ट्रामध्ये किती पाणी आहे, सरप्लस वॉटर भूपृष्ठावर किती पाणी आहे आणि भूजल, जमिनीच्या पोटात किती पाणी आहे. ग्राऊंड वॉटर किती आहे, हे पाणी आम्हाला किती काळ वापरता येईल जेणेकरून जास्तीत जास्त जमिन आम्हाला ओलीताखाली आणता येईल. त्यानी अहवाल दिला की बारे देण्याच्या पद्धतीने पाटपाण्याच्या पद्धतीने हे पाणी वापरलं तर सामान्यतः एक्काहत्तर लाख हेक्टर जमिनीला पुरेल एवढं हे पाणी आहे. आणि हे पाणी आपल्याला द्रुतगतीने महाराष्ट्राची प्रगती करावयाची असेल तर आपल्याला एकोणीसशे ऐंशी सालापर्यंत सगळं वापरलं पाहिजे अडविलं पाहिजे. इरिगेशनसाठी तुम्हाला जी साधन सामुग्री मिळाली होती तिचा उपयोग एकोणीसशे ऐंशी सालाच्या आंत सगळं पाणी अडविण्यासाठी करायचा होता. आयोगाने हा विचार करूनच ही कालमर्यादा नक्की केलेली होती. पहिली पंचवार्षिक योजना, दुसरी पंचवार्षिक योजना, तिसरी आणि चौथी पंचवार्षिक योजना, पांचवी-सहावी-सातवी आणखीन पुढे असतील. या सगळ्या पंचवार्षिक योजनामध्ये महाराष्ट्राचा काही एक लोकसंख्येच्या प्रमाणात वाटा आहे. हा साधारणतः किती असेल, यापैकी किती भाग आपल्याला शेतीसाठी खर्च करता येईल. याचा विचार करूनच त्यांनी गणित मांडलेलं आहे. त्यानी काही ढोबळ मानानं केलेलं नाही. विचार करून केलेलं आहे. पण आपल्याकडून हे होऊच शकलं नाही, आता आपण केवळ चोवीस लाख हेक्टर जमीन पाण्याखाली आणू शकलेलो आहोत. म्हणजे त्यांच्या गणितानुसार एक्काहत्तर लाख हेक्टर जमिन एकोणीसशे

ऐंशी साली पाण्याखाली यावयास पाहिजे होती. ती एकोणीसशे शहाऐंशी सालाच्या अखेरपर्यंत आपण चोवीस लाखाच्या पलिकडे जाऊ शकलो नाही. जाता आले नाही किमान बारा-तेरा टक्यापर्यंत आपली इरिगेशन्स झालेली आहेत. हे सगळं इरिगेशन पारंपारिक पद्धतीने चाललेले आहे. म्हणजे जिथं पाणी आहे तिथं ते वाया घालविलं जातं किंवा जिथं पाणी आहे तिथं जमीन चिबडविण्याचे उपद्व्याप चालू आहेत आणि जिथे नाही ते उपाशी मरताहेत. इतर राज्यांनी मात्र ही सिंचनाची क्षमता गेल्या काही वर्षात महाराष्ट्रापेक्षा पुष्कळच जास्तीची निर्माण केलेली आहे.

आता जमीन चिबडविण्याच्या संदर्भात सांगतो (उजनी प्रकल्प) व जायकवाडीचे पाणी वाया जात आहे. ते वापरले जात नाही. पैठणखालची आणि मंगळवेढ्याकडील मंडळी हे पाणी घेत नाहीत. का घेत नाहीत याच्यासाठी जरा विचार करू. जायकवाडीचा खालचा जो भाग आहे अगदी अंबडपासून-पैठणपासून सुरू होणारा तो नांदेडपर्यंतचा दोनशे पन्नास किलो-मिटरचा हा सगळा काळपोटी आहे. ज्याला आपण ब्लॅक कॉटन सॉईल म्हणतो असा आहे आणि या जमिनीला दोन किंवा तीन पाणी दिली की ही जमीन चिबडते– सलाईन होते. मग जमिन चिबडविण्याचा उद्योग करायचा का ? हे पाणी घेण्याचं पाप आपण करू नये, अडचणीत येऊ नये या भीतीच्या पोटी मंगळ-वेढ्याचे लोकसुद्धा पाणी घेत नाहीत. कारण निम्मी काळपोटी जमीन आहे. मग पाणी देण्याच्या या पद्धतीने या मंडळींना पाणी जर घेता येत नसेल तर याला काही पर्यायी योजना

आपल्याजवळ आहे की नाही ? की भरपूर पाणी आहे म्हणून ते उजनीच्या जलाशयात वा जायकवाडीच्या महासागरात साठवून ठेवायचे आहे की, पूजा वांधायची आहे त्याची.

मी आपल्याला इस्रायलचं पुन्हा उदाहरण देतो. इस्रायल-मध्ये मी आपल्याला सांगितलं की पाऊस पडत नाही, इस्रायलच्या बॉर्डरवरून वाहणारी जी जॉर्डन नदी आहे. साडे चारशे मिटरखाली देशाच्या. या नदीचा एक नैसर्गिक असा तलाव आहे. 'सी ऑफ गॅलिलिओ' असं त्याचं नाव आहे नैसर्गिक आहे. त्याला मग थोडीशी डागडुजी करून ते पाणी वाढविलं आणि मोठ्या प्रमाणावर मध्ये जलाशय निर्माण केला आहे. आपल्याला ही गोष्ट पुन्हा एवढ्यासाठी सांगतो आहे की पुरुषार्थ कशाला म्हणतात ? महाराष्ट्र दिशाहीन होतो आहे काय ? अशा प्रकारचा प्रश्न तुमच्यासमोर आहे, माझ्या समोर आहे. ही गोष्ट नक्की असते की असलेल्या साधन सामुग्रीचा अत्यंत काटेकोरपणे उपयोग करून जास्तीत जास्त उत्पादन काढण्याचा पुरुषार्थ त्या समाजा-मध्ये आहे की नाही, आणि नसेल तर निश्चितपणे तो त्याला दिशाहीन बनवत चाललेला आहे -असं माझं म्हणणं आहे. इस्रायलची आणि जॉर्डनची चारशे पन्नास मीटर लांबीची बॉर्डर आहे. जॉर्डनने जर त्या पाण्यामध्ये विष टाकलं तर सगळा इस्रायल तडफडून मरेल. नुसतीच शेती नाही तर त्याला प्यायलासुद्धा पाणी मिळायचं नाही. एक इंच सुद्धा जॉर्डनचं विमान त्या जलाशयाकडे येणार नाही एवढा कडेकोट बंदोबस्त इस्रायलने केलेला आहे. आणि पाणी चारशे मिटर वर नेऊन पाईप लाईन संपूर्ण देशामध्ये पसरवून तुषार आणि ठिबक पद्धतीने

त्यांनी सगळ्या देशाच उत्पादन वाढविलं आहे. मग गेल्या वीस पंचवीस वर्षापासून इस्रायलसारखं राष्ट्र हे काम करून मोठ्या प्रमाणात उत्पादन काढत आहे. मग आम्हा मंडळींना अशी काय काळझोप लागलेली आहे की ही टेक्नॉलॉजी इथं वापरून असलेल्या जलाचा जास्तीतजास्त उपयोग करून उत्पादन वाढवायचं नाही ? ती मंडळी करू शकतात, आम्ही का करू शकत नाही. ते पुरुष आणि आम्ही कोण आहोत. तेव्हा आपले जे प्लॅनर्स आहेत–नियोजनकार आहेत, या नियोजनकाराला इस्रायल का बंद आहे. डोळे झाकून बसलेलो आहोत आम्ही. अहो जर्मनीमध्ये चाललेलं आहे, इटालीमध्ये चाललेलं आहे. आणि आता जर्मनी, इटाली आणि इस्रायलची जी नवीन टेक्नॉलॉजी झालेली आहे. ते जास्तीचा पैसा देऊन सगळे इंजिनिअर आता अमेरिकेमध्ये जाऊन सगळी इरिगेशन सिस्टिम आता स्पीक्लर ड्रीप, मिनीस्पीक्लर, मायक्रोस्पीक्लर आणि कॉंप्युटरवर आलेली आहे. आज इस्रायलचा शेतकरी शेतावर काम करीत नाही. एक उन्नत समाज आपल्याला निर्माण करावयाचा आहे. म्हणून मी आपल्याला सांगतो आहे. आणि मग लोक थोडेसे थट्टेनेही बोलतात-अहो ते इस्रायल-मध्ये आहे. ते इथं काय होणार आहे. असे इस्रायलमध्ये काहीच नाही. कोणतेच ऋतू असत नाहीत. तिथं ती माणसे करतात आणि तुम्हाला सगळं व्यवस्थित करून दिल असताना तुम्ही काहीच करू शकत नाही. तिथं कॉंप्युटरवर शेती चालते. शेतीवर कोणी काम करीत नाही. सगळ्यात धीट माणसे आहेत ती, इस्रायलच्या सगळ्या बॉर्डरवर शत्रू आहेत. इजिप्त शत्रू

आहे. पॅलेस्टिनी मंडळी अधून-मधून त्रास देत आहेत. तुमच्या आमच्या देशामध्ये अतिरेकी जे उपद्रव करतात अशी मंडळी आहेत. तेव्हा शेतावर जाऊन काम करणं धोक्याचं आहे. म्हणून इस्रायली माणूस आता आपल्या घरात बसून आपल्या खोलीतील कॉंप्युटरच्या साहाय्याने उत्तम शेती करतो. आपल्यापेक्षा अडीचपट जास्तीच उत्पादन काढतो. मी असं म्हणतो की कॉंप्युटर पर्यंत तुम्ही गेला नसला तरी ड्रीप आणि स्पीक्लरपर्यंत तुम्ही सहज जाऊ शकता आणि ही कामगिरी तुम्ही केली तर जायकवाडीचं पाणी हे आज लाख-लाख हेक्टरला पुरणारं आहे, पाणी देण्याच्या पाट-पद्धतीने जे पाणी तुम्हाला सात लाख हेक्टरला पुरते तेच पाणी तुषार आणि ठिबक-सिंचन पद्धतीने सतरा-अठरा लाख हेक्टर जमिनीला पुरेल, पण ते आज फक्त तुडुंब भरलेलं आहे. ही नियोजनाची पद्धती-परिस्थिती बदलली पाहिजे असं आपल्याला वाटलं पाहिजे ते वाटत नाही. जायकवाडीचं पाणी शेतकरी घेत नाहीत आणि म्हणून ते जलाशयात तुंबून आहे. शेतीच्या संदर्भात आणखी उत्पादनाच्या संदर्भात आपणास माहिती दिली तशीच लोकसंख्येच्या संदर्भात दिली पाहिजे.

महाराष्ट्राची लोकसंख्या आहे सहा कोटी, या सहा कोटी पैकी वर्किंग पॉप्युलेशन आहे दोन कोटी शहाण्णव लाख, बाकीची मंडळी पंधरा वर्षाच्या खालची आहे ते लक्षात ठेवा. आणि ही मंडळी पांच वर्षांनी तुमच्याकडे काम मागणार आहेत. आणि तुम्ही त्यांना काय काम देणार आहात ? येणाऱ्या लोक-संख्येच्या भवितव्याच्या संदर्भामध्ये तुमच्या समाजामध्ये किंवा

सामाजिक रचनेमध्ये स्थान काय आहे ? या हातांना काम मिळाले नाही तर ते हातात दगड घेणार नाही तर काय लाड घेतील ? आणि तुम्ही तक्रार करता की आताची पोरं सगळी बिघडलीत. कोणी कॉलेजमध्ये बसत नाहीत, टारगटपणा करीत सुटतात आणि कॉलेजच्या शैक्षणिक पद्धतीवर त्यांचा विश्वासच राहिलेला नाही. एम्. एस्सी, पी. एच्डी. होऊन सुद्धा सातशें रुपयांची मास्तरकीसुद्धा मिळत नाही. तर त्या शिक्षण पद्धतीवर त्याचा विश्वास राहणार आहे काय ? तो रहात नाही. कृपा करून असं कोणी समजू नका की प्रत्येक माणसाला काहीतरी वाईट व्हावं असं वाटतं. नाही, प्राण्यालासुद्धा वाईट व्हावं असं वाटत नाही. ते सुद्धा अशी अपेक्षा करतात की आपल्यावर सगळ्यांनी प्रेम करावं, आपण नीट वागावं. मग माणूस तर असा, प्रत्येक माणसाला असं वाटतं की मी समाजामध्ये प्रतिष्ठित असलो पाहिजे, मला चांगलं जगता आलं पाहिजे, मला चांगलं राहता आलं पाहिजे. कोणीही माणूस वाईट नसतो. आणि तरी हे असं कां होऊ लागलेलं आह याचाही आपण विचार केला पाहिजे. मी आपल्यासमोर विषय मांडत होतो तो हा की ही जी लोकसंख्या आहे वर्किंग पॉप्युलेशन दोन कोटी शहाण्णव लाख आहे. या दोन कोटी शहाण्णव लाख लोकसंख्येपैकी जवळ पास एक कोटी चोपन्न लाख लोकसंख्या ही शेतीवर आहे. राहिलेली लोकसंख्या (पहिलं सूत्र आपण लक्षात घ्या की उन्नत समाजाच्या संदर्भामध्ये प्रायमरी सेक्टर, सेकंडरी सेक्टर, टर्सरी सेक्टरची कल्पना तुमच्यापुढे मांडलेली आहे. की जेणे करून तिन्ही सेक्टरमध्ये सगळ्या समाजातल्या मंडळींना आपा–

पल्या बौद्धिक कुवतीप्रमाणे किंवा शारीरिक ताकदीनुसार काम करण्याची संधी उपलब्ध झाली पाहिजे. त्याला ती आदर्श समाज व्यवस्था होईल.) तर ही शेतीवर जीं मंडळी आहेत ती दर सहा वर्षांनी वाढते आहे. कमी होत नाही. सेकंडरी सेक्टरमध्ये आपल्या जुन्या मुंबईचा जर भाग सोडला तर आनंद आहे. एकदा हा भाग झाला आहे, पुण्या-मुंबईचा, ठाणे-पनवेलचा महाराष्ट्राचा भाग सोडला तर सेकंडरी सेक्टरमध्ये उर्वरीत महाराष्ट्राच्या लोकसंख्येपैकी किती लोकसंख्या उद्योगात गुंतलेली आहे. तर ती तीन टक्के आहे, आणि आमच्या मराठवाड्यात एक टक्का, मग बाकीची लोकसंख्या कुठे आहे, प्रायमरी सेक्टरवर म्हणजे शेतीवरच. म्हणजे तुमच्याकडची मंडळी तिकडे कापडाच्या मिलमध्ये काम करण्याला जातात. त्याही कापडाच्या मिल्स उद्ध्वस्त झालेल्या आहेत. सध्या बंदच आहेत. तेही आपल्या घरी आलेले आहेत, कोरडवाहू शेतीवर जगताहेत. परिणाम काय होऊ लागलेला आहे की या शेतीची लोकसंख्या सामावून घेण्याची जी ताकद आहे ती (इरिगेशन ज्या प्रमाणात वाढावयास पाहिजे त्या प्रमाणात वाढत नसल्यामुळे) एकीकडे कमी होत आहे. तर दुसरीकडून पावसाळे कमी होऊ लागल्याने ती उद्ध्वस्त होऊन लोकसंख्या सामावून घेण्याची ताकद आणखी कमी होत आहे. आणि तिसरीकडे वाढलेली लोकसंख्या त्याच जमिनीवर जाऊन बसत असल्यामुळे त्याचे तुकडे होऊ लागलेले आहेत. आता महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात औद्योगिकदृष्टया प्रगत असलेला जेवढा भाग आहे तेवढा वगळता तर एकच उपद्व्याप चाललेला आहे. तो म्हणजे कोरडवाहू शेतीचे तुकडे

पाडून गरिबी वाटून घेण्याचा. मग तुम्हाला आणि मला हा विचार करायला पाहिजे की, ज्या शेतीची एवढी लोकसंख्या सामावून घेण्याची क्षमता नाही त्या शेतीवरून ही माणसं दुसरीकडे उठविली पाहिजेत, त्यांचं औद्योगिकरण केलं पाहिजे. आणि औद्योगिकरणाला तुम्ही जर लेटेस्ट (अद्ययावत तंत्रज्ञान) टेक्नॉलॉजी वापरून औद्योगिकरण केलं तर तुमची त्या उद्योगामधील उत्पादन किंमत कमी होईल. जगाच्या बाजारपेठेमध्ये तुम्हाला स्पर्धा करता येईल. खरं म्हणजे हा विषय तुमच्यासमोर आज मला मांडावयाचा होता. पण मी येईन पुन्हा केव्हातरी तुमची सेवा करण्यासाठी. काय झालं आज महाराष्ट्रात जे औद्योगिकरण झालं. जी काही उद्योगशीलता आज तुमच्या माझ्या महाराष्ट्रामध्ये दिसते आहे ती कोणाच्या जीवावर ? तर जी मंडळी आपला देश सोडून तुमच्याकडे निर्वासित म्हणून आली त्यांचा तीत मोठा वाटा आहे. जी मंडळी हातामध्ये लोटा व खांद्यावर पंचा घेऊन आली महाराष्ट्रामध्ये त्यांचा मोठा वाटा आहे. आणि हा प्रश्न केला की, असं सांगितलं जातं की ती सगळी महाराष्ट्रीय माणसं आहेत. ही लोणी चोपडण्याची भाषा माझी पिढी काही मान्य करणार नाही ! पंधरा वर्षे महाराष्ट्रात राहिली तरी ही महाराष्ट्रीय माणसे आहेत. आमचं नपुसकत्व लपविण्याचा हा प्रयत्न आहे. तुमचं त्याच्यामध्ये काय योगदान आहे? तुमची उद्योगशीलता वाढली ती शेतीला पाणी मिळाल्यामुळे त्याच्यातून जे थोडंसं कृषिओद्योगिकरण उभं राहिलेलं ते. त्यातला एक भाग पश्चिम महाराष्ट्राचा. त्याचीही आता काय अवस्था झालेली आहे हे मी सांगणार आहे. मी आता सध्या त्याच्यात काम करतो

आहे. पी. डी. साहेबांना मी मधाशी सांगत होतो. या क्षेत्राचा बिचार केला तर मी तुम्हाला पहिल्यांदा सांगितलं की कृषिउद्योगाचा हा भाग सोडला तर तीन टक्के लोकसंख्या आणि मराठवाडा विदर्भासारखे मागासलेले प्रांत घेतले, भाग घेतले तर दीड टक्का लोकसंख्या बिगरशेतीच्या व्यवसायावर अवलंबून आहे. आता ही मंडळी कोण आहेत, तर ज्यांनी मॅनपॉवर डेव्हलपमेंटचं काम शिस्तबद्धरीत्या केलं ती ही सगळी मंडळी आहेत. तुम्हाला एक काळ असा होता की टाईपिस्ट मराठा माणूस मिळत नव्हता. तो सुब्रम्हण्यम्–रंगनाथन किंवा वैद्यचलम् अशी माणसं आमच्या ऑफिसमध्ये कड्कट्-कड्कट्- करायला आली. आज हीच माणसं कॉंप्यूटरवर बसताहेत. जी माणसं काल टाईपरायटरवर बसत होती तीच माणसं आज पुन्हा कॉंप्युटरवर बसायला लागली आहेत. तुम्ही कॉंप्युटर म्हटला की लगेच छाती धडधडायला लागते. काय भानगड आहे माहीत नाही. अहो हे तर सोडा, तुमच्या एम्. एस्. ई. बी. मध्ये लागणारे साधे इलेक्ट्रिकल इंजिनिअर कर्नाटकामधून इथे येऊ लागले आहेत. तुमच्याकडे किती मंडळी आली मला माहिती नाही. पण आमच्याकडे खूप आलेली आहेत. म्हणजे आमच्या विद्युतीकरणाला आवश्यक असणारी मॅन पॉवर सुद्धा आम्ही डेव्हलप करण्याची कधीच चिंता बाळगली नाही. आज ठाणे-मुंबई पुणे-पनवेल हा प्रदेश औद्योगिकदृष्टचा प्रगत आहे. त्यात काम करणारी स्थानिक माणसे कोणत्या स्तरावर काम करीत आहेत हे पाहणे मनोरंजक ठरेल. त्यात काम करणाऱ्या लोकांची पाहणी केली'त तर तुम्हाला महाराष्ट्रामधील माणसं ही सेकंडरी सेक्टरमधील

अन्‌स्किल्ड, हेल्पर, सेमिस्किल्ड, स्किल्ड यात स्थानिक माणसे सापडतील. तर हायस्किल्ड पुढे मॅनेजरीयल कॅटेगरी आणि एक्झिक्युटीव्ह कॅटेगरी यामध्ये अर्धाटक्का सुद्धा तुमची माणसं नाहीत. मॅनेजरीयल कॅटेगरीला जी मॅन पॉवर तुम्ही डेव्हलप करायला पाहिजे होती ती मॅन पॉवर डेव्हलप झाली नाही. हातात लोटा आणि खांद्यावर पंचा घेणारा माणूस कोटयाधीश होतो· आणि इथल्या मातीतील पुत्र नुसता लंगोटी लावूनच चाललेला– आणि त्या लंगोटीचा पुन्हा यांना अभिमान ! आम्ही कशी लंगोटी नेसतो. तेव्हा या पहिल्या आणि दुसऱ्या दर्जावर आमची वाणवा आहे. आणि आम्ही सारखी चिंता करतो आहोत की हे असं का होऊ लागलेलं आहे. मॅन पॉवर म्हणजे जे काम तुम्हाला करायला पाहिजे होतं ते काम तुमच्या डायरेक्टर ऑफ टेक्निकल एज्युकेशनने ते केलेलं नाही. ज्या मॅन पॉवर डेव्हलपमेंटच्या संस्था अलीकडच्या काळामध्ये झालेल्या आहेत, मॅनेजमेंटच्या निरनिराळ्या संस्था निघालेल्या आहेत त्या सगळ्या संस्था बाहेरच्या मंडळींनी काढलेल्या आहेत. तिथं प्रवेश मिळण्याची क्षमता, त्याच्यात प्रवेश मिळविण्याची काय पात्रता लागते याच्या संबंधीची माहिती कऱ्हाडच्या पोरांना नसतेच, ते आयसोलेशनमध्यें असतात. आजच्या इन्फर्मेशनच्या जगामध्ये, आयसोलेशनमध्ये काम करणारी माणसं गरीबच राहणार. हे इन्फर्मेशनचं युग आहे, हे युग कॉंप्युटरचं म्हणजे इन्फर्मेशनचं आहे. मला माझं दिल्लीच्या विमानाचं तिकीट ओ-के झालेलं आहे की नाही याची एका सेकंदात इन्फर्मेशन मिळते. मी इथं बसून निकाल घेतो की उद्या दिल्लीला जायचं की नाही. का

उद्या अमेरिकेला जायचं याचा. पूर्वी हे होत नव्हतं, खेटे मारावे लागत असत. मग मला माहिती मिळायची की मला माझं तिकीट ओ-के झालेलं आहे की नाही. तशी परिस्थिती आता राहिलेली नाही. सगळ्याच क्षेत्रात ही इन्फर्मेशन झपाट्याने वाढते आहे, इतकी झपाट्याने वाढते आहे, की आपण चक्रावून जाल. आज त्या इन्फर्मेशनमुळे जग खूप लहान झालेलं आहे. अतिशय लहान झालेलं आहे. जी इन्फर्मेशन सॅटेलाईटच्यामार्फत अमेरिकेतून हिंदूस्थानात एका सेकंदात उतरते. जी इन्फर्मेशन पूर्वी सुरवातीला टेलिफोन लावायला लागायचा व त्यालाही अवधी लागायचा, तो आता टेलिफोन लावायची गरज नाही. सॅटेलाईटच्यामार्फत तुम्हाला कोणतीही माहिती एका सेकदात मिळते. अंतराळातील चित्रे तुम्हाला सॅटेलाईटच्यामार्फत दुसऱ्या क्षणाला मिळतात. तुम्ही सेटींग करून अवकाशातील आपले अंदाज ठरवू शकता, बांधू शकता. आम्ही आयसोलेशनमध्ये काम करतो आहोत. आणि डायरेक्टर ऑफ् टेक्निकल एज्युकेशन अशा प्रकारच्या आयसोलेशनमध्ये काम करत असल्यामूळे या इंडस्ट्रीजला लागणारी कोणती मॅन पॉवर आणि ती कशी निर्माण केली पाहिजे याचं प्लॅनिंग ते करू शकले नाहीत. सेकंडरी सेक्टरमध्ये तुमची लोकसंख्या गेली पाहिजे असं जर तुम्हाला वाटत असेल तर सेकंडरी सेक्टरच्या गरजा काय आहेत आणि गरजांबरोबर हेरून त्याप्रमाणे मॅन पॉवर निर्माण केली पाहिजे होती. ही गोष्ट घडलेली नाही. आणि म्हणून महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावर औद्योगिकरण झालं असलं तरी त्या औद्योगिकरणाचा फार मोठा फायदा या मागासलेल्या

माणसाला– या भूमिपुत्राला मिळत नाही, लाभ मिळत नाहीं. आम्ही मात्र इकडे-तिकडे गप्पा मारून खादीचे पांढरे कपडे अंगावर घालून ओरडत असतो की महाराष्ट्राने देशाच्या पातळीवर मोठी प्रगती केली आहे. पण आज स्थानिक माणूस रोजगार उपलब्ध असूनही बेकार राहतो आहे हे कोणाचं पाप आहे ? ज्याला इन्फर्मेशन मिळत नाही आणि इन्फर्मेशन मिळाली तरी त्या प्रकारचं शिक्षण करण्याची–देण्याची योजना– साधनं एकोणीसशे एक्काहत्तर सालापर्यंत उपलब्ध नव्हती. यात सामान्य विद्यार्थ्यांची काही चूक नाही. यशवंतरावजींनी त्याकाळी महाराष्ट्राचे जे वर्णन केलेलं होतं, ज्या संकल्पना बांधलेल्या होत्या त्या प्रगत महाराष्ट्राचं स्वप्न साकार करण्याची– पूर्ण करण्याची जी साधनसामुग्री, ज्या इंडस्ट्रीज तुम्हाला उभ्या करावयाच्या होत्या त्या गेल्या वीस-पंचवीस वर्षात तुम्हाला महाराष्ट्रात उभ्या करता आल्या नसल्याने हे संकट आता तुमच्या माझ्या पुढे उभे राहिलेलं आहे. आणि आता तुमची आमची पोरं आम्हाला दगडं मारायला लागली आहेत. ही परिस्थिती आपल्या इंडस्ट्रीज सेक्टरमध्ये किती होती. गेल्या वीस-पंचवीस वर्षामध्ये आम्ही एम्. एस्. एफ्. सी. काढली, सिकॉम काढले, एम्. आय्. डी. सी. काढलं, विदर्भ विकास महामंडळ काढलं, कोकण विकास महामंडळ काढलं या सगळ्या ग्रामीण महाराष्ट्राचं औद्योगिकरण किती प्रमाणात केलेलं आहे. नोंदलेल्या या संस्थेसंबधीचीसुद्धा आकडेवारी मी एकदा विधानसभेत दिली होती. एम्. एस्. एफ्. सी. ने जन्माला आल्यापासून कराडमध्ये उद्योग धंद्यावर किती पैसे खर्च केले, आणि मिरा - घोडबंदर - ठाणे-

बेलापूर - पनवेल यांच्यावर किती पैसे खर्च केले. नव्याण्णव टक्के तिकडे आणि एक टक्का आमच्या वाटयाला आला. आणि या संस्था काढल्या कशासाठी यशवंतरावजींनी ? तर ग्रामीण महाराष्ट्राचे गतीने औद्योगिकरण व्हावे म्हणून ! मग कोणी ओरड केली ? सिकॉम ही संस्था त्यांनी ग्रामीण भागात औद्योगिकरण करण्यासाठी काढलेले हे पण ते मुंबईच्या भोवतीच तेथेच खुडबूड करायला लागले. मग महाराष्ट्राच्या ग्रामीण नेतृत्वाने दिशा घेऊन महाराष्ट्राच्या ग्रामीण जनतेच्या औद्योगिकरणाच्या प्रक्रिया चालू केल्या काय ? काळजी घेतलीय का त्याची ? आमच्या आय्. टी. आय् आहेत हे खरं आहे. पण या कराडच्या आय्. टी. आय्. मधून निर्माण झालेल्या मुलाला आताच्या टेक्नॉलॉजीवर आधारित असलेल्या उद्योगधंद्यावर काम मिळणार आहे का ? त्याचा कोण विचार करतो. मग कराडच्या आय्. टी. आय् मधून शिकून तयार झालेला मुलगा बेकार, मुंबईचासुद्धा आय् टी आय्. झालेला मुलगा बेकार आणि पनवेलचासुद्धा बेकार. का ? पेट्रोकेमिकलवर आधारित इंजिनिअरींग त्याला माहिती नाही. ही टेक्नॉलॉजी त्याच्या आय्. टी. आय्. मध्ये शिकविली जात नाही. आमचे सगळे ट्रेड हे बाबा आदमच्या जमान्यापासून चालू आहेत. सगळे आय्. टी. आय्. मधील ट्रेड सिव्हिल, इलेक्ट्रिकल, मेकॅनिकल, कॉर्पेन्ट्री, ब्लॅकस्मिथी. आणि काय ? अरे हे युग कशाचे आहे. गेल्या १५-२० वर्षापासून या आय्. टी. आय्. इमारतीतील ट्रेडस् बदललेले का नाहीत ? मॅन पॉवर डेव्हलपमेंटचं हे काम का झालं नाही. आम्ही गेल्या तीन-चार वर्षापासून यासंबधी

महाराष्ट्रात हाकाटी केली तेव्हा आता टेक्निकल बोर्ड जागं झालं. त्या बोर्डावर काम करण्याची माझेवर जबाबदारी आली. आणि इंजिनिअरींग बोर्डाचे चेअरमन पदाची जवाबदारी माझेवर आली. त्या वेळी मी सांगितलं की टेक्निकल एज्युकेशन या ज्या संस्था आहेत त्याला रिसर्च आणि डेव्हलपमेंटची विंग जोडा. इंडस्ट्रीज मध्ये कोणत्या प्रकारची मॅन पॉवर पाहिजे, इंडस्ट्रीमध्ये कोणती टेक्नॉ-लॉजी आलेली आहे. तिला सोयीस्कर असा ट्रेड आय्, टी. आय्. मध्ये झाला, इंजिनिअरींग कॉलेज मध्ये झाला, तुमच्या आय्. टी. आय्. मध्ये झाला तरच या सर्व मंडळींना काम मिळेल. मी आपल्याला फार काही सांगत नाही परंतु हे अत्यंत हृदयद्रावक असं उदाहरण सांगतो. आणि मला एक नेहमी चिंता आहे हे हरवलेलं आहे. कायमचं हरवलेलं आहे. तुम्ही-मी आता कायमचे दुर्भागी ठरलो आहोत. बॉम्बे हायचा गॅस तुमच्या माझ्या उशाशी मिळाला पण बॉंबे हायचा गॅस तुमच्या माझ्या उशाशी मिळून तुम्हाला मला झोपेत ठेवून कानपूरपर्यंत निघून गेला. आम्हाला पत्ता नाही. या गॅसवर आधारीत जी टेक्नॉलॉजी आहे ती टेक्नॉलॉजी नागोठाण्याला उभी करायची म्हणून आम्ही एकोणीसशे ऐंशी सालापासून ओरडतो आहोत. एकोणीसशे शहात्तरमाली शंकर-रावजी चव्हाण मुख्यमंत्री होते त्या वेळी त्या गॅसचा शोध लागला. अतिशय आनंद झाला. डोळ्यात आनंदाचे अश्रू उभे राहिले की केवढी प्रॉपर्टी, लक्ष्मी आपल्याकडे साक्षात देवाने दिली. आणि लक्ष्मी वापरण्याची बौद्धिक आणि तांत्रिक कुवत माझ्यामध्ये नसल्यामुळे कोट्यावधी रुपयांचा गॅस आम्ही महा-राष्ट्रीय लोकांनी काडी लावून पेटवून दिला – जाळला. का ?

कारण त्याच सेपरेशन करण्याची जी टेक्नॉलॉजी होती त्या क्षेत्रात आम्ही अनभिज्ञ होतो ? हा असोसिएटेड गॅस होता. त्यात असलेले सी-१, सी-२, सी-३, सी-४ आणि सी-५ हे स्वतंत्र आम्ही करू शकत नव्हतो. आज ते झालेले आहे. त्याच्यापैकी चूल पेटवायला काही वापरला जातो, आपल्या अंगावरील कापड विणायला जो धागा लागतो तो धागा निर्माण करण्यासाठी वापरला जातो. अनेक प्रकारचं बाय–प्रॉड्क्शन आहे. मी अशी मागणी केली होती, बॉम्बे हाय गॅसवर आधारित अशी डाऊन स्टीम इंडस्ट्रीजची जेवढी काही उत्पादने आहेत त्या उत्पादनांची टेक्नॉलॉजी समजावून सांगणारी एक प्रयोगशाळा, एक रसायनशाळा आपण उभी केली पाहिजे बॉंबे हायजवळ. हे मान्य झालं, पुढे काय झालं– काही झालं नाही. पंधराशे कोटीची इस्टेट आम्ही तुम्हाला दिली. अरे पण पंधराशे कोटीची इस्टेट वापरण्यासाठी लागणाऱ्या मॅन पॉवरचं काय करता. गॅस, तेल टेक्नॉलॉजी इंडस्ट्रीजमधून उत्पादनं तयार करायची आहेत. त्याच्या संबंधीची निर्मितीची जर मला अक्कल नसेल तर मी काय निर्माण करणार ! महाराष्ट्रामध्ये तुम्ही केमिकल इंजिनिअरींग, गॅस प्रॉडक्टस्, सामुद्रिक उत्पादने वाढवून तुम्हाला महाराष्ट्र पुढे न्यायचा आहे. जे देवाने दिलेलं तेल ते वापरण्यासाठी लागणारी पुंजी तुम्ही कमावणार आहात का नाही. आणि ती कमावली नाही तर तुम्हाला धोका होणारच. मग तुम्ही ओरडणार आहात– कोणाच्या नावाने तुम्ही शंख करणार ? नाही मिळाला तुम्हाला एल्. पी. सी. गॅस. मिळाला तो फक्त मुंबईला. परंतु त्याच्यावर प्रक्रिया करणारा एक कारखाना

सोडला नऊशे कोटीचा आणि ज्याच्यामध्ये एक्झिक्युटीव्ह आणि मॅनेजरीयल कॅटेगरीमध्ये अंशतः ही मराठी माणूस नाही असा एक प्रकल्प मिळाला. तुमच्या मनामध्ये हे प्रश्न निर्माण झाले पाहिजेत, कारण तुमचं कायमचं नुकसान होऊन गेलेलं आहे. हा गॅस पहिल्यांदा जमिनीवरून नवेगावला न्यायचा होता. आणि नवेगावहून हाजिरावाद व तेथून पुढे राजस्थान मार्गे उत्तर भारतात जायचा होता. पण उद्या कदाचित महाराष्ट्राची पोरं जर खवळली आणि त्यांनी गॅस मध्येच तोडला, जास्तीची पाईप टाकलेली तोडली तर काय करायचं. तेव्हा आता हा बॉम्बे हायचा गॅस समुद्राच्यामार्गाने वसईवरून हाजिराला पहिल्यांदा जमिनीवर काढण्यात येणार आहे. म्हणजे मला उद्या सबंध महाराष्ट्राच्या हद्दीतून जाणाऱ्या गॅसच्या पाईपलाईनचे जे काम आहे ते सुद्धा मला करता येणार नाही. आम्ही काही करू शकत नाही. पंधराशे कोटीची योजना आम्ही दोन वर्षांत पूर्ण करू. गेल्या पांच-सात वर्षांपासून हे काम चाललेलं आहे. परंतु अजून काही ठावठिकाणा नाही त्याच्यासाठी लागणारी मॅनपॉवर डेव्हलप करणारी लॅबोरेटरीची अजून इमारत झालेली नाही. मग महाराष्ट्राच्या कार्यकर्त्यांनी त्याच्याकडे बघायला पाहिजे की नाही ? आणि उद्याचं तर हेच सगळं युग येणार आहे, मी तुम्हाला प्लॅस्टिकच्या मगाचं, बादलीचं उदाहरण देतो. हे जर बॉम्बे हायगॅसवर जर निर्माण केलं तर जी बादली तुम्ही आज चाळीस रुपयाला घेता ती बादली तुम्हाला पाच रुपयाला मिळणार आहे, इतकं स्वस्त होणार आहे. जे कापड तुम्ही चाळीस रुपये मीटर घेता ते कापड तुम्हाला चार रुपयाला मिळणार आहे, सिंगापूरला मिळते तसे·

उत्तमोत्तम शर्ट सिंगापूरला सोळा रुपयाला मिळतो. त्यामुळे आमच्या सारखी माणसं प्रवास करायला गेली की वँगेची इच्छा नसली तरी ती घेऊन त्यात कोंबतच असतो. इतकं स्वस्त कापड तुम्हाला मिळणार आहे. तर हे स्वस्त कापड महाराष्ट्रामध्ये होणार नाही, बाहेर होणार आहे. आणि बाहेर होणार आहे म्हणून तिथल्या माणसाला सेकंडरी सेक्टरमध्ये काम मिळण्याची संधी मिळणार आहे. आणि एक प्रचंड अशी सेकंडरी सेक्टरमध्ये काम करण्याची संधी महाराष्ट्रामधली कायमची नाहीशी झालेली आहे. मी आणखी एक उदाहरण आपल्याला देतो. हे पेट्रो-केमिकलचं एक उदाहरण दिलं, आता इलेक्ट्रॉनिक्सचे उदाहरण तुम्हाला द्यायचं आहे.

हरियाणासारखं लंगोटी एवढं राज्य आहे. आणि त्याचं शेतीचं उत्पन्न तुमच्यापेक्षा अडीचपट जास्त आहे. पहिल्यापासूनच आहेच आहे. कारण त्यांना मोठ्या प्रमाणावर पाणी आहे, मोठ्या प्रमाणावर निसर्गाची साथ आहे. हरियाणानेही सगळ्या राज्यामध्ये (मी सेकंडरी सेक्टरची चर्चा आपल्या समोर करतो आहे. आणि सेकंडरी सेक्टर मधील इलेक्ट्रिकल, मेकॅनिकल सिव्हिल या इंजिनिअरींग ब्रँचची चर्चा करीत नाही. कारण ते औटडेटेड झालेले आहेत.) त्याच्यावर इलेक्ट्रॉनिक्सने कुरघोडी केलेली आहे. इलेक्ट्रॉन्सच्या साहाय्याने ती मंडळी काम करायला लागली आहेत. आता मला मशिनवर उभं रहावं लागत नाही. चटकन ॲटोमॅटिकवर मशिन चालायला लागणार इलेक्ट्रॉनिक्सच्या ताकदीवर. आज जपान अमेरिकेच्या बरोबर लढाई करतो आहे. जगाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत एवढसं

चिमुरडं जपानसारखं राष्ट्र, ज्याला जमीन नाही, पाण्यावर तरंगत आहे ते, त्याचा येन जगाच्या प्रचंड वलाढ्य शक्तीच्या डॉलरबरोबर कुस्ती खेळतो आहे. आणि कधी कधी त्याला तो जिंकतो आहे. येनची किंमत वाढती आहे. कशाच्या आधारावर तर टेक्नॉलॉजीच्या डेव्हलपमेंटच्या आधारावर. ही टेक्नॉलॉजीची डेव्हलपमेंट कॉंप्युटरवरून आलेली आहे. इलेक्ट्रॉनिक्सवरून आलेली आहे. इलेक्ट्रॉनिक्सच्या संदर्भात आपल्याला एक विचार सांगितला पाहिजे. कारण आजचं युग इलेक्ट्रॉनिक्सच युग आहे. आता जर्मनी, फ्रॉन्स अमेरिका ही तीन राष्ट्र मिळून स्पेससिटी बांधू लागली आहेत. आज या क्षणाला रिमोट कंट्रोलच्या साहाय्याने नुसतं तुमचं टेलिव्हिजन चालू करता येतो बंद करता येतो असं नाही तर विमान जर अडकलं तर तिथल्यातिथे ते स्टॉप करता येतं. म्हणजे ग्रॅव्हिटीचा जो नियम आहे–गुरुत्वाकर्षणाचा जो नियम आहे तो बाद झाला आहे. इलेक्ट्रॉनिक्सच्या साहाय्याने आता अमेरिकेतील मीसाईल रशियावर जाऊन रशिया जाळू शकतात, तिथले विषारी जंतू जर रशियाने सोडले तर अमेरिका उद्ध्वस्त होऊ शकते. आता या दोघांचं राज्य जगावर चाललेलं आहे ते Star war ग्रह युद्ध करू शकतात. आज रेगनला जर वाटलं उद्या Star war करायचं तर तो करू शकतो. मग जगातील सूत्र आपल्या हातामध्ये ठेवणारी टेक्नॉलॉजी ही जर महाराष्ट्रामध्ये येणार नसेल तर महाराष्ट्र हिंदुस्थानचं नेतृत्व काय करणार आहे. आणि एकवेळ सेनापती बापटांनी म्हटलेलं आहे की ' महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले । महाराष्ट्राविना राष्ट्रगाडा न चाले ।। ' चालविणार आहात का तुम्ही ? अरे हे इलेक्ट्रॉनिक्स तीन वर्षापूर्वी महाराष्ट्रात

आलं. ते शिकवायला शिक्षक नसल्यामुळे औरंगाबादच्या व नांदेडला नवीन निघालेल्या कॉलेजच्या परीक्षाच झाल्या नाहीत. फक्त पुण्याच्या व मुंबईच्या परीक्षा होऊ शकल्या कारण तिथे बाहेरुन शिक्षक आणता आले. आणि आजचं इलेक्ट्रॉनिक्सचं जग या ही संदर्भामध्ये आम्ही मंडळीनी जे नेतृत्व करायला पाहिजे होतं ते हे बुद्धीच्या क्षेत्रामध्ये. आम्हाला फार घमेंड आहे, महाराष्ट्र हिंदुस्थानचा मेंदू आहे. तुम्ही आम्ही काल पर्यंत म्हणत होतो. अभिमान वाळगतो की महाराष्ट्र हिंदुस्थानचा मेंदू आहे. आमच्याशिवाय नाही चालायचा हिंदुस्थानचा गाडा. असे किती लोक या क्षेपणास्त्रामध्ये तुमची कामं करतात. तुमची किती माणसं आहेत. एक भाभा ॲटोमिक रिसर्च न्यूक्लिअर सेंटरमध्ये अभ्यास करणारे सेंटर जवाहरलाल नेहरूंच्या पुण्याईमुळे निघालं. त्या भाभा ॲटोमिक सेंटरमध्ये किती महाराष्ट्रीयन शास्त्रज्ञ आहेत तर बोटावर मोजण्याइतके. अमेरिकेत मी गेलो, सिलीवून व्हॅलीमध्ये गेलो तर भारतातील वीस टक्के इंजिनिअर तिथे आहेत. आम्ही मोठ्या अभिमानाने हे सांगतो को अमेरिकेची इकॉनॉमी ज्यू लोकांनी काबीज केलेली आहे. आणि अमेरिकेची टेक्नॉलॉजी हिंदुस्थानने काबीज केलेली आहे. हीच टेक्नॉलॉजी काबीज करणारे आपले लोक आहेत. त्यातले मराठे, मराठी किती आहेत. आनंद आहे. म्हणतोय काय, मी की सेकंडरी सेक्टर मध्ये तुमची लोकसंख्या वळवायची असेल तर आज सेकंडरी सेक्टर मध्ये उद्योगधंदा काय प्रकारचा आहे त्याची प्रकृती काय आहे आणि त्याच्या प्रकृतीला मानवेल अशा प्रकारची मॅन पॉवर करण्याची व्यवस्था महाराष्ट्र करतो आहे की नाही

हा मुद्दा विचारात घ्या. मग जर हे काम होत नसेल तर आम्ही निश्चित दिशा घेऊन निघालो का ? आज तुम्हाला लागणारे इलेक्ट्रॉनिक इंजिनिअर पाहिजे तेवढे नाहीत. आणि तुम्हाला माहिती आहे की देशाच्या पंतप्रधानांनी महाराष्ट्रावर इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंची निर्मिती फार मोठ्या प्रमाणावर टाकली आहे. आज आम्ही जेमतेम दोनशे कोटींची उत्पादने करतो आहोत. एकोणीसशे नव्वद पर्यंत आम्हाला ती पस्तीसशें कोटीची करावी लागणार आहे. कोणाच्या बळावर हे काम होणार ! तुमच्या माझ्या, जाधव – पवार – भोसले – पाटील – देशपांडे – देसाई – गोखले यांच्या. परंपरेने जी मंडळी उद्योगधंद्यात आहेत त्यांनीच इलेक्ट्रॉनिक्सची इंडस्ट्री काढली आहे. त्यांच्यासाठी उद्योगधंद्याचे धोरणसुद्धा शिथिल झाल आहे. पुन्हा तीच माणसे अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आपलं वर्चस्व कायम ठेवणार आहेत. ही कोंडी फोडण्याच्या दृष्टीने महाराष्ट्राने काही पावले टाकली नाही तर काय आम्ही दिशा घेऊन चाललो असे म्हणता येईल. ही सर्व संपत्ती पुन्हा याच मंडळींच्या हातात. मग आम्ही म्हणायचं मुंबई महाराष्ट्रात आहे पण महाराष्ट्र मुंबईत नाही. उद्याही महाराष्ट्रातील मंडळी तेच म्हणणार, महाराष्ट्राच हे दुःख आहे. आज रायभान जाधवांच्या पिढींचं, उद्या रायभान जाधवांच्या मुलाचं तेच दुःख असणार आहे. या दुःखाचं निराकरण होणार आहे की नाही ? येणाऱ्या काळाचा जो वेग आहे तो घेण्यासाठी बौद्धिक कुवत मानवामध्ये लागते ती बौद्धिक कुवत निर्माण करण्याचा उद्योग तुम्हाला केल्याशिवाय पर्यायच नाही. ते झालेलं नाही. मग तुम्हाला इलेक्ट्रॉनिक्स उद्योग चालवायला

जे इंजिनिअर लागतील, कॉंप्युटर चालवायला जे इंजिनिअर लागतील ती माणसे आहेत काय तुमच्याजवळ ? आज बाहेरची मंडळी व मुली त्या कॉंप्युटर चालवतात, तुमच्याकडे काल त्या टाइपरायटरवर काम करीत होत्या. त्या आज कॉंप्युटर चालवत आहेत. आज तुमच्या मुली अजून घरात आहेत. काय आहे स्त्रियांच्या क्षेत्रामध्ये मॅन पॉवर डेव्हलपमेंटच काम? महाराष्ट्रानं किती केलं ? कौतुक करायचं, सावित्रीबाई फुल्यांच नाव घ्यायच, काय केले. पुढे आणि जर आम्ही खरोखरच काही केले नसेल तर आम्ही कधी अंतर्मुख होणार आहोत की नाही.

सरप्लस पॉप्युलेशन सेकंडरी सेक्टरमध्ये गेली पाहिजे म्हणजे उद्योगधंद्यात गेली पाहिजे आणि पुन्हा ही जास्तीची लोकसंख्या सर्व्हिस इंडस्ट्रीमध्ये गेली पाहिजे त्यासाठी निश्चित स्वरूपाचे माणूसबळ निर्माण करण्याचे धोरण असले पाहिजे. ते आज आहे काय? मला माझ्या शर्टाला इस्त्री करायला वेळ नाही, ते धुवून इस्त्री करणारी सर्व्हिसेस इंडस्ट्रीज तयार झाली पाहिजे. मला माझ्या व्यक्तिगत गरजा अनेक प्रकारच्या आहेत. त्या पूर्ण करायला मला वेळ नाही. त्या गरजा पूर्ण करण्याला सगळी सर्व्हिस इंडस्ट्रीज, सपोर्टींग इंडस्ट्रीज उभारली पाहिजे त्याच्या-मध्ये माणसे गेली पाहिजेत. इंडस्ट्रीज पॉप्युलेशनची ही घडण आहे. आणि म्हणून टर्सरी सेक्टर हे सगळ्यात महत्वाचं समजलं जात. आज अमेरिका टर्सरी सेक्टरवर चालत आहे. अमेरिकेला तुम्ही तिला प्रगत म्हणता की नाही ? या प्रगत अमेरिकेमध्ये प्रायमरी सेक्टरवर शेतीच्या ॲक्टिव्हीटीजच्या कामावर केवळ सहा टक्के लोक आहेत. हिंदुस्थानच्या पेक्षा कितीतरी जास्त

लोकांचे क्षेत्रफळ आहे. त्यामुळे एक माणूस दहा हजार हेक्टर पासून त्रेपन्न हजार हेक्टर पर्यंत जमीन करतो. उत्पादन मेकॅनाइझ नसल्यामुळे, तांत्रिक पद्धतीची शेती मंडळी करीत असल्यामुळे तुमच्या कितीतरी पट जास्त उत्पन्न आहे. हे जास्तीचं इतकं आहे की, जगातल्या सगळ्या भुकेल्या राष्ट्रांना ते पुरवू शकतील. पण ते पुरवत नाहीत. कारण त्यांचे हितसंबंध त्यात गुंतलेले आहेत. आंतरराष्ट्रीय बाजार पेठेमध्ये आपल्या अन्नधान्याचे भाव पडू नयेत याची ते खबरदारी घेतात. यास्तव प्रसंगी अन्नधान्य जाळणे वा खत करणे ते पसंत करतात. सहा टक्के शेतीवर तर जवळपास त्रेचाळीस ते चव्वेचाळीस टक्के लोक इंडस्ट्रीजमध्ये काम करतात. राहिलेले पन्नास टक्के लोक टर्सरी सेक्टरवर काम करतात. आणि टर्सरी सेक्टर आता इन्फर्मेशनवर चाललेले आहे. आता कुणी काहीच करीत नाही. आता हे पुस्तक छापायची गरज नाही हे पुस्तक मी लायब्ररीमध्ये विठ्ठलरावजींच्याकडे ठेवले आणि घरी माझं स्क्रीन सुरू केले की टेलिव्हीजनवर मला ते पुस्तक दिसू शकतं, मी ते वाचू शकतो. आता प्रिंटींग टेक्नॉलॉजी कालबाह्य होऊ घातलेली आहे. आज जगाच्या ज्ञानामध्ये मोठ्या प्रमाणावर भर पडत आहे. जगाची फार मोठी व्यवस्था झाली आहे. त्या ऑडिओ–व्ही. सी. आर् इंडस्ट्रीजमध्ये आम्ही कुठं आहोत ? काय दिशा आहे ? जगाची प्रगती करणेच्या गतीत आज आम्ही कुठं नसलो तरी हिंदुस्थानचं नेतृत्व करू शकतो का ? मी मेल्ट्रॉनच्या संदर्भात सांगू इच्छितो.

हरियाणा हे लंगोटी एवढे राज्य आहे. पण मेल्ट्रानची एक टेक्नॉलॉजी सिटी काढलेली आहे, दिल्लीच्या जवळ

गुरूगावच्या पलिकडे. या टेक्नॉलॉजीच्या पार्कमध्ये (सिटीमध्ये) जगातली सगळी अद्ययावत टेक्नॉलॉजी या मंडळीने मांडलेली आहे आणि सगळ्या हरियाणामधल्या इंजिनिअर्स कॉलेजना, आय्. आय्. टी. ना, पॉलिटेक्निकला इन्स्ट्रक्शन दिलेल्या आहेत को ही नवी डिसीप्लीन आहे यातील ट्रेड सुरू करा. आम्ही तुम्हाला सगळ्या प्रकारचे साहित्य पुरवितो आणि तुमच्याकड ही मॅन पॉवर डेव्हलप झाली तर त्यांना आम्ही उद्योगधंदा चालवायला पैसा देतो, त्यांना आम्ही नोकरीसुद्धा देतो आणि एक मोठे शहर उभे करायचे काम चालू आहे.

विवेकानंद स्वामीचा वेश घेऊन वावरणारा माणूस, तुम्ही आम्ही त्याला रामाचा अवतार म्हणतो. एन्. टी. रामाराव यांनी हैद्रावादला टेक्नॉलॉजीकल पार्ट काढला. ज्या आंध्रला तुम्ही मागासलेले म्हणत होता तो आंध्रसुद्धा टेक्नॉलॉजीच्या संबंधीत तुमच्यापेक्षा पुढे गेलेला आहे. तुमची पेट्रोकेमिकल टेक्नॉलॉजी अजून उभी राहात नाही तर तुमच्या इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजीची आज काय अवस्था आहे. एका पुण्याच्या इंजिनिअरींग कॉलेजमध्ये इलेक्ट्रॉनिक्स संदर्भामध्ये आम्हाला सुविधा उपलब्ध आहेत. बाकीच्या कुठल्याही कॉलेजमध्ये इलेक्ट्रॉनिक्सच्या संदर्भामध्ये आम्हाला सुविधा उपलब्ध होत नाहीत. तर उद्याचा कॉंप्युटर आम्ही चालवावयाचा कसा कराडच्या मंडळींनी. आणि मग कराडच्या मंडळींना कॉंप्युटर चालवायला आला नाही तर कराडातला माणूस येवून सांगेल, माझ्यासारखा माणूस येऊन सांगेल की त्यांनी महाराष्ट्राच्या मोठेपणाची स्वप्नं पाहिली. त्याच्या मातीमध्ये जन्माला येऊन तुम्ही काय नाव

कमावलंत. दोष तुमचा आहे की आणखी कोणाचा आहे, तुमचा आहे आणि म्हणून ही जी नवीन नवीन शास्त्रें येऊ लागली आहेत, त्यात आपल्याला पारंगतता संपादिली पाहिजे. माझं दुःख जसं इलेक्ट्रॉनिक्सच्या आणि पेट्रोकेमिकल्सच्या संदर्भात आहे. तसेच महाराष्ट्राने मोठं नुकसान करून घेतलेलं आहे ते जेनेटिक्सच्या क्षेत्रात. आज जेनेटिक्समध्ये प्रचंड मोठा शोध लागलेला आहे. आता जेनेटिक्स इंजिनिअरींगमध्ये काम करणारी माणसे तुम्हाला भेटायला येऊन सांगतील की मी महात्मा गांधी निर्माण करू शकतो. मी डाकू, गुंड आणि हरामखोर निर्माण करू शकतो. मी उंदराएवढा हत्ती आणि हत्तीएवढा उंदीर निर्माण करू शकतो जेनेटिक्स इंजिनिअरींगच्या सहाय्याने मी माणसाला गुलाम करू शकतो, हिप्नॉटिझम करू शकतो, इतक ते अमानुष आहे.

ॲटोमॅटीक कंट्रोल ही ॲक्टीव्हिटीज तुमच्या मेंदूच्या सगळ्या प्रक्रिया मी होऊन हातात घेऊ शकतो आणि तुम्हाला मी माझ्या तिथून उठवू शकतो. तुम्हाला हसायला लावू शकतो. तुम्हाला रडायला लावू शकतो, तुम्हाला गायला लावू शकतो, ही जर जगाच्या सायन्स ॲंड टेक्नॉलॉजीमध्ये प्रगती झालेली असेल तर या प्रगतीचा मागोवा घेण्याची अंतर्मुखता आम्ही महाराष्ट्रामध्ये निर्माण करणार आहोत की नाही आणि महा–राष्ट्राला जर हिंदुस्थानचे नेतृत्व करायचे असेल तर याचे शिवाय दुसरा काय पर्याय आहे का ? तुमच्या माझ्या जवळ आहे का ? हिंदुस्थानचे नेतृत्व करण्याच्या बाता तर सोडाच, तुमचं स्वतःच जीवन तुम्हाला उत्तम प्रकारे जगता येईल अशा प्रकारच्या

साधन सामुग्रीनी युक्त असा महाराष्ट्र तरी तुम्ही उभा करणार आहात की नाही? कृषी–औद्योगिक करणातही एक प्रक्रिया आम्ही उभी करून सेकंडरी सेक्टरमध्ये साखर कारखाने उभारावेत, कागद कारखाने उभारावेत, अशी अपेक्षा होती पण दारूचे कारखाने उभे राहिले आणि कराडच्या गावामध्ये गल्ली गल्लीमध्ये काय उद्योग चाललेले आहेत. महात्मा गांधींच्या देशामध्ये काय उद्योग चाललेले आहेत हे तुम्हाला मी काही सांगावयाची आवश्यकता नाही. बौद्धिक मशागतीकडे ग्रामीण भागातील लोकानी वळावं आणि शेतीचा जास्तीचा बोजा उद्योगधंद्यामध्ये लावावा याच्याऐवजी आता आम्ही कोरडवाहू शेतीवर पोट भरत नाही म्हणून आठ आण्याची किंवा पन्नास पैशाची हातभट्टी उतारा घेऊन गटारात लोळून स्वतःला विसरायचा प्रयत्न करतो, आणि ही प्रक्रिया जर अशीच चालू राहिली तर काय होईल मला माहीत नाही ?

साखर धंद्यामध्ये आम्ही लक्षणीय प्रगती केलेली आहे हे खरं. परंतु या शक्तीचा उपयोग करून घेऊन मोठ्या प्रमाणात कृषीऔद्योगिककरणाचे जाळे आम्ही पसरू शकलो नाही. हा साखर उद्योग सुद्धा आम्ही पारंपारिक तंत्रज्ञानावर चालवतो आहोत. त्याचेहो आधुनिकीकरण आम्ही करू शकलो नाही. शिवाय व्यापार बाह्य प्रेरणा आज या धंद्यात वर्चस्व गाजवत आहेत. साखर उद्योग कृषि औद्योगिकरणाचे केंद्रबिंदू होण्या-ऐवजी राजकीय अड्डे होऊन बसू पहात आहेत. या कीडेला वेळीच

आवर घातला नाहीं तर हा उद्योग सुद्धा डबघाईला आल्याशिवाय राहणार नाही.

मार्केटिंगच्या संदर्भातसुद्धा आमची कामगिरी वाखाणण्यासारखी नाही. काश्मिरची सफरचंद आज खेड्यातील वसस्टँडवर मिळू शकतात. परंतु जळगावची केळी वाघिणीअभावी जळगावच्या स्टेशनवरच सडताहेत हे कशाचे द्योतक आहे.

सहकारामध्ये, को–ऑपरेटिव्हमध्ये महाराष्ट्रात आज साडेसात-आठ हजार कोटी रुपये खेळत्रले जातात (Working capital) या शक्तिचा उपयोग केवळ काही ठराविक लोकांसाठीच होतो आहे, ही कोंडी फोडण्याच्या दृष्टीने काही काम करण्याचे सोडाच उलट मूठभरांच्या हातात असलेली ही शक्ति कायमस्वरूपी त्यांच्याच कशी हातात राहील ही खबरदारी घेतली जाते. या ताकतीचा उपयोग जर समाज परिवर्तनासाठी हो णार नसेल तर महाराष्ट्रातील सहकार दिशा घेऊन चाललेला आहे असं आपल्याला म्हणता येईल काय ?

उद्योगशीलतेच्या संदर्भातसुद्धा गेल्या पंचवीस वर्षात लक्षणीय अशी प्रगती करू शकलेलो नाही. काही बोटावर मोजण्याइतकी घराणी सोडली तर नवीन काही घराणी निर्माण झाल्याचे दिसत नाही. लघुउद्योगातसुद्धा या पेक्षा निराळे चित्र दिसत नाही. आणि म्हणून महाराष्ट्राची संपत्ती बाहेरील लोकांच्या हातात खेळते आहे. ही दयनीय अवस्था आमच्या नाकर्तेपणातून निर्माण झालेली आहे. आणि हे नाकर्तेपण मग बलाढ्य महाराष्ट्र कसा घडविणार !

आज जी जी प्रगत राज्ये आहेत ही प्रगत राज्ये तुम्हाला जगू द्यायचं की नाही हे ठरवू शकतात. कारण त्यांची टेक्नॉलॉजीची ताकद मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे. मी एक छोटंसं उदाहरण देतो तुम्हाला. मोठं उदाहरण देऊन तुमचा वेळ घेत नाही. अगदी छोटसं उदाहरण देतों. तुमच्या दररोजच्या गरजेचा पॉकेट कॅल्क्युलेटर. आज मला हा पॉकेट कॅल्क्युलेटर हिंदुस्थानचा घ्यायचा असेल तर दोनशे पन्नास रुपये मोजावे लागतात. पण हा पॉकेट कॅल्क्युलेटर मला मुंबईच्या चोर बाजारात जपानमध्ये तयार झालेला पन्नास रुपयास मिळतो. आणि माझी स्वतःची सायकॉलॉजी अशी आहे माझं मानसशास्त्र असं आहे की जपान-मध्ये तयार झालेला हा उत्तम असतो, हिंदुस्थानमध्ये तयार झालेला कॅल्क्युलेटर काही बरोबर असणार नाही. आणि तो पन्नास रुपयाला मिळतो, उत्तमातला उत्तम आहे तो घेऊ या. माझा कॅल्क्युलेटर मार्केटमध्ये चालत नाही. जपानचा चोरून आणलेला कॅल्क्युलेटर मार्केटमध्ये चालतो. आणि दोनशे पन्नास रुपयाचा कॅल्क्युलेटर मार खातो. त्यांनी मार खाल्ला की माझी इंडस्ट्री बंद पडते. मग हे जसं कॅल्क्युलेटरच्या संदर्भात आहे तसंच कॉम्प्युटरच्या संदर्भातही करणार तुम्ही. मी कॉम्प्युटरचे अमेरिकेमध्ये दोन-तीन कारखाने बघितले, ॲटम बघितले: डिफिकल विजय आणि इलेक्ट्रॉनिक्स बघितले. विशेषत: इलेक्ट्रॉनिक्समध्ये या मंडळींनी इतकं अफाट काम केलय की, आपण पाहिलं तर आपला विश्वास बसणारसुद्धा नाही, बसत नाही. आता रोबोट काम करतोय हे तुम्हाला माहीत आहे. कॉम्प्युटर तयार करण्याचेही काम रोबोट करू लागलेला आहे.

हिवलर पॅकर्ड ही मोठी कंपनी आम्ही पाहिली. तसेच आय्. बी. एम्. सारखी कंपनी आम्ही बघितली. इलेक्ट्रॉनिक्समध्ये इतकं मोठं काम या मंडळींनी केलेले आहे की आपली कल्पनासुद्धा आपण ताणू शकणार नाही, इतकं अफाट आहे. आता मला कॉम्प्युटर जर हिंदुस्थानमध्ये तयार करायचा असेल तर त्याची एक हजार रुपये इतकी किंमत होईल असं गृहीत धरूया. पण हा कॉम्प्युटर जो हिंदुस्थानमध्ये एक हजार रुपयास मिळणार आहे. तो कॉम्प्युटर अमेरिकेला मला दहा डॉलरला मिळू शकतो. तेव्हा हिंदुस्थानचा कॉम्प्युटर हा बाजारपेठेत टिकणार नाही. शंभर डॉलर मला एक हजार रुपये असाच कॉम्प्युटर करायला मला दहा हजार रुपये लागणार आहेत. माझा कॉम्प्युटर टिकेल. ? मार्केटमध्ये टिकणार नाही. कारण अद्ययावत टेक्नॉ-लॉजी माझ्याजवळ नाही. माझा रोबोट काम करीत नाही. मी हातांनी काम करतो. आणि हातांनी कितीतरी कमी काम होते तेव्हा मॅन-पॉवर आता याही संदर्भामध्ये अडचणीत आलेली आहे. मी आता या संदर्भात मॅन पॉवर डेव्हलपमेंटचे काम केलं तर ही मॅन पॉवर रोबोटच्या समोर कमी पडणार ! मग त्यांचा कॉम्प्युटर विकणार, त्यांचा कॅल्क्युलेटर, टेलेव्हिजन विकणार. अहो हा टेलेव्हिजन तुमचा आहे ? काय सांगायची तुमची दयनीय अवस्था. तुमचा आहे का टेलेव्हिजन ? तुमचं फक्त खोकं आहे, सगळ्या कंपोनंटस् बाहेरच्या आहेत. टेलिव्हिजनचा आत्मा, पिक्चर ट्यूब बाहेरची. तुमच्याकडे होत नाही. आता नवीन एक पिक्चर ट्यूबचा कारखाना हिंदुस्थान सरकार टाकणार आहे. कोलॅबरेशन खाली. आपल्या स्वतःच्या अकलेवरती टेक्नॉ-

लॉजी ट्रॉन्स्फर करायची मग टेक्नॉलॉजी ट्रॉन्स्फर तुम्ही केली तर ज्या मंडळींनो अद्यपावत टेक्नॉलॉजी देतील ती त्यांच्याकडे ॲक्च्युअली असणारी टेक्नॉलॉजी देतील. आणि टेक्नॉलॉजी क्षेत्रामध्ये तुम्हाला दुय्यम स्थान नेहमी कायम ठेवतील. कारण त्यांचा कॉम्प्युटर हिंदुस्थानमध्ये विकायचा आहे. त्यांची पिक्चर ट्यूब हिंदुस्थानामध्ये विकायची आहे. त्याची इलेक्ट्रॉनिक्सची उपकरणे हिंदुस्थानमध्ये विकायची आहेत. त्यांचे डिफेन्समधले सगळे सामान त्यांना हिंदुस्थानमध्ये विकायचं आहे. म्हणून तुमचे डिफेन्सचे डिपार्टमेंट ते सेल्फ सपोर्टींग होऊ देणार नाहीत. प्रगत राष्ट्रे प्रगतिशील राष्ट्रांना त्यांच्या हितसंबधासाठी आपल्या पायावर उभे राहूच देणार नाहीत. महाराष्ट्र या संदर्भात देशाला टेक्नॉलॉजीच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी काही करू शकतो का ?

एकेकाळी हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवून देण्याचं, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक सगळ्या प्रकारचं स्वातंत्र्य मिळवून देण्याचं काम महाराष्ट्राने केलं. नेतृत्व केलय. आज प्रगत राष्ट्राचा औद्योगिक वसाहतवाद अप्रगत राष्ट्रामध्ये स्थिरावलेला आहे. तो औद्योगिक वसाहतवाद उखडून काढायचा असेल तर मग महाराष्ट्राला त्या नवीन टेक्नॉलॉजीमध्ये नेतृत्व करावे लागेल. हिंदुस्थानला मोकळं करावं लागेल. मग मला आता पुन्हा म्हणता येईल, जसं एक वेळ सेनापती बापट म्हणाले तसं मला म्हणता येईल, ' महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले. महाराष्ट्र मेला तरी राष्ट्रगाडा न चाले ' जोपर्यंत मला हे म्हणता येत नाही तो पर्यंत महाराष्ट्राभिमान बाळगण्यात काय अर्थ ?

काळाची दिशा घेऊन महाराष्ट्राची साधनसामुग्री त्याकाळाचा वेध घेण्यासाठी आपल्याला काटकसरीने वापरली पाहिजे, खर्ची घातली पाहिजे. नवीन माणसाची ताकद उभी केली पाहिजे. आणि ही ताकद पुढचा आणखी विकास गतीमान कसा घडेल त्याच्यासाठी वापरली पाहिजे. ही जी एक दिशा आपण घेऊन चालायला पाहिजे त्या दिशेमध्ये आपण कमी पडलेलो आहोत. गेल्या पाच ते सात वर्षांपासून राजकीय नेतृत्वच दरवर्षी आम्ही अस्थिर करण्याच्या उद्योगाला लागलेलो असल्यामुळे ज्याला आपण कन्टीन्यूटी म्हणतो, सातत्य म्हणतो, हे सातत्यसुद्धा महाराष्ट्राच्या प्लॅनिंगमध्ये राहिलेले नसल्यामुळे आम्ही अनेक ठिकाणी मार खाल्लेला आहे. इलेक्ट्रिकच्या क्षेत्रामध्ये मार खाल्ला, इरिगेशनमध्ये मार खाल्ला, इंडस्ट्रीजमध्ये तर आमच्या मंडळींनी पुरुषार्थ करायला पाहिजे होता तो पुरुषार्थ आम्ही मंडळी अनेक कारणांमुळे करू शकलेलो नाही. त्याला कुणीही बाहेरचो माणसं कारणीभूत नाहीत. त्याला आमचं नाकर्तेपण कारणीभूत आहे किंवा आमचं प्लॅनिंग कारणीभूत आहे. मॅन पॉवर डेव्हलपमेंटच्या संदर्भातसुद्धा जे काम आम्ही करायला पाहिजे होतं ते काम आम्ही न केल्यामुळे बाहेरची माणसं आमच्या इलेक्ट्रॉनिक्स इंडस्ट्रीजमध्ये आली, पेट्रोकेमिकल्समध्ये आली. आमच्या इंडस्ट्रीजमध्ये येऊन बसलेली आमची इंडस्ट्रीज त्यांनी ताब्यात घेतली, आर्थिक सत्ता त्यांच्याकडे राहिली. तांत्रिक सत्तासुद्धा त्यांच्याकडेच राहिली.

वरील विवेचनावरून आपल्या हे लक्षात यावे की महाराष्ट्राचे कृषी उत्पादन दर हेक्टरी चिंतात्रांत इतके इतर राज्यांच्यामानाने

कमी आहे. सर्वच कृषि उत्पादनांचा विचार केला तर देशाच्या पातळीवर उत्पादनाच्या संदर्भात महाराष्ट्र सातव्या क्रमांकावर जातो. या उद्योगधंद्याच्या वाढीचा आम्ही नेहमीच गौरवाने उल्लेख करतो (ज्याची कर्तबगारी ही अभावानेच आमच्याकडे जाते.) त्यातमुद्धा गेल्या पाच-सात वर्षामध्ये वाढीच्या संदर्भात आम्ही पाचव्या-सहाव्या क्रमांकावर जाऊन उभे राहतो. सिंचनाची गतीसुद्धा याला अपवाद नाही. गेल्या पाच-सात वर्षांत इतर राज्यांनी सिंचनाचा वेग महाराष्ट्रापेक्षा जास्तीचा ठेवलेला आहे. मनुष्यबळ विकासाच्या संदर्भात तर आमची अवस्था दयनीय आहे. आमच्या गरजा भागविण्यासाठी लागणारे तंत्रज्ञसुद्धा आम्हाला इतर राज्यातून आणावे लागतात. कोरडवाहू शेती आणि दुष्काळी परिस्थिती ही सापासारखी सरपटत आमच्या समोर येते आहे. अत्याधुनिक ज्ञानविज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात तर आमच्या पूर्वजांचे नाव घेण्यास लाज वाटावी इतके आम्ही मागे रेंगाळतो आहोत. आजचे युग हे विज्ञान तंत्रज्ञानाचे युग आहे. या दोन्ही शक्तीच्या आधारावर आज मानव अंतराळात विहंगतो (विहरतो) आहे, गतकालात बौद्धिक क्षेत्रात देशाला महाराष्ट्राने नेतृत्व दिले. आजच्या काळात हे आम्ही देतो आहोत काय ! याचे उत्तर नकारात्मक आले तर महाराष्ट्र आपली पूर्वपरंपरा पुढे चालवितो आहे, असे आपल्याला म्हणता येईल काय ! म्हणजेच महाराष्ट्र गेल्या काही वर्षांपासून जीवनाच्या अनेक क्षेत्रात इतर राज्यांच्या तुलनेत मागे पडतो आहे. ज्या गतीने महाराष्ट्रापेक्षा मागे असलेली राज्ये आज पुढे जात आहेत, ती गतीसुद्धा एकेकाळी पुढारलेला महाराष्ट्र ठेवू शकत नाही.

तेव्हा प्रगतीच्या क्षेत्रात कुठेतरी निश्चितपणें काही चुकते आहे, म्हणजेच दिशा चुकते आहे. म्हणूनच आपल्यासमोर आज महाराष्ट्र दिशाहीन होतो आहे काय ? असा प्रश्न पडतो.

शिवाजी महाराजांचा हा महाराष्ट्र, महात्मा फुल्यांचा महाराष्ट्र, यशवंतरावजींचा हा महाराष्ट्र पुढे न्यायचा आहे ती ताकद आम्ही मंडळी घालवून बसलो आहोत. तर मग आम्हा मंडळीना अंतर्मुख होऊन विचार करायची वेळ आता येऊन ठेपलेली आहे. आणि जे वैभव महाराष्ट्राने गतकाळामध्ये– इतिहास काळामध्ये– हिंदुस्थानच्या संदर्भात भोगलेले ते वैभव हळूहळू कमी होऊ लागलेले आहे, अशा प्रकारची शंका मला, माझ्या मनाला गेल्या दहा वर्षापासून चाटून जातेय. मी अनेक दिवसांपासून या संदर्भात विचार करतोय आणि असे वाटते की आजच्या शारदीय व्याख्यानमालेच्या निमित्ताने हा विचार तुमच्यापर्यंत पोहोचवावा. बघा तो तुम्हाला पटतोय का ? तुम्हाला असे वाटतेय काय की महाराष्ट्र प्रत्येक क्षेत्रामध्ये ज्या गतीने पुढे जायला पाहिजे होता त्या गतीने तो आज जातो आहे का ? आजचे युग हे सुपरसॉनिक स्पीडचे युग आहे. आम्ही मात्र मुंगीच्या गतीने निघालेलो आहोत.

आता गती आणि इन्फर्मेशन याचा काळ आहे, गती, स्पीड, इन्फर्मेशन माहिती याचा काळ आहे. स्पेसमध्ये त्याच्या-मुळे माणूस गेलेला आहे. आणि त्या संदर्भात आम्ही जर विचार केला तर आम्ही कुठे आहोत, याचा विचार जरी या भाषणाच्या निमित्ताने आपण कराडकर मंडळी कराल, निदान विचार

करण्याची इच्छा व्यक्त झाली तरी सुद्धा औरंगाबादहून इथं येण्याचं सार्थक झालं असे समजेन. मी या व्याख्यानमालेचे जे आयोजक आहेत, आपल्या नगरपालिकेचे जे अध्यक्ष आहेत माझे परममित्र पी. डी. साहेब यांचा मनापासून ऋणी आहे. आपली सेवा करायची आजच्या संध्याकाळची त्यांनी मला संधी दिली. श्री. विठ्ठलरावजी इथून औरंगाबादला मला भेटायला आले, पत्र पाठवलं असतं तरी चाललं असतं, परंतु मला अमुक तारीख सोईची नाही, तमुक तारीख सोईची नाही. तेव्हा मला आता इथल्या इथं सांगा की कोणती तारीख सोईची आहे. आमची चार तारीख व्याख्यानमालेच्या उद्घाटनाची आहे. त्याच तारखेला व्याख्यानमाला सुरू होते, आणि तुम्ही त्याच दिवशी कराडला येऊ शकलात तर बरे होईल. विठ्ठलराजींवच्या आग्रहास्तव मी कराडला येऊ शकलो याचा मला अतिशय आनंद आहे. बिठ्ठलरावजी जर औरंगाबादला माझेकडे आले नसते तर कदाचित मी येऊ शकलो नसतो. मी पुन्हा पी. डी. साहेब, विठ्ठलरावजी, शिंदे साहेब आणि व्याख्यानमालेतील जी मंडळी आहेत, त्यांचे पुन्हा पुन्हा ऋण व्यक्त करतो. आणि आपण मंडळी घड्याळाकडे न पाहता जवळजवळ दोन तास माझे विचार ऐकून घेतलेत त्याबद्दल आपल्या सर्वांच्यासाठी कृतज्ञता व्यक्त करून, धन्यवाद देऊन मी आपली रजा घेतो. जयहिंद !

— ० व्याख्यानमालेतील यापूर्वीचे व्याख्याते नि विषय ० —

व्याख्याते		विषय
वर्ष : पहिले १९७३		
प्राचार्य देवदत्त दाभोळकर	पुणे	राजकारण आणि समाजजीवन
डॉ. भा. पं. बंगुडकर	पुणे	भारतीय समाजवाद, काही विचार
प्रा. गं. बा. सरदार	पुणे	भारतीय समाजवाद आणि ऐहिक निष्ठा
वर्ष : दुसरे १९७४		
प्रा. ए. एम्. खान श्री शाहू मंदीर महाविद्यालय, पुणे		भारतीय लोकशाही : काही विचार
श्री. वि. अ. नाईक माजी न्यायमूर्ती, पुणे		लोकशाही समाजवाद
कै. सदाशिव बागाईतकर	पुणे	अविकसित देशातील समाजवादाचे स्वरूप
वर्ष : तिसरे १९७५		
कै. डॉ. भा. शं. भणगे	मुंबई	आजची आर्थिक परिस्थिती व त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग
श्री. त्र्यं. कृ. टोपे	मुंबई	समाज सुधारणेच्या समस्या
डॉ. प्र. चि. शेजवलकर संचालक, इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट अँण्ड रिसर्च, पुणे		सद्य: स्थिती
वर्ष : चौथे १९७६		
श्री. गोपाळराव मयेकर माजी शिक्षणमंत्री, गोवा		भारतीय समाजवादाच्या परिवर्तनाची दिशा आणि वेग (दोन व्याख्याने)
कै. पद्मभूषण धनंजय कीर प्रसिद्ध चरित्रकार, मुंबई		राजर्षी छत्रपती शाहू आणि नवभारताची मागणी
वर्ष : सहावे १९७८		
डॉ. भालचंद्र फडके	पुणे	डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक क्रांती

व्याख्याते		विषय
वर्ष : सातवे १९७१		
कै. आमदार पी. बी. साळुंखे कोल्हापुर		महाराष्ट्रातील सामाजिक क्रां (दोन व्याख्याने)
डॉ. सत्यरंजन साठे प्राचार्य, लॉ कॉलेज, पुणे		भारतीय राज्यघटना आणि परिवर्तन
वर्ष : आठवे १९८०		
डॉ. जनार्दन वाघमारे प्राचार्य, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर		महाराष्ट्रातील राजकारण व स कालचे, आजचे व उद्याचे (दोन
खासदार प्रतापराव भोसले माजी राज्यमंत्री महाराष्ट्र राज्य		शेतीचे अर्थशास्त्र व त्या व्यवसायाचे स्थान
वर्ष : नववे १९८१		
मा. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी प्रमुख संपादक, मराठी विश्वकोश वाई		विज्ञान आणि मानवी मूल्ये (तीन व्याख्याने)
वर्ष : दहावे १९८२		
मा. नानासाहेब गोरे	पुणे	महाराष्ट्र धर्माची नवी (दोन व्याख्याने)
वर्ष : अकरावे १९८३		
बॅ. पी. जी. पाटील मा. तात्यासाहेब कोरे सौ. शांताबाई किर्लोस्कर		(कराड शहरात १२ ते २१ जमाबंदी, शस्त्रास्त्रबंदी अ केलेला असल्याने नियोजित होऊ शकली नाहीत)
वर्ष : बारावे १९८४		
श्री. वसंत पळशीकर	मंचर	'कार्ल मार्क्स : जीवन, वि समाजशास्त्र' (तीन व्याख्या
वर्ष : तेरावे १९८५		
डॉ. पंजाबराव जाधव, श्री. द्वा. भ. कर्णिक,	पुणे मुंबई	(रशियाचे राष्ट्राध्यक्ष श्री. व चेर्नेंको यांचे निधनानिमित्त व्याख्याने होऊ शकली नाहीत.

आणि यंदाच्या (१९८७) व्याख्यानमालेत

प्रा. रावसाहेब कसबे संगमनेर महाविद्यालय, संगमनेर	'धर्म आणि इतिहास लेखन (दोन व्याख्याने)

'यशवंतराव चव्हाण स्मृती सदन'

कराड नगरपालिका नगरवाचनालय